**५) सत्यशोधक समाजाची स्थापना :** काही काळ फुले यांनी परमहंस ??? मार्फत कार्य केले होती. याच मंडळाची प्रेरणा घेऊन २४ सप्टेंबर १८७३६ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाची काही महत्त्वाची तत्वे म्हणजे (१) सर्व मानव एकाच देवांची लेकरे आहेत. (२) देवाची पुजा करण्यासाठी गुरु किंवा पुरोहितांची गरज नाही. (३) मानव जातीने नव्हेतर गुणाने श्रेष्ठ असतो. (४) कोणताही धर्म ईश्वर निर्मित नाही.

**६) सत्यशोधक समाजाचे कार्य :**

१) शेतकऱ्यांना कर्जबाजारीपण व खर्च, बचत व ब्राह्मणांच्या गैरहजेरीत लग्न, शिक्षणाला महत्त्व, रूढीचा त्याग करुन आधुनिकतेचा स्विकार यावर भर दिला आहे.

२) शुद्रातिशुद्र, स्त्रिया, शेतकरी यांना आज्ञानातून बाहेर काढणे, समाजातील द्रारिद्र कमी करण्याचा प्रयत्न करणे.

३) गरिबांच्या मुलांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देणे

४) हा लढा ब्राह्मणांच्या ब्राह्मणांशी चालू होता.

५) ब्राह्मण धर्मविधीचे मंत्र सामान्यांना कळत नाही म्हणून सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकांसह सर्व पुजाविधी तयार केले. त्याचा प्रसार ही केला. ग्यानोबा साने या विधुरांचा विवाह स्वतः फुले यांनी लावला होता.

६) फुले शिवाय योगदान : महात्मा फुले यांच्या दिनबंधू पत्रकास डॉ. संतूजी रामचंद्र लाड यांनी आर्थिक मदत केली होती. नारायण लोखंडे हे दिन बंधूचे संपादक होते. पुढे ते कामगार चळचळीचे नेतही झाले होते. डॉ. विश्राम धोत्रे हे काही काळ सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष होते. रामय्या अय्यावारु यांनी सत्यशोधक चळचळींना आर्थिक मदत केली होती. कोल्हापुरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी फुले यांच्या मृत्यूनंतर १९३५ पर्यंत सत्यशोधक समाजाचे कार्य चालू ठेवले होते.

महात्मा फुले यांच्या योगदानामुळे ब्राह्मणेत चळवळ सुरु झाली. समाज प्रबोधनासाठी सावित्रीबाई आणि जोतिराव फुले यांनी केलेला त्याग व योगदान भारतीय समाजातील खरी सुधारणावादी चळवळी आधार दिला वाटते. जोतिराव यांना शुद्र-अतिशुद्र समाजाला गुलामगिरीतून युक्तीचा लढा होता. यामुळे भारतीय इतिहासात फुले यांचे योगदान अतिषय महत्त्वाचे आहे. कारण शिक्षणाबद्दल जाणीव फुले यांना झाली होती. म्हणून संपूर्ण आयुष्य स्त्री, शुद्र-अतिशुद्र समाजाला शिक्षण देऊन परिवर्तनासाठी खर्च केले आहे.

## २.१.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय

भारतातील प्रत्येक व्यक्तीला स्वाभिमानाने जीवन जगण्यासाठी महात्मा जोतिराव फुले यांच्या नंतर जातीवाद / ब्राह्मणेत्तर चळवळीला एक खंबीर नेता जन्माला आला तो म्हणजे डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये मध्यप्रदेशातील महू या सैन्याच्या वसाहतीत झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोकणात (अंबवाडे) गावी झाले. त्यांचा जातीय भेदभावाचा अन्याय सहन करावा लागला होता. पुढे माध्यमिक शिक्षण मुंबईत घेतले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील कोलंबीया विद्यापीठात एम.ए. इग्लंड मधील स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये एम.एस.सी. जर्मन मध्ये डी.एस.सी. म्हणजे डॉ. आंबेडकर यांनी विविध पदव्या संपादन करुन, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानवंशशास्त्र, धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहास, कायदा, राज्यशास्त्र, तत्वज्ञान आणि इतर सामाजिक शास्त्राचा अभ्यास केला ोता. यामुळे संपूर्ण जीवनात त्यांनी विविध व्याख्यान, शोधप्रबंध आणि ग्रंथ लिहून भारतीय तत्वज्ञानाल  मिळवून दिली आहे. देशाबद्दल राष्ट्रभक्ती आणि सामाजिक समता हे सुत्र त्यांचा कार्याचे होते. समाजाच्या जनजागृतीसाठी मुकनायक १९२० बहिष्कृत भारत १९२७, जनता १९३०, प्रबुद्ध भारत १९५६ ही महत्त्वाची वृत्तपत्रे चालू केली होती. याशिवाय द एन्नीहिलेशन

ऑफ कास्ट, हु वेअर शुद्रास, बुध्दा अँण्ड हीस धम्मा, कास्ट इन इंडिया, द अन्टचेबिलिटी, बुध्द अँण्ड मार्क्स, थॉट ऑन पाकिस्तान. संपूर्ण जीवनात भारत देशा जाती मुक्त बनवून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी विविध प्रकारचे लढे दिले आहे. त्यांची ओळख करुन घेऊया.

**जातीअंतासाठी केलेले योगदान :**

**१) महाडचा सत्याग्रह १९२७ :**

या सत्याग्रह पासून अस्पृश्य बांधवांच्या युक्तीला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला होता. पूर्वी अस्पृश्य समाजाला सार्वजनिक पाण्याच्या स्त्रोताचा वापर करण्याचा अधिकार नव्हता. पण ४ ऑगस्ट १९२३ रोजी मुंबई विधिमंडळानी एक कायदा पास करुन सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, शाळा, मैदाने, बागा मध्ये सर्वांना संचार व वापरासाठी खुले करण्यासाठीचा ठराव पास केला होता. त्यानुसार महाड नगर परिषदेने पण महाडच्या चवदार तळे अस्पृशांसाठी खुले केले होते. उच्च जातीच्या दबावापायी अस्पृश्य तळयावर पाणी भरण्यास घाबरत होते. म्हणून डॉ. आंबडेकर यांनी अस्पृश्यांना धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आणि एक मानव म्हणून निसर्गदत्त अधिकार आणि आत्मसन्मानासाठी उच्च जातीची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी हा लढा निर्माण केला होता. हा हक्क सहजासहजी मिळाला नाही तर न्यायालयीन अडचणीवर मात करुन आपल्या अनुयांचे रक्त सांडून डॉ. आंबेडकर यांनी आपल्या हजारो सहकार्यांसोबत या तळ्यात प्रवेश करुन पाणी पिले होते. हा जगाच्या इतिहासातील पहिली चळवळ होती जी केवळ पिण्याच्या पाणयासाठी झाली होती.

**२) मनुस्मृतीचे दहन १९२७ :**

हिंदू धर्मातील मनुस्मृतीच्या संहीतेने समाजातील शुद्रा बरोबरच स्त्री समाजाला विविध हक्कापासून वंचित ठेऊन आपमानीत व अन्यायकारक वागणूक देणाऱ्या संहिता या मनुस्मृती या ग्रंथा मध्ये आहेत. म्हणून शूद्र व स्त्री यांना ब्राह्मणी गुलाम बनवणाऱ्या संहिताचा धिक्कार करण्यासाठी २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे भरली होती. यामध्ये जाती व्यवस्था व विषमतेच्या विषारी विचार सांगणाऱ्या मनुस्मृतीचे सार्वजनिक रित्या दहन केले होते.

**३) नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह :**

१९३० - १९३५ या काळात डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रह झाला होता. अस्पृश्यांना सार्वजनिक हिंदू मंदिरात प्रवेश करण्यास बंदी होती. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाने मंदिरे बाटणार होती. मंदिरात प्रवेश केल्याने अस्पृश्य बांधवाचे प्रश्न सुटणार नाहीत याची जाणीव डॉ. आंबडेकर यांना ही होती. अस्पृश्यांना सन्मानाने जीवन जगण्याच्या हक्क मिळावे इतरांच्या बरोबरीचा दर्जा मिळावा यासाठी मंदिर प्रवेशाची चळवळ डॉ. आंबडेकर यांनी महत्त्वाची मानली होती. म्हणून आंबडेकर यांनी मंदिर प्रवेश सत्याग्रहाला विशेष महत्त्वाची मानली होती. म्हणून स्वतः डॉ. आंबेडकर

**४) डॉ. आंबेडकर आयोजित सभा व परिषदा :**

अस्पृश्यांच्या प्रश्नासाठी व प्रबोधनासाठी डॉ. आंबेडकर यांनी औरंगाबाद, येवला, मुंबई, मलकापूर, तडवळे ढोळी इत्यादी ठिकाणी महत्त्वाच्या सभा घेतल्या होत्या. माणगाव

परिषद, अ.भा. बहिष्कृत समाज परिषद, मुंबई प्रांत अस्पृश्यता निवारण परिषद, अ.भा. अस्पृश्य परिषद दिल्ली मध्ये शिक्षण सक्तीचे व मोफत मिळावे, कमी शिकलेल्यांना नोकरी मिळावी. स्थानिक स्वराज्य संस्थेत अस्पृश्यांना प्रतिनिधी नेमण्यात यावे, सरकारी क्षेत्रात कर्मचारी म्हणून शिरकाव करावा. सर्वांनसाठी एकच शाळा असावी. महार वतन पद्धतीच्या जमिनीवर फेरफार करावा, अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी. तलाठी पद अस्पृश्यांना मिळावी, मुंबई इलाख्याचा शिक्षण मंत्री ब्रह्मणेत्तर असावा. मद्यपान व मृत जनावरांचे मांस खाण्यास बंदी करावी. नागपूर, दिल्ली आणि माणगाव परिषदेत छत्रपती शाहू महाराज हजर होते. लोकांनी आपल्या हक्कांसाठी संघटीत होऊन पारंपरिक जातीय व्यवसाय सोडून सन्मान प्रदान करणारे रोजगार, नोकऱ्या व उद्योग करावेत. यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे असे आंबेडकर आपल्या सभेमधून सतत सांगत असतात.

### ५) शैक्षणिक कार्य :

डॉ. आंबेडकर यांच्या मते, अस्पृश्य समाजाची रूढी परंपरा आणि धार्मिक गुलामीतून मुक्तीसाठी आधुनिक शिक्षण विशेष महत्त्व दिले होते. म्हणून सुरुवातीपासून अस्पृश्य समाजात शैक्षणिक जागृती व प्रसार यावर भर दिला जात होता. स्वतः उच्चविद्याभुषिक होऊन समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना करुन वाचनालय, प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा सुरु केल्या होत्या. १९४६ मध्ये पीपल एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेचे मुंबईत सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची व वस्तीगृहाची स्थापना केली आहे. यातून शिक्षण घेतलेल्या अस्पृश्य समाजातील लोक आपल्या हक्कांसाठी जागृत होऊन समाजाच्या कामासाठी तयार झाले.

### ६) राजकीय कार्य :

डॉ. आंबेडकर यांची राजकीय कार्य धोरणात्मक स्वरूपाचे होते. गव्हर्नरच्या कायदे मंडळ कौन्सिलचे सभासद म्हणून काम करताना ब्रिटीश सरकार बरोबर भारतीय समाजाच्या हिताचे धोरणे निश्चित केली. कायदेमंत्री म्हणून काम करताना व राज्यघटनेचा मसूदा तयार करताना अस्पृश्यांना न्याय हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केले. डॉ. आंबेडकरांचे कार्य म्हणून अस्पृश्य समाजाची प्रगती होऊन त्यांना सन्मानाने जगण्याची संधी मिळाली आहे.

### ७) धर्मांतर :

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना निवारण करण्यासाठी प्रयत्न करताना खूप वाईट अनुभव आला. यामुळे हिंदू धर्मात अस्पृश्य समाजाला मानवतेचे हक्क मिळणार नाही असे जाणत होते. म्हणून डॉ. आंबेडकर यांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याची घोषणा १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला परिषदेत केली होती. मी हिंदू धर्मात जन्माला आलो असेल पण मी हिंदू धर्मात मरणार नाही. असे जाहिर केले होते. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर मुक्कामी ऐतिहासिक समारंभात असंख्य अनुयायांसह सिद्धार्थ गौतम बुद्धाच्या बौद्ध धर्मानी दिक्षा घेतली यामुळे हिंदू धर्मातील अस्पृश्यांना मुक्ती मिळून जरी मानवतेचा व समतेचा जात विरहित नवा धर्म मिळाला आहे. म्हणून अस्पृश्य हे बौद्ध धर्मांतरीत होऊन स्वाभिमानाने जीवन जगू लागले आहेत.

## २.१.६ सारांश

भारतीय समाजात जातीव्यवस्था हे प्रमुख व्यवस्था होती. जातीव्यवस्था विषमतेच्या तत्वावर आधारित आहे. उच्च जातीला विशेष अधिकार बहाल केलेले असतात. तर कनिष्ठ शुद्र जातींना अधिकारा पासून वंचित ठेवले जाते. खालचा ही दर्जा देऊन भेदभाव केला जातो. शुद्र जातीवर अनेक निर्बंध होते. या विरुद्ध आवाज फुले आणि आंबेडकर यांनी शिक्षणाचा प्रचार व प्रसार केला. जातीला धर्माचा आधार असल्या हिंदूधर्मात सुधारणा होत नाही म्हणून सार्वजनिक सत्य धर्म पर्याय फुले यांनी मांडला. तर आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची दिक्षा घेऊन हिंदू जातीव्यवस्थेला मोठे हादरे दिले होते. समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानवतेचे अधिकार आणि सन्मानाची वागणूक देण्याचा प्रयत्न फुले व आंबडेकर यांनी केला होता.

## २.१.७ अभ्यासाचे प्रश्न

१) महात्मा फुले यांनी ब्राह्मणेत्तर चळवळीचे नेतृत्व करताना केलेले कार्य थोडक्यात सांगा.
२) डॉ. आंबेडकर यांनी भारतीय समाजातील जाती अंतासाठी केलेले योगदान स्पष्ट करा.
३) महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांनी ब्राह्मणी जाती व्यवस्था मोडण्यासाठी केलेले योगदानाची माहिती द्या.
४) टिपा लिहा.
   अ) महात्मा फुले यांचे ब्राह्मणेत्तर चळवळ
   ब) डॉ. आंबेडकर यांचा जाती व्यवस्थेला विरोध

## २.१.८ संदर्भ ग्रंथ

१) अभिजात समाजशास्त्रीय विचार, साईनाथ प्रकाशन, नागपूर, डॉ. प्रदिप आगलावे.
२) महात्मा फुले समग्र वाङ्मय
३) भारतीय समाज संरचना आणि परिवर्तन, निराली प्रकाशन, मुंबई, शिल्पा जाधव, सर्जेराव बोराडे
४) Themes and Persepestives in Indian Sociology, Rawat Publication, Dhanayare D.N.

❖❖❖❖

# ३

# समकालीन समाजशास्त्रज्ञ - शर्मिला रेगे
# लोकप्रिय संस्कृती संकल्पित करणे : महाराष्ट्रातील लावणी आणि पोवाडा

**घ꠰क रचना :**


३.० उद्दिष्टे

३.१ परिचय

३.२ कामुक आणि लैंगिक अर्थव्यवस्थे वरची लावणी

३.३ शौर्याचा पोवाडा आणि ओळखीचे राजकारण

३.४ 'संगीत बारी'चा उदय

३.५ तमाशाचे राजकीय कौतुक

३.५.१ नवीन दलित स्त्रीत्ववाद: तृतीय रत्न म्हणून महिलांच्या अभ्यासाचे पुनरुत्थान

३.६ रायटिंग कास्ट / रायटिंग जेंडर: पुराव्यांचे अनुवाद / दृष्टीकोनांचे भाषांतर

३.६.१ दलित आत्मकथनाच्या उपभोगावरील चर्चा

३.७ प्रश्न

३.८ संदर्भ


## ३.० उद्दिष्टे

- महाराष्ट्रातील लावणी व पोवाडा संदर्भित करणे
- लावणीचा आर्थिक संबंध समजून घेणे
- पोवाडाशी संबंधित असलेल्या राजकारणाची ओळख पटविणे
- दलित स्त्रीवादाच्या मुद्द्यांची तपासणी करणे
- दलित आत्मचरित्रांच्या मुद्द्यांचे विश्लेषण करणे

## ३.१ परिचय

महाराष्ट्राच्या लोक परंपरेवर भाष्य करणारे मुख्यतः असा दावा करतात की पोवडा हा पुरुषांस आणि लावणी ही स्त्रीस संबोधित करते. पोवाडा हा शौर्याची गाथा सांगणारा आणि लावणी हि भक्तीपर आणि कामुक असा लोकगीतांचा प्रकार आहे.

या दोन्ही लोकगीतांच्या प्रकारचा इतिहास चाळल्यास असे लक्षात येते कि लावणीचा सर्वप्रथम उल्लेख हा १७ व्या शतकात सापडला आहे, तर प्रारंभीच्या मराठा काळात ३०० पोवाड्यांचा उल्लेख आढळतो. मराठा योद्ध्यांचा सुवर्णकाळ लक्षात ठेवण्यासाठी पोवाडा हे प्रमुख साधन झाले आहे. बहुतेक पोवाड्यांत मराठा वीरांच्या शौर्यपूर्ण गाथांचे सादरीकरण करण्यात आले आहे. एका प्रसिद्ध मराठी म्हणीनुसार मराठा साम्राज्याच्या पाडावासाठी बाई आणि लावणी जबादार होते. लावणीमध्ये खालच्या जातीच्या महिलांच्या देहांचा उल्लेख आणि त्याचे सादरीकरण हा पुरुषांच्या कामुक इच्छांना उत्तेजन देणारा किंवा तृप्त करणारा,असा केला गेला आहे.

बाजीरावांच्या कारकिर्दीत, शेतकरी आणि शेतकामगारांची गरिबी व कर्जबाजारीपणा शिगेला पोहोचला होता. १८०३ च्या दुष्काळामुळे खालच्या जातीतील महिलांच्या विक्रीत वाढ झाली. महसुलाचा मोठा हिस्सा हा गुलाम महिलांच्या विक्रीच्या व्यापाराद्वारे उभा केला गेला.

## ३.२ कामुक आणि लैंगिक अर्थव्यवस्थे वरची लावणी

पेशवाईने गुलाम म्हणून काम केलेल्या खालच्या जातीच्या स्त्रिया दरबारात, "नाटकशाळा" (नृत्यगृह) आणि पेशव्यांच्या राज्यातील इतर विभागांत जसे गृह, तबेले, दुकान, दळणवळण आणि बांधकाम विभाग, यांत काम करत.

या\तील काही महिला गुलामांना, अधिकाऱ्यांना पगाराच्या बदल्यात भेट म्हणून देण्यात येत असे. राज्याच्या हस्तक्षेपातून खालच्या जातीतील महिलांना उच्च जातीच्या पुरुषांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असे.

हे गुलाम दोन प्रकारात मोडतात:

१. कुणबीणी - यांना घरगुती आणि शेतीतील मजुरीसाठी खरेदी करण्यात येत असे.

२. बाटिक - यांना त्यांच्या शारीरिक आणि लैंगिक श्रमासाठी खरेदी करण्यात येत असे.

खालच्या जातीच्या स्त्रियांकडून व्यभिचार हे त्यांच्या लैंगिक आणि उत्पादक श्रमाचे मुख्य कारण होते. त्या काळातील लावणी, हि त्यांना व्यभिचारी म्हणून साचेबद्ध करण्यात महत्वाचे साधन ठरली. बाजीराव द्वितीयच्या दरबारातील करमणुकीचे एक लोकप्रिय रूप असणारी लावणी हि, खालच्या जातीच्या स्त्रियांच्या गुलामगिरीचे वैचारिक औचित्य ठरले.

## ३.३ शौर्याचा पोवाडा आणि ओळखीचे राजकारण

पोवाडा हा भावनिक नाही तर शौर्याचा लेबल असलेला अभिव्यक्तीचा पुरुष प्रकार आहे; तो लावणी सारखा मवाळ नाही तर थेट लावणी विरोधी स्वभावाचा आहे.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात समूह ओळखीचे वाहन म्हणून पोवडा शोधला गेला आणि मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाचे आणि संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला गेला. "पेशव्यांच्या ब्राह्मणी शासनाची" स्तुती करताना १५० हून अधिक पोवाडे रचले गेले होते.

ज्योतिबा फुले यांचा पोवाडा आठ विभागांमध्ये रचलेला आहे. फुले यांनी स्वत: च्या प्रस्तावनेत पोवाड्याचे उद्दिष्ट्य हे मांग, महार, माळी आणि कुणबी म्हणजेच सर्व शूद्र आणि शूद्रविरोधी जातींपर्यंत पोहोचणे आहे, असे जाहीर केले.

फुले यांच्या पोवडामध्ये, छत्रपती शिवाजी महाराज हे , शूद्रांचा अभिमान ‘कुळवाडी भूषण’ म्हणून उदयास आले. इतर पोवाड्यांत त्यांनी ब्राह्मणांच्या शैक्षणिक धोरणावर टीका केली. ते ब्राह्मण शिक्षकांवर टीका करतात, ज्यांना ब्रिटीशांशी हातमिळवणी करण्यात काहीच हरकत नव्हती परंतु ते महार विद्यार्थ्यांचा प्रदूषणकारक / अपवित्र म्हणून निषेध करतात.

एकनाथ अण्णाजी जोशी यांचा पोवाडा हा शिवाजीचा ब्राह्मण शिक्षक दादाजी कोंडदेव यांच्या आवाजातला एक तुकडा आहे, ज्यांनी शिवाजीला भारतीयांना मुस्लिमांपासून वाचवण्याचे आवाहन केले आहे. फुले यांचा पोवाडा लोकप्रिय शूद्र परंपरेचे प्रतिनिधित्व करतो आणि जोशींचा पोवाडा हा संपूर्ण भारतीय-ब्राह्मणवादी हिंदू परंपरेचे प्रतिनिधित्व करतो. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात केवळ पोवाड्यांचा संग्रहातच नाही तर साहित्यिक आणि राजकीय नियतकालिकांमध्ये पोवाड्यांच्या प्रकाशनांमध्येही वाढ झाली.

**चला आपली प्रगती तपासू:**

प्र. महाराष्ट्रातील लावणी व पोवडा यावर सविस्तर लेखन करा.

## ३.४ 'संगीत बारी'चा उदय

पेशव्याची राजवट संपल्यानंतर अनेक सैन्य बडोदा संस्थानात गेले. सांगलीच्या राजाच्या दरबारात विष्णुदास भावे यांनी पहिले मराठी नाटक सादर केले. १८६० नंतर अनेक इंग्रजी आणि संस्कृत नाटकांचे मराठीत अनुवाद करण्यात आले.

पुढे भांडवलवादी नाट्यगृहाच्या उदयामुळे जसजशा खालच्या जाती त्यांच्या सादरीकरणाच्या कलेच्या आनुवंशिक क्षेत्रातून विस्थापित होत होत्या तशी 'नाचे / नर्तकी' (नृत्य करणार्या मुली, नर्तक), 'तमासगीर / कलाकार' (लोक कलाकार / कलाकार) यांच्यातील द्वंद्वात्मकता तीव्र झाली .

या काळातील मराठी रंगभूमीचा ऐतिहासिक नोंदीनुसार खालच्या जातीच्या स्त्रियांनी थिएटर कंपन्या सुरू करण्याचा प्रयत्न केला ज्यात महिलांनी पुरुष आणि महिला दोन्ही भूमिका साकारल्या. या प्रयत्नांवर जोरदार टीका झाली.

कोल्हाटी जातीच्या स्त्रियांना 'उघड्या मांडीची जात' म्हणून संबोधले जाते, याचा शाब्दिक अर्थ आहे, त्या स्त्रियांची जात जी मांडी उघडून फिरतात. या स्त्रिया कुटुंबाच्या कमावत्या म्हणून ओळखल्या जात होत्या आणि नृत्य आणि वेश्याव्यवसाय हा त्यांचा जात आधारित व्यवसाय म्हणून नोंदवला गेला आहे.

पुरुषांनी ढोलकी-फड तमाशा सांभाळला- तर संगीताचे बारींचे नियोजन, वित्तपुरवठा आणि आयोजन हे प्रामुख्याने कोल्हाटी महिलांनी केले. या स्त्रिया लग्न करत नाहीत तर ढोलकी-फड तमाशातील स्त्रिया बहुतेक वेळा मंडळी सदस्यांशी लग्न करतात. त्या पुरुषप्रधान नियंत्रणाच्या अधीन आहेत. त्यांचा संगीत बारींकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा घृणास्पद होता. त्यांच्या मते संगीत बारी या तमाशाचे खरे प्रतिनिधित्व करत नाहीत, तर तो अनैतिक प्रकार आहे.

१८९० च्या सुरुवातीस मुंबई आणि पुणे येथे तमाशा थिएटरची स्थापना झाली होती. या थिएटर्स ने केवळ श्रीमंत लोकांसाठीच बैठंकाचे आयोजन करण्यास सुरवात केली.

लावणीची संकल्पना विस्कळीत आणि पुनर्गठित करण्यासाठी सतत संघर्ष सुरू होते. भांडवलवादी  थिएटर आणि तमाशा यांच्यात तणाव होता.

१९ व्या शतकापासून मुंबईत कामगार वर्गाचे जिल्हे उदयास येऊ लागले. तमाशा कामगार वर्गाचा थिएटर बनला होता. त्याच काळात १९४० च्या दशकात मुंबई राज्याने तमाशा गटावर बंदी घालण्यात आली. हि गीते अश्लील आहेत आणि कलेच्या नावाखाली वेश्याव्यवसाय केला जात आहे असा युक्तिवाद करण्यात आला होता.

## ३.५ तमाशाचे राजकीय कौतुक

'जलसा' ने अस्पृश्यता, स्त्रिया आणि शेतकरी यांच्यावरील अत्याचार, अंधश्रद्धा आणि गावातील ब्राह्मणांनी केलेल्या दडपशाहीचे मुद्दे उचलले. या वादविवादाचा संदेश तमाशा-जलसा या नव्या प्रकारातून जनतेपर्यंत पोहचविला गेला. जलसामध्ये भाग घेण्यासाठी १० ते २० गावातील लोक जमत. जलसाचा मुख्य घटक म्हणजे आधुनिक विज्ञान आणि शिक्षणाची स्तुती करणे आणि अत्याचारी धार्मिक प्रथांची खिल्ली उडविणे हा होता.

जलाशयात बऱ्याचदा बळजबरीने लादलेले विधवत्व, अत्याचार, वेश्याव्यवसाय आणि शिक्षण असे विषय घेतले जात असत.

**चला आमची प्रगती तपासू:**

प्र. संगीत बारी आणि तमाशावर टीप लिहा.

### ३.५.१ नवीन दलित स्त्रीत्ववाद: तृतीय रत्न म्हणून महिलांच्या अभ्यासाचे पुनरुत्थान

१९८० पासूनच जातीय आणि वर्गीय अस्मितेचे राजकारणावर वर्चस्व राहिले. स्त्रीवादाची व्यापकपणे दोन मार्ग आहेत:

१. ब्राह्मणी
२.अब्राह्मणी / बहुजनवादी

त्यांना दलित / दलितबहुजन / अब्राह्मणी / फुले-आंबेडकरवादी स्त्रीवाद असेही नाव देण्यात आले.

१९९० च्या दशकात महिलांच्या अनेक स्वतंत्र आणि स्वायत्त संघटना तयार झाल्या. यापैकी बर्याच संस्थांच्या विचारधारा वेगवेगळ्या होत्या. दलित महिलांना समजण्यासाठी आपल्याला त्यांचा दृष्टिकोन आणि सामाजिक अनुभव वेगळे आहेत, हे समाजाने गरजेचे होते. दलित महिलांच्या अनुभवांवर आणि जीवनावर परिणाम करणारे अंतर्गत आणि बाह्य घटक बाहेर आणणे आवश्यक होते. यामुळे दलित महिलांच्या समस्यांचे गैर-दलित महिलांनी केलेले प्रतिनिधित्व अवैधआणि अप्रमाणिक असल्याचे यावरून दिसून आले.

दलित महिला संघटनांची या प्रामुख्याने नव-बौद्ध महिला संघटना होण्याच्या शक्यतेबद्दल अनेक शंका निर्माण झाल्या होत्या. यामुळे या संघटनांत मध्यम जातीतील महिलांचा सहभाग मर्यादित होण्याची शक्यता निर्माण झाली. सत्यशोधक कष्टकरी महिला सभा आणि स्त्री मुक्ती संघर्ष यांनी स्वतःचे सिद्धांत , कार्यपद्धती आणि अभ्यासाचे पुनरावलोकन करण्यासाठी मार्क्सवादी-फुले-आंबेडकर स्त्रीवादाचा आधार घेतला. त्यांनी या स्त्रीवादाला स्पष्टपणे ‘ब्राह्मणी स्त्रीवाद’ ठरवून त्यांच्यातील ‘फरक’ आणि वेगळेपणाचे पुनरावलोकन करण्यास सांगितले.

गेल्या दशकात, स्त्रीवादी विश्लेषणाचा पुरेसा पुनर्विचार आणि पुनर्भिमुखता झाली आहे.मंडलविरोधी आंदोलनानंतर, स्त्रीवाद्यांनी जात आणि लिंग यांच्यातील दुवा स्पष्ट करण्यासाठी ब्राह्मणवादी पितृसत्तेची संकल्पना मांडली. याद्वारे विद्वानांनी स्त्रीवादाचा आंबेडकरांच्या लिखाणासोबत कमी असणारा संवाद हा देखील दर्शविण्याचा प्रयत्न केला. स्त्रीवादाची ब्राह्मणी स्त्रीवाद आणि गैर ब्राह्मणी स्त्रीवाद अशी विभागणी संकल्पना केली गेली.

दलित स्त्रियांच्या प्रश्नावरील विविध चर्चासत्रांनी स्त्रीवादातील ब्राह्मणवादी नियम आणि दलित समाजातील पितृसत्ताक नियमांचे पुनरुत्पादन यावर वादविवाद सुरू केले. दलित चळवळ आणि महिला चळवळ यांच्यातील विस्कळीत संबंध दर्शविण्याचा प्रयत्न केला गेला. दलित स्त्रियांच्या विचारांचे सिद्धांतिकारण करण्याचे प्रयत्न झाले. यात दडपशाहीच्या आणि शोषणाच्या पलीकडे जाण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

‘ऑनर किलिंग’च्या विश्लेषणाने जात, इच्छा आणि पितृसत्ता यांच्यातील संबंध समोर आणला. गेल्या काही वर्षांत इंग्रजीतील इंग्रजी वृत्तपत्रे आणि नियतकालिकांनी दलित स्त्रीवादावर विशेष अंक आणले. पर्यायी इतिहास आणि स्त्रीवादाचे सिद्धांत हे जातिविरोधी चळवळीच्या प्रकाशनात महत्त्वाचे विषय म्हणून उदयास येत आहेत. अलीकडे स्त्रीवादी विद्वानांनी व्यावसायिक स्त्रीवाद्यांवर टीका केली आहे. अजूनही दलित स्त्रीवादी शैक्षणिक स्त्रीवादाची रिक्त जागा भरू इच्छित नाहीत.

थारू आणि ललिथा यांनी ‘विमेन रायटिंग इन इंडिया’ याच्या दोन खंडांमध्ये असे नमूद केले की त्यांच्याकडे दलित आणि आदिवासी लेखकांचे साहित्य कमी आहे आणि त्या आशा करतात की या संग्रहाच्या भविष्यातील खंडांत साहित्याची अधिक भर पडेल.

**आम्हाला आपली प्रगती तपासू द्या:**

प्र. नवीन दलित स्त्रीवादाचे समीक्षणात्मक मूल्यांकन करा.

प्र. तृतीय रत्न म्हणून महिला अध्ययनाचे पुनर्निर्देशन करण्यावर टीप लिहा.

### ३.५.२ महाराष्ट्रातील दलित स्त्रीवाद:

आंबेडकरी चळवळीच्या मौखिक इतिहासाने दलित आणि महिला चळवळीचा विसरलेला इतिहास परत मिळवला. दलित स्त्रीवादाबद्दल आणि मूक काळाबद्दल आपल्याला फार कमी माहिती आहे हे स्पष्ट आहे. दलित या मौनाची चौकशी, इतिहास आणि १९२० पासून ते आजपर्यंतच्या काळातील प्रखरआठवणी लक्षात ठेवून करतात.

## ३.६ रायटिंग कास्ट/ रायटिंग जेंडर: पुराव्यांचे अनुवाद / दृष्टीकोनांचे भाषांतर

### ३.६.१ दलित आत्मकथनाच्या उपभोगावरील चर्चा

मुख्य प्रवाहातील इंग्रजी प्रकाशकांनी अलीकडेच दलित जीवनातील वर्णनांमध्ये रस निर्माण केला आहे. विविध भारतीय भाषांमध्ये दलित सर्जनशीलता वाढविण्याविषयी अभ्यासकांचे एकमत आहे. हा एक सकारात्मक विकास आहे, परंतु अनुवाद आणि प्रकाशनाच्या राजकारणाबद्दलचा प्रश्न सोडला जाऊ शकत नाही. दलित आवाज सुलभ

झाला आहे आणि जातीवाद उघड झाला आहे, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की कशाचे भाषांतर आणि कोणाच्या संदर्भात व कोण भाषांतर करते आहे, या साहित्य निवाढीबाबतही राजकारण आहे. आपण हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की नवीन क्षेत्र नेहमीच धोकादायक आणि आकर्षक असते आणि तरुणांना संवेदनशील बनविण्यात दलित लेखनाची भूमिका कमी लेखली जाऊ नये. कित्येक विद्वानांनी याला जागतिकीकरण करणारी अर्थव्यवस्था आणि नव-उदारमतवादी बाजारपेठेशी जोडण्याचा प्रयत्न देखील केला आहे.

अलीकडे प्रकाशित झालेले बहुतांश दलित लेखन आत्मचरित्रात्मक स्वरूपाचे आहे. काही विद्वानांनी दलित आत्मचरित्रांचे वाचन आणि शिकवण्यामुळे वाचकांची धारणा मूलत: बदलू शकते का, असा युक्तिवाद केला तर काहींनी असा युक्तिवाद केला की ही आत्मचरित्रे 'रडक्या कथा' नसून अन्यायाविरुद्धच्या संतापाच्या कथा आहेत. आनंद तेलतुंबडे सारख्या इतरांना आत्मचरित्रात्मक कथा खूप व्यक्तिवादी वाटतात, अनेकदा लेखकाचा गौरव करतात, दलित पार्श्वभूमी रोमँटिक करतात आणि सामूहिक वेदना दर्शवण्यात अपयशी ठरतात.

गेल ओमवेद यांनी भारतातील शैक्षणिक आणि दक्षिण आशियातील विद्वानांमध्ये उच्च जातींच्या ब्राह्मणवादी वर्चस्वाबद्दल जागरूकता वाढवण्यात दलित लेखनाद्वारे बजावलेल्या भूमिकेवर प्रकाश टाकला.

दलित अभ्यास करणं अजून फशिनेबल नाही. दलित अभ्यास अजूनही 'सार्वत्रिक थीम' दर्शवत नाही कारण दलित लेखनावरील अभ्यासक्रम वैकल्पिक आहेत.

अनेक दलित विद्वानांनी दलित लेखन आणि आत्मचरित्रांच्या विरोधात युक्तिवाद केला आणि त्याची तुलना ‘भूतकाळातील घृणास्पद कचरा कुंड्यांमधून निघणाऱ्या दुर्गंधीशी’ केली आहे आणि समाजासाठी कथांचे महत्त्व स्पष्ट केले.

काही विद्वानांनी शैलीचा उगम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखन आणि भाषणातून शोधून काढला. डॉ. आंबेडकरांना त्यांचे जीवनकथन लिहायचे होते आणि त्या उद्देशाने चिन्हांकित केलेल्या तीन वह्या अभ्यासात सापडल्या होत्या. दलित कथांवर अवांछित भूतकाळ वर्तमानात आणल्याचा आरोप केला जाऊ शकत नाही त्याऐवजी ते सर्वात थेट आणि सुलभ मार्गांपैकी एक आहेत ज्यामध्ये दलितांच्या मौन आणि चुकीच्या वर्णनाचा प्रतिकार केला गेला आहे.

दलित आत्मचरित्र बुर्जुआ सीमांचे उल्लंघन करते आणि त्यांचे जीवन कथा भूतकाळातील सत्य, आंबेडकरी युगातील संपत्ती आणि असहायतेबद्दलचे सत्य तसेच आंबेडकरवाद्यांच्या प्रतिकार आणि प्रगतीचे साक्षीदार बनले.

दलित स्त्रीवादी पद्धोजी (अध्यापनशास्त्र) संरचीत करणे ही एक कठीण प्रक्रिया आहे. अभ्यासक्रमात दलित महिलांचा समावेश करण्याचे दोन मॉडेल सर्रास वापरले जातात.

१. पर्यटक म्हणून स्त्रीवादी

२.शोधक म्हणून स्त्रीवादी

पहिले मॉडेल सुचवते, 'दलित स्त्रियांचा समावेश करा आणि मिसळ करा' आणि दुसरे सुचवते 'दलित महिलांचा वेगळे आणि समान म्हणून समावेश करा'. दुसरे मॉडेल मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक सापेक्षतावादाच्या चौकटीत येऊन दलित महिलांच्या लेखनावर स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करते.

याउलट, विरोधी दलित स्त्रीवादी अध्यापनशास्त्र सामाजिक स्थान, अनुभव आणि इतिहासाच्या गुंतागुंतीच्या नातेसंबंधाच्या आकलनावर बांधलेले आहेत.

## ३.७ प्रश्न

१. शर्मिला रेगे यांनी लोकप्रिय संस्कृतीवर किती टीका केली हे दर्शवा.

२. शर्मिला रेगे यांनी अन्वेषित केल्याप्रमाणे महाराष्ट्राची "लावणी" आणि "पोवाडा" परंपरा यावर चर्चा करा.

३. शर्मिला रेगे यांच्या लोकप्रिय संस्कृतीवरील लेखाच्या संदर्भात लावणी आणि पोवाडा इतिहासाने निम्न जातीच्या स्त्रियांचे शोषण कसे ठळकपणे स्पष्ट केले ते स्पष्ट करा.

४. दलित स्त्रीवादी ओळख निर्माण करण्यासाठी "लावणी" आणि "पोवाडा" यांच्या भूमिकेचे समीक्षणात्मक मूल्यांकन करा.

५. दलित आत्मचरित्रांचा उच्च जातीच्या साहित्यावर कसा प्रभाव पडतो याचा तपशील द्या.

## ३.८ संदर्भ


- Rege, Sharmila. (2006). "Writing Caste, Writing Gender: Narrating Dalit Women's Testimonies" Zubaan Publications. New Delhi
- Omvedt, Gail. (1994). "Dalits and Democratic Revolution" Sage, New Delhi
- Guru, Gopal. (2016). "Shifting Categories in the Discourse of Caste and Class" EPW, Vol. 44(14): 10-12


❖❖❖❖

# ४.१

# समकालीन समाजशास्त्रज्ञ
# अ) लिला दुबे - दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशियातील नातेसंबंध आणि लिंगभाव

**घटक रचना :**

४.१.० उद्दिष्टे
४.१.१ प्रस्तावना
४.१.२ मालमत्तेचा वारसा
४.१.३ निवास
    ४.१.३.१ घरजावई
४.१.४ दक्षिण पूर्व आशिया
    ४.१.४.१ आर्थिक भूमिका
४.१.५ स्त्री लैंगिकता आणि पुनरुत्पादित सत्ता
४.१.६ स्त्रियांची लैंगिकता
४.१.७ वैवाहिक संबंध आणि विवाहाचे स्वरूप
४.१.८ सारांश
४.१.९ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
४.१.१० सरावासाठी स्वाध्याय
४.१.११ अधिक अध्ययनासाठी संदर्भ सूची

## ४.१.० उद्दिष्टे

वेगवेगळ्या संस्कृतीमध्ये लिंगभावाची नाती वेगवेगळ्या प्रकारे बांधली जातात. या सांस्कृतिक विविधतेचे स्त्रियांच्या परिस्थितीचे काय स्वरूपाचे नाते आहे हे समजून घेण्याची गरज आहे. सांस्कृतिक विविधतेचे मुख्य क्षेत्र नातेव्यवस्था वा आप्तसंबंधव्यवस्था हे आहे. त्यामध्ये विवाह आणि कुटूंबसंस्थेचा आंतरभाव होतो. लिंगभावाची नाती प्रस्थापित केली जातात. त्यामध्ये नातेसंबंधांचा फार महत्त्वाचा संदर्भ असतो. स्त्रियांची परिस्थिती समजून घेताना नातेसंबंधाचा अभ्यास सूसंगत वाटतो.

या पार्श्वभूमीवर लिला दुबे यांनी लिहिलेल्या दक्षिण आण दक्षिण पूर्व आशियातील लिंगभाग आणि नातेसंबंध : प्रारुपे आणि विसंगती या शीर्षकाच्या लेखामध्ये मांडलेले विचार समजून घेणे उचित ठरेल.

या घटकाचा अभ्यासानंतर आपल्याला -

- दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशियातील नातेसंबंधाच्या आकृतीबंधाचे आकलन होईल.
- दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशियातील निवास आणि वारसा यांच्या आकृतीबंधाचे परिक्षण करता येईल.
- अर्थव्यवस्थेतील स्त्रियांच्या विविध योगदानांचे मूल्यमापन करणे शक्य होईल.

## ४.१.१ प्रस्तावना

प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ लिला दुबे यांचा Kinship and Gender in South and South East ASia : Patterns and Contrasts हा लेख प्रकाशित झाला. या लेखामध्ये त्यांनी दक्षिण आणि आणि दक्षिण पूर्व आशियातील लिंगभावाच्या जडणघडणीतील नातेसंबंध व्यवस्थेच्या योगदानाचे विश्लेषण केले आहे. त्यांचे हे विश्लेषण संपत्तीचा वारसा हक्क, निवास, स्त्रियांची आर्थिक भूमिका, स्त्रियांची लैंगिकता आणि वैवाहिक संबंध या घटकावर आधारलेले आहे.

आशिया हे विविध प्रकारच्या नातेसंबंध व्यवस्थेचे आश्रयस्थान आहे. तेथे तीन प्रकारच्या प्रमुख नातेसंबंध व्यवस्था आढळतात.

१) पितृवंशीय
२) मातृवंशीय
३) द्विपक्षीय

दक्षिण आशिया मुख्यत्वे करुन पितृवंशीय आहे. दक्षिण पश्चिम आणि उत्तर पूर्व खंडात मातृवंशियतेचे केवळ दोन ठिकाणे आहेत. दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशियात पश्चिमेतील अफगाणीस्तानापासूनच्या देशापासून पुर्वेतील फिलीपाईन्सपर्यंतच्या देशाचा समावेश होतो.

**१) पितृवंशीय :**

पितृवंशीय पद्धतीत मुलगे आणि मुली यांना आपल्या वडिलांकडून सामाजिक अस्मिता मिळते आणि त्यांच्या वंशावळीत, खानदानात आणि कूटंबात स्थान मिळते. मुलगा हा या एककांचा कायमचा सदस्य असतो. मुलीकडे मात्र ती वाटेवरचा तात्पुरता मुक्काम करणारी किंवा कायम सदस्य नसलेली या दृष्टिने पाहिले जाते. विवाह झाल्यावर मूलीला माहेरच्या सदस्याला मुकावे लागते आणि सर्वसामान्य परिस्थितीत विवाह हा आवश्यकच मानला जातो.

**२) मातृवंशीय :**

मातृवंशीय समुदायात स्त्री-पुरुष दोघांच्याही मूलांना आईच्या वंशसमुहाचे कायम सदस्यत्व बहाल केले जाते. जे स्त्रीच्या दुव्यातून नातेवाईकांशी जोडले जाते. मूल स्वतःची ओळख आपल्या आईकडून मिळविते. उदा. तारवाड, नायर, खोप इ.

**३) द्विपक्षीय :**

द्विपक्षीय समाजात मूल हे दोन्ही पालकांचे सारखेच मानले जाते तेथे कोणाही एका पालकाला कमी महत्त्व प्रयत्न केला जात नाही. मात्र आईची जीवशास्त्रानुसार भूमिका आणि तिचे मूलाशी असलेले जवळीकतेचे नाते यामुळे तिला जास्त महत्त्व मिळते आणि ती आपल्या मुलांवर हक्क शाबित करु शकते. दोन्ही पालकांकडून मुलांना सामाजिक अस्मिता मिळते आणि दोघांचेही पुर्वज वेगवेगळ्या दिशेचे असले तरी ते नातेसंबंधी मानले जातात.

**आपली प्रगती तपासा**

१) आशियातील प्रचलित नातेसंबंध व्यवस्थेचे विभिन्न प्रकार कोणते आहेत ?

## ४.१.२ मालमत्तेचा वारसा

दक्षिण आशियातील बहूसंख्य हिंदूमध्ये मुलगा संपत्तीचा वारस ठरतो आणि त्याच्याकडून तो वारसा हक्क पूढे चालू राहतो. पारंपारिक संकल्पनेमध्ये मुलींना फक्त उदरनिर्वाहाचा व विवाह यावरच हक्क असतो. यामध्ये संसार उभारण्यासाठी ज्या वस्तू लागतात त्या आणि विवाहप्रसंगी मिळालेल्या भेटवस्तू यांचा समावेश होतो. फक्त मुलांना पुर्वजांच्या वडिलोपार्जित संपत्तीमध्ये मालकीचे अधिकार जन्मामूळे मिळतात. अलिकडील कायद्याने मुलींना देखील वडिलोपार्जित जमिनीत आणि संपत्तीत वाटा मिळत आहे.

उत्तर भारतात जमिन ही पुर्वजांची संपत्ती मानतात. सर्वसामान्यतः अशी समजूत आहे की, मुलीने जर आपला हिस्सा मागितला तर तिला माहेरचे बोलावणे येणार नाही. अधून मधून माहेरकडून मिळणाऱ्या भेटवस्तू स्विकारता येणार नाहीत आणि गरज पडल्यास भावांकडून आधारही मिळणार नाही.

विवाहित मुलीला दिले जाते ते दुसऱ्या कुटुंबाकडे जाते ही भावना फार प्रबळ आहे. अगदी याउलट कल्पना मातृवंशीय लक्षद्विप बेटावर आढळले. तेथे असे समजतात की, एखाद्या माणसाने आपल्या मुलांना संपत्ती भेट दिली तर तिचे तुकडे पडतात. भारतात विविध भागांमध्ये स्त्री धनाचा वेगवेगळा अर्थ लावला जातो आता त्याची जागा हुंड्याने घेतली आहे.

## ४.१.३ निवास

हिंदू भारत आणि नेपाळ यामधील आदर्श निवासाची कल्पना ही पितृवंशीय आणि पितृकेंद्री संयुक्त कुटुंब अशी आहे. अलिकडील व्यवसायातील विविधता, स्थलांतर आणि व्यवसायात्मक गरजांमुळे संयुक्त कुटूंबास तडा गेला आहे.

संयुक्त कुटूंब पद्धती अस्तित्वात नसली तरीही अगदी जवळचे पितृवंशीय नाते असलेले पुरुष आणि त्यांच्या पत्नी व मुले एकाच कुटूंबातील मानली जातात. सर्वसाधारणपणे ज्याला पूरक विभक्त कुटूंब म्हणतात त्यामध्ये सामान्यतः विधवा आई किंवा त्या कर्त्या पुरुषाचा वडिल, त्याच्यावर अवलंबून असलेले लहान भाऊ आणि बहिणी हे सगळे एकत्र राहतात.

मुलीला नेहमीच्या संस्कारातून काल्पनिक सासूच्या छायेखाली ठेवले जाते. वधू तिच्या नव्या घरात परकी म्हणूणच प्रवेश करते. तिला कुटूंबामध्ये सामावून घ्यावेच लागते. तिच्याकडे घातक अस्तित्व म्हणून पाहिले जाते. तिला सामावूनही घ्यावे लागते व तिच्यावर नियंत्रणही करावे लागते. खरा संघर्ष असतो तो कुटूंबात खास करुन सासू आणि सून यांच्यामधला. ही सत्तेची चढाओढ असते. संस्कृतीच्याद्वारे ती समजावून घेता येते.

दक्षिण आशियातल्या पितृवंशीय आणि पितृस्थानी समाजात निवासाचे असे परिणाम होतात की, स्त्रीला तिच्या माहेरकडून मिळणारे हक्क ही जातात आणि सासरी हक्काची जागा मिळविण्याची शक्यताही नसते. नव्या घरात तिला एकप्रकारे काही अटिवरच राहावे लागते. त्या अटी म्हणजे तिची योग्य वर्तणूक, घरकामातील तत्परता, वयस्कर व्यक्तींची सेवा, नवऱ्याला सुख देणे, ती आणत असलेल्या भेटवस्तू आणि क्वचित तिची स्वतःची कमाई एखाद्या स्त्रीला कोणत्यातरी किंवा अगदी शुल्लक कारणावरुन सासरच्या घरातून हाकलून दिले जाते.

### ४.१.३.१ घरजावई :

घरजावयासाठी वापरली जाणारी विशेषणे अत्यंत अपमानास्पद असतात. त्याला बेवारसी कुत्रा, ओझ्याने गाढव किंवा आळशी, नालायक माणूस म्हटले जाते.मुलगी एकुलती एक असेल तर आपल्या घरी राहायला येण्यासाठी जावयाचे मन वळविणे पालकांना फार जड जाते. अर्थात अशी व्यवस्था अगदीच आढळत नाही असे नाही.

लक्षद्वीप मध्ये नवरा आपल्या मातृवंशीय नातलगाकडे (उदा. त्याची आई, बहिणी आणि त्यांची मुले, भाऊ इतकेच नव्हे तर आईची आई, तिच्या बहिणी वगैरे) तर त्याची बायको मातृवंशीय नातलगाकडे राहते. तो आपल्या बायकोच्या घरी रात्रीचा पाहूणा असतो. मुले आईकडे असतात आणि घरे सुद्धा स्त्रियांच्याच मालकीची असतात.

**आपली प्रगती तपासा**

१) आशियामध्ये निवास आणि संपत्ती वारसा हक्कांचे कोणते विभिन्न प्रकार दिसून येतात ?

## ४.१.४ दक्षिण पूर्व आशिया

पितृवंशीय दक्षिण आशियापेक्षा द्विपक्षीय दक्षिण पूर्व आशियाचे चित्र वेगळे आहे. तेथे वंश सातत्य किंवा कुटूंबाच्या सातत्येबाबत सांस्कृतिकदृष्ट्या काहीही सक्ती नाही. ते जोडपे बायकोच्या किंवा नवऱ्याच्या पालकांच्या घरी किंवा घराजवळ राहू शकते. ते पालक म्हातारपणी मुलगीच आपली काळजी घेईल. याकडे डोळे लावून बसलेले अशतात. दक्षिण पूर्व आशियातील लोकांच्या बाबतीत हे सर्वसाधारणपणे असल्याचे आढळते. ते पालक आपल्या सुनेऐवजी मुलीकडे राहणे पसंद करतात.

तेथे नवरा-बायको या दोघांच्याही नातेवाईकांच्यामध्ये एक प्रकारचा मोकळेपणा आहे. ही जोडपी उत्पन्न आणि निवास व्यवस्था उपलब्ध आहे अशा ठिकाणी राहणे पसंद करतात.

**४.१.४.१ आर्थिक भूमिका :**

दक्षिण पूर्व आशियातील स्त्रिया महत्त्वाच्या आर्थिक भूमिका बजावतात. पत्नी आणि आई तर त्या असतातच पण त्याचबरोबर त्या अर्थाजनाची कामेही करतात. त्यांची जबाबदारी त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनविते. आणि स्वायत्ता आणि सत्तेचा तो मोठा उपाय आहे. हे थाई, मलेशियन आणि फिलिपिन स्त्रियांच्या बाबतीत खरे आहे. ॲटजेहनिज समाजात जिथे पुरुष दीर्घकाळ घराबाहेर राहतात. तिथे स्त्रिया शेती आणि कुटूंबातील इतर कामेही सांभाळतात.

दक्षिण पूर्व आशियातील स्त्रिया व्यापारात महत्त्वाचा सहभाग घेण्याबाबत ओळखल्या जातात. ते अतिरिक्त उत्पादन निर्माण करतात आणि अन्न, वस्त्र आणि इतर पदार्थ विकण्याचा व्यापारही करतात. या प्रांतात भरतकाम आणि बाटिककला प्रसिद्ध आहेत. ग्रामीण आणि शहरी बाजारपेठेमध्ये स्त्रियांची उपस्थिती आश्चर्यजनक आहे. स्त्रियांची ही भूमिका कितीतरी ठिकाणी अगदी आधुनिक अर्थव्यवस्थेमध्येसुद्धा चालू राहते.

दक्षिण पूर्व आशियामध्ये सगळीकडेच स्त्रिया पैशाच्या उलाढालीत फार वाकबगार असतात असे मानले जाते. आर्थिक व्यवस्थापन आणि धंद्याच्या वाटाघाटीत त्या सामान्यतः त्या पुरुषांपेक्षा वरचढ ठरतात. आपल्या कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणारी नियमित उत्पन्नाविषयी कित्येक स्त्रियांना खात्री असते.

मातृकेंद्री निवासात मुलीचा अर्थाजनातील सहभाग स्पष्टपणे मान्य केला जातो. ती लग्नाच्या वेळी एखाद्या प्रौढ पुरुषाच्या श्रमाची ताकद घेऊन येते आणि तिच्या पुर्नउत्पादनाच्या क्षमतेमुळे ती आणखी जास्त श्रमशक्ती निर्माण करते.

**आपली प्रगती तपासा**

१) दक्षिण पूर्व आशियातील स्त्रियांची आर्थिक भूमिका यावर टीप लिहा.

## ४.१.५ स्त्री लैंगिकता आणि पुनरुत्पादित सत्ता

पहिल्या लग्नाच्या वेळी मुलीचे कौमार्य हे हिंदू आणि इस्लाम दोन्ही धर्मामध्ये अत्यंत मोलाचे समजतात. नहाण येणे हा मुलीवर कडक निर्बंध घालण्याचा योग्य क्षण आला असे समजले जाते. ते निर्बंध लग्न होईपर्यंत चालु राहतात. वयात होणे आणि लग्न होणे यांच्यामधला काळ मर्यादा घालणारा असतो. तो काळ मुलीने पुरुष जातीपासून स्वतःला सांभाळण्याचा आणि आपल्या इच्छांना आवर घालण्याचा काळ समजला जातो.

दक्षिण पूर्व आशियातील स्त्रियांना लग्नानंतरही संरक्षण देणे गरजेचे समजले जाते. निकाह आणि हिंदू विवाह या दोन्ही गोष्टींनी स्त्रियांच्या शरीरावर आणि जगण्यावर पुरुषांचे नियंत्रण प्रस्थापित केले पाहिजे, अशी अपेक्षा असते. भाऊ आपल्या बहिणीच्या पावित्र्याविषयी जागरुक असतात. प्रेम आणि लग्नासाठी भावांनी आपल्या बहिणीची हत्या केल्याची उदाहरणे सामान्य आहेत. पुरुष स्त्रियांच्या जगण्यातील बारिकसारिक गोष्टींवर आणि वर्तनावर सत्ता गाजवितो. त्यांच्या हिंडण्याफिरण्यावर आणि पुरुषांसोबतच्या सहवासावर नियंत्रण घातले जाते. त्यांच्यावर ताबा ठेवण्यासाठी वापरण्यात येणारे तंत्र म्हणजे त्यांना सर्वापासून वेगळे ठेवणे, एकांतवास, त्यांच्या हिंडण्याफिरण्यावर हालचालींवर मर्यादा आणि पुरुषांच्या सहवासावर बंदी हे होत. खास स्त्रियांच्या म्हणून समजलेल्या कौशल्यात त्यांना सतत गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

## ४.१.६ स्त्रियांची लैंगिकता

सामुहिक ताबा मिळवण्याचा दुसरा प्रकार स्त्रियांच्या लैंगिकतेविषयीचा हक्क संपादनाशी संबंधित आहे. पितृवंशीय रक्त पितृकुलातच विशेषतः भावामध्येच असते. अशी समजूत आहे. ते एकमेकांना बदली होऊ शकतात. त्यामुळे एका भावाशी लग्न झाले असले तरी ती स्त्री त्याच्याऐवजी दुसऱ्या भावांना मिळू शकते. खास जमातीत भावा-भावामधले बहूपत्नीत्व आणि जाट भावांनी एखादी स्त्री वाटून घेणे ही त्याची उदाहरणे आहेत.

सरार्स न आढळणारे पण स्त्रियांच्या लैंगिकतेवर हक्क सांगणारे आणखी एक उदाहरण म्हणजे नवऱ्याने आपल्या बायकोला वापरणे. उत्तराखंडातील डोम त्यांच्या बायकांना वेश्या व्यवसायासाठी पाठवतात याचे प्रमुख कारण म्हणजे वधूला हूंडा देताना झालेले कर्ज त्यांना फेडायचे असते. या स्त्रीयांना झालेली मुले त्यांच्या नवऱ्याची नसतात.

दक्षिण पूर्व आशियातील स्त्रियांची लैंगिकता इतक्या कडक निर्बंधाखाली नसते. मलेशियात स्त्री आणि पुरुष या दोघांनाही लैंगिक व्यवहारात साधारणपणे सारखेच नियम पाळावे लागतात. एकदा का लग्न झाले की स्त्रियांना जास्त मोकळीक मिळते. फिलिपिन्समध्ये स्पॅनिश संस्कृतीतून पौरुषाच्या आणि स्त्री-वादाच्या कल्पना घेऊनही स्त्रीया स्वतःला सांभाळण्यामध्ये जास्त सक्षम असतात असे समजतात.

दारिद्र्यामुळे वेश्या व्यवसाय सामान्य आहे. याला मान्यता नाही पण जगण्याचे साधन म्हणून त्याकडे पाहिले जाते. तेथे पालकांना आधार देण्याची जबाबदारी मुलींवर असते पण विवाह झाल्यानंतर त्या स्त्रीयांना हे शक्य होत नाही.

भारतीय पितृवंशीय समाजात परपुरुषांच्या पापी नजरा स्त्रियांवर पडू नये आणि कुटूंबात सुसंवाद साधावा तसेच वडिलधाऱ्यांचा अधिकार आणि दर्जा राखावा आणि सर्वसाधारणपणे स्त्रियांच्या लैंगिकतेचे पुरुषांपासून संरक्षण व्हावे या उद्देशाने स्त्रीयांमध्ये पडदा पद्धती स्वीकारली जाते.

**आपली प्रगती तपासा**

१) आशियातील स्त्री लैंगिकता आणि पुनरुत्पादित सत्ता यांचे सविस्तर वर्णन करा.

## ४.१.७ वैवाहिक संबंध आणि विवाहाचे स्वरुप

हिंदू दक्षिण आशियात विवाहास पवित्र संस्कार मानले जाते. हुंड्याच्या बरोबरच लग्नविधीमध्ये वधू योग्य वराच्या हाती सोपविणे यावर भर दिला जातो. पूर्णपणे विधीवत लागलेले पहिले लग्न आणि दूसरे लग्न यामध्ये दुसऱ्या विवाहास पहिल्या विवाहापेक्षा थोड्या कमी प्रतीचा समजून दोन्हीमध्ये ठळक फरक केला जातो.

सापत्य विधवा आणि घटस्फोटित स्त्रियांचा पुर्नविवाह होणे तसे कठिणच असते. त्यासाठी त्यांच्यातल्या रितीभातीप्रमाणे मृत नवऱ्याच्या कुटुंबापैकी किंवा वंशावळीपैकी कोणाशी तरी त्यांनी पुर्नविवाह करावा अशी अपेक्षा असते किंवा तशी त्यांना परवानगी असावी लागे. नात्यातला पुरुष नसेल आधीच्या नवऱ्याचे कुटूंब व त्या आईला आपली मुले बरोबर घेऊन जायला संमती देत नाही.

दक्षिण आशिया आणि दक्षिण पूर्व आशियातील मुस्लिमांमध्ये वैवाहिक नात्याच्या संदर्भात स्पष्ट परस्पर विरोध दिसून येतो. दक्षिण आशियातील पितृवंशीय मुस्लिमांमध्ये पती-पत्नीचे नाते श्रेष्ठ कनिष्ठ स्वरूपाचे असते. बायको आणि मुले पुरुषांची असतात. लग्नात असा हक्काचा बदल स्पष्टपणे केला जातो. बायकोला घटस्फोटाचा हक्क मर्यादित आहे. पुरुष मात्र त्याच्या बायकोला कारण न देता घटस्फोट घेऊ शकतो. सामान्यतः घटस्फोटाला कलंक चिकटलेला नाही आणि पुर्नविवाह सर्रास होतात.

मातृवंशीय समाजात हीने नवऱ्याची वैयक्तिक सेवा करणे ही कल्पनाच अस्तित्वात नाही. घटस्फोटामुळे संबंधित व्यक्तिचे आयुष्य अपरिहार्यपणे विस्कटून जाण्याइतका गंभीर परिणाम होत नाही.

मलेय लोकांमध्येसुद्धा घटस्फोट सोपा आहे. पत्नी त्या संदर्भात पुढाकार घेऊ शकते. विशेषतः लग्नानंतरच्या काही वर्षात वैवाहिक बंध कमकुवत असते. गृहिणी असूनसूद्धा मलेय स्त्री स्वतः कमाई करते. लग्नाच्या करारात काही अटी घालण्याची प्रथा आहे. त्या अटी मोडल्यास स्त्री आपसूकच लग्नबंधनातून मोकळी होते. या अटी म्हणजे शारीरिक हिंसा, बायकोला टाकून देणे, नवरा कुटूंबाला पोसायला असमर्थ असणे आणि सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिच्या नातलगापासून तोडणे किंवा दूर ठेवणे.

थाई समाजात काही समाजात विवाहाचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण आहे तेथे कोणत्याही समारंभाशिवाय ते लग्नबंधन पक्के होते. फिलिपिन्समध्ये कुटूंबाच्या आर्थिक व्यवहारात स्त्रिला महत्त्वाचे स्थान असते. कुटूंबात आणि कुटूंबाबाहेरचे दोन्ही निर्णय तीच घेते.

## ४.१.८ सारांश

द्विपक्षयीत्वामध्ये लवचिकतेच्या तत्त्वाची जपणूक केली जाते. दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशियातील महत्त्वाची आकडेवारी पुरविण्याबरोबरच हा लेख काही मूलभूत प्रश्न उभे करतो.

- कूटूंबाच्या सातत्यासाठी स्थिर प्रवाह सर्वार्थाने अपरिहार्य असतो का ?
- साधारणतः कोणती किंमत देऊन ही स्थिरता राखली जाते ?
- विवाहातून जन्मलेल्या आपत्याच्या दृष्टीने घटस्फोट हा नेहमीच विनाशकारी ठरतो का ?
- विभक्त कुटूंब आणि त्याच्या कर्मठ सीमारेषा मानवी नात्याच्या दृष्टिने उचित ठरतात का ?
- आपल्या पत्नीच्या आणि मुलांच्या संदर्भात जबाबदारीची जाणीव येण्यासाठी पुरुषाला काही अधिकार देण्याची पूर्वअट आवश्यक आहे का ?
- विशेषतः स्त्रियांच्या लैंगिकतेच्या संदर्भात स्त्रियांचे संरक्षण आणि स्त्रियांवरील नियंत्रण याची साखळी तोडता येईल का ?

**आपली प्रगती तपासा**

१) आशियातील विवाहाचे स्वरूप आणि वैवाहिक भूमिका यावर टीप लिहा.

## ४.१.९ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

Patrilineal : पितृवंशीय
Matrilineal : मातृवंशीय
Bilateral : द्विपक्षीय
Inheritance of property : मालमत्तेचा वारसा
Conjugal Relations : वैवाहिक संबंध

## ४.१.१० सरावासाठी स्वाध्याय

१. निवास आणि संपत्तीचा वारसा हक्क यांच्या संदर्भासह दक्षिण आशिया आणि दक्षिण पूर्व आशियातील नातेसंबंध आणि लिंगभाव संबंध यांचे सविस्तर परिक्षण करा.
२. स्त्री लैंगिकता आणि वैवाहिक संबंध यांच्या संदर्भासह दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशियातील नातेसंबंधाविषयी लिला दुबे यांच्या कल्पनांची चर्चा करा.
३. आर्थिक भूमिका आणि स्त्री लैंगिकता यांच्या संदर्भासह दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशियातील नातेसंबंध आणि लिंगभाव संबंध यांचे सविस्तर परिक्षण करा.
४. दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशियातील रचलेल्या स्त्री लैंगिकता आणि वैवाहिक संबंधाच्या मार्गाचे तपशील लिहा.

## ४.१.१० अधिक अध्ययनासाठी संदर्भ सूची


- दुबे, लिला (२००१), "अंथ्रपोलॉजिकल एक्सप्लोरेशन्स इन जेंडर" सेग पब्लिकेशन, न्यू दिल्ली.
- भागवत विद्यूत (अनुवादित) लिला दुबे, "मानवशास्त्रातील लिंगभावाची मोहिम : परस्परांना छेदणारी क्षेत्रे", डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९.


❖❖❖❖

# ४.२

# समकालीन समाजशास्त्रज्ञ
# ब) टि. के. ऊमन - धार्मिक राष्ट्रवाद आणि लोकशाही राजकारण

**घटक रचना :**


४.२.० उद्दिष्टे

४.२.१ प्रस्तावना

४.२.२ राष्ट्रघडणीसाठी अटी

४.२.३ प्रादेशिकीकरण

४.२.३.१ हिंदू अस्मिता

४.२.३.२ वर्गीकरण

४.२.३.३ मुस्लिमविषयक दृष्टिकोन

४.२.३.४ ख्रिश्चनविषयक दृष्टिकोन

४.२.४ जमातीकरण

४.२.४.१ जमातीकरणाचे तीन प्रकार

४.२.५ सजातीयकरण

४.२.५.१ पेच

४.२.५.२ सजातीयकरणातील अडथळे

४.२.६ सापेक्षतीकरण

४.२.७ सारांश

४.२.८ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.२.९ सरावासाठी स्वाध्याय

४.२.१० अधिक अध्ययनासाठी संदर्भ सूची


## ४.२.० उद्दिष्ट्ये

प्रसिद्ध भारतीय समाजशास्त्रज्ञ टि.के. ऊमन यांचा Religious Nationalism and Democratic Polity : The Indian Case या शिर्षकाचा प्रदिर्घ लेख Oxford Journal मध्ये १९९४ साली प्रकाशित झाला. या लेखात त्यांनी भारताच्या संदर्भात धार्मिक राष्ट्रवाद

आणि लोकशाही राजकारण याविषयीचे विवेचन केले आहे. त्याचे आकलन करुन घेण्याचा प्रयत्न आपणास या प्रकरणामध्ये करायचा आहे.

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- भारतातील धार्मिक राष्ट्रवादाच्या मार्गाचे वर्णन करता येईल.
- प्रादेशिकीकरण, जमातीकरण, सजातीकरण आणि आप्तसंबंधीकरण या संकल्पनांचे आकलन शक्य होईल.

## ४.२.१ प्रस्तावना

भारत हा धार्मिक विविधता असणारा देश आहे. धार्मिक विविधता असणाऱ्या समाजामध्ये धार्मिक राष्ट्रवाद आणि लोकशाही राजकारण यांचे सहअस्तित्व शक्य नाही असे सारभूत प्रतिपादन टि. के. ऊमन यांनी आपल्या लेखात केले आहे. भारतातील धार्मिक राष्ट्रवादाच्या विवेचना संदर्भात ऊमन यांनी हिंदू, मुस्लिम आणि शीख या तीन प्रमुख आणि चांगल्या दस्ताऐवजीकरण असलेल्या धर्मांचा आधार घेतला आहे त्यांनी असे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे की, या तीन धार्मिक समुदायांनी प्रभावी गृहितके, विचारसरणी आणि व्यूहरचना याद्वारे केलेल्या राष्ट्रवादाचा दावा शाश्वत नाही.

## ४.२.२ राष्ट्रघडणीसाठीच्या अटी

राष्ट्रघडणीसाठी किंवा राष्ट्रनिर्मितीसाठी ऊमन दोन मुलभूत अटी अधोरेखित करतात त्या अटी म्हणजे प्रदेश आणि सामान्य भाषा या आहेत. या संदर्भात ते आपले विस्तृत विवेचन मांडतात.

१. पहिली अट म्हणजे प्रदेश जेथील लोक त्या विशिष्ट प्रदेशाला आपली मूळ मातृभूमी मानतात किंवा त्यांना त्यांच्या मातृभूमीवरुन ओळखले जाते.
२. राष्ट्राच्या जडणघडणीसाठी दूसरी अट म्हणजे संवादाचे सामान्य माध्यम असणारी भाषा. ती भाषा कदाचित फारसी विकसित नसेलही पण दैनंदिन जीवनातील व्यवहारासाठी पर्याप्त असते. राष्ट्र म्हणून त्यांनी त्यांची स्वतःची भाषा विकसित केली पाहिजे किंवा दूसऱ्या भाषेचा स्विकार केला पाहिजे. मात्र याचा अर्थ असा नाही की, स्विकृत केलेल्या भाषेने राष्ट्रीय म्हणून असलेल्या भाषेची जागा घेतलीच पाहिजे.

## ४.२.३ प्रादेशिकीकरण

प्रादेशिकीकरण ही धार्मिक समुदायाचा भाग असणारी प्रवृत्ती आहे जी विशिष्ट प्रदेशाला त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण कुटूंब किंवा रिवार असल्याचा दावा करते. परंतू ऊमन यांच्या मते हा दावा तार्किकदृष्ट्या असमर्थनीय आहे. बौद्ध, ख्रिश्चन, इस्लाम धर्मांना स्वतःची पवित्र स्थळे आणि शहरे असली तरी त्यांनी कोणत्याही एका प्रदेशाला पवित्र मानले नाही. धर्मप्रचार, धर्मांतर,

वसाहतवाद याद्वारे हे धर्म स्वतःच्या जन्मभूमीपलिकडे विस्तारले. जगाचे ख्रिस्तीकरण किंवा इस्लामचे सार्वत्रिकीकरण करण्याचा राजकीय प्रकल्प हा प्रादेशिकीकरणाच्या विरोधीच आहे.

### ४.२.३.१ हिंदू अस्मिता :

हिंदू अस्मिता ही ना पुर्णपणे नवी आहे किंवा ना पुर्णपणे जुनी आहे हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. येथे हिंदू अस्मितांच्या मालिका आहेत. पण त्यापैकी कोणतीच एक आदर्श प्रारुप नाही. टि. के. ऊमन यांनी आपल्या लेखात तीन प्रकारच्या हिंदू अस्मितेचा आढावा घेऊन त्याची चिकित्सा केली आहे.

१. हिंदू हे हिंदूस्थानचे मुळ निवासी आहेत. कोणत्याही परकीय आक्रमणापूर्वी आठ किंवा दहा हजार वर्षापूर्वी या भुमीवर हिंदू अविवादित आणि अबादित अशा परिस्थितीत राहत होते.
२. भारतास उदयास आलेल्या धर्मांना मानणारे ते सर्व हिंदू आहेत.
३. हिंदूचे सांकल्पनीकरण हे बंधनयुक्त आणि बहिष्करणीय आहे. त्यामध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

अ) द्विज म्हणजे ज्यांचा दोनदा जन्म होतो किंवा पुर्नजन्म होतो अशा जाती यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य आणि कर्मकांडीयदृष्ट्या स्वच्छ असणारे शुद्र यांचा समावेश होतो.
ब) आर्यभूमी - जी उत्तर भारतीय आहे. ती पंचम जुने अस्पृश्य, आदिवासी, द्रविड यांना बहिष्कृत करते.

अशाप्रकारे हिंदूची तीन वेगवेगळ्या मार्गाने व्याख्या केली जाते. ते मार्ग म्हणजे प्रदेश, धर्म आणि भाषा हे होत.

### ४.२.३.२ वर्गीकरण :

भारतीय लोकसंख्येच्या ८३ टक्के प्रमाण हे हिंदू म्हणून वर्गीकृत झाले आहे. अखंड भारत असताना जगातील सर्वात जास्त मुस्लिम लोकसंख्या येथे होती. इतकेच नव्हे तर भारताच्या फाळणीनंतरही हा जगातील दुसरा मोठा मुस्लिम देश आहे. त्याच बरोबर जगातील झरोष्ट्रीयनांपैकी ८० टक्के भारतात राहतात. सुमारे आठव्या शतकापासून झरोष्ट्रीयन भारतात राहतात. सातव्या शतकात मुस्लिम हे केरळच्या किनाऱ्यावर उतरले. सिरीयन ख्रिश्चन दावा करतात की, इसवी सनाच्या पाचव्या शतकापासून ते सिरीयन ख्रिश्चन धर्मांतराचा दावा करतात. बहुसंख्य मुस्लिम आणि ख्रिश्चन हे अनुसूचित आणि जमातीपासून धर्मांतरीत झालेले आहेत. जर कोणी मुळ निवासाचा निकष गांभीर्याने घेतला तर बहुसंख्य मुस्लिम आणि ख्रिश्चन भारतीय असल्याचा दावा करतात.

जरी भारतात उदयास आलेल्या सर्व धर्मांना हिंदू मानले तरी शीखधर्म सुद्धा दोन धार्मिक राष्ट्रवादांच्या (द्विराष्ट्रवादाच्या) स्पर्धात्मक दाव्याकडे दावा या दृष्टिकोनातून पाहु शकतो.

सामान्यतः ज्यु, झरोष्ट्रीयन आणि बहाई या तीन धार्मिक स्थलांतरीत समुदायाविषयी हिंदू राष्ट्रवाद्यांचा दृष्टिकोन अविभेदी आणि सहिष्णू आहे कारण ते भारताच्या कुठल्याही प्रदेशाला स्वतःची मातृभूमी म्हणून दावा करीत नाहीत. असे असले तरी हिंदू राष्ट्रवाद्यांच्या ख्रिश्चन आणि मुस्लिम समुदायाविषयीचा दृष्टिकोन विरोधी आहे.

### ४.२.३.३ मुस्लिमविषयक दृष्टिकोन :

हिंदू राष्ट्र वाद्यांच्या मुस्लिमांविषयीच्या नकारात्मक दृष्टिकोनाची काही कारणे आहेत.

१. भारतातील मुस्लिमांची लोकसंख्या १०० दशलक्षापेक्षा जास्त आहे. मुस्लिम धर्मीयांची एकगठ्ठा मते हिंदू राष्ट्रवादाच्या विरोधात आहेत.
२. भारताच्या शेजारी असणाऱ्या पाकित्सान आणि बांग्लादेश यांच्याशी भारतीय मुस्लिमांचे असणारे शेजारपणाचे संबंध हिंदू राष्ट्रवाद्यांना अस्वस्थ करतात.
३. हिंदूंची प्राचीन आणि पवित्र भूमीच्या फाळणीसाठी ते मुस्लिमांना जबाबदार धरतात.
४. फाळणीनंतरसुद्धा भारतीय मुस्लिमांना राष्ट्रियतेचा दावा करु दिला जात नाही. उर्दु ही मुस्लिमांची वैशिष्ट्यपूर्ण भाषा आहे.
५. शेवटी काश्मिरी मुस्लिम दावा करतात की काश्मिर ही त्यांची विशिष्ट मातृभूमी आहे.

### ४.२.३.४ ख्रिश्चनविषयक दृष्टिकोन :

१. हिंदू राष्ट्रवाद्यांचा ब्रिटिश राजकर्त्यांच्या विरोधाचा भाग म्हणून असलेला नकरात्मक दृष्टिकोन कायम राहिला आहे.
२. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धर्मांतराच्या हेतूवादी उपक्रमाला नाकारण्यातून त्यांच्याविषयीच्या विरोधाची प्रवृत्ती कायम राहिली आहे.

**संस्कृत - सामान्य प्राचीन भाषा :**

हिंदू राष्ट्रवादी सर्व हिंदूची सामान्य प्राचीन भाषा म्हणून संस्कृत भाषेस प्रस्तावित करतात आणि देवनागरी लिपीतील लिहलेली हिंदी ही भारताची राष्ट्रीय भाषा मानतात पण या संदर्भात काही अडचणी येतात.

१. संस्कृत ही काही मोजक्या लोकांकडून बोलली जाते.
२. संस्कृत ही भाषा हिंदूचा विशेष वारसा आहे हे खरे नाही. आर्यन हिंदूधर्मीय संस्कृत भाषेने ओळखले जातात.

काही इतर इंडो-आर्यन भाषा उदा. बंगाली आणि मराठी यांचासुद्धा हिंदीप्रमाणे समान विकास झाला. अहिंदी भाषिक समुदाय राष्ट्रीय भाषा म्हणून हिंदीचा स्विकार करत नाहीत. हिंदू राष्ट्रनिर्मितीसाठी हिंदी भाषेच्या बाजुने न जाता ते स्वतःच्या भाषेपासून दूर जाण्यास नकार देतात.

**आपली प्रगती तपासा**

१) भारतातील प्रादेशिकीकरण यावर टीप लिहा.

## ४.२.४ जमातीकरण

जमातवाद ही राष्ट्रवादविरोधी सकारात्मक आणि नकारात्मक शक्ती आहे. धार्मिक सामुदायिकतेचा भाग असलेली प्रवृत्ती म्हणून त्याची व्याख्या करता येईल. ती प्रवृत्ती राजकीय समुदाय असल्याचा दावा करते.

### ४.२.४.१ जमातीकरणाचे तीन प्रकार :

टि.के. ऊमन भारतातील जमातवादाला तीन प्रकारे पुढे आणतात.

१. **अलिप्ततावादी जमातवाद :** यामध्ये धार्मिक समुदाय स्वतःला स्वायत्त राजकीय समुदाय म्हणून व्याख्यित करतो. ज्या राज्यांशी ते जोडलेले असतात त्यापासून ते अलग होऊ पाहतात. मुस्लिमांनी पाकिस्तानसाठी केलेली मागणी आणि शिखांची खलिस्तांची मागणी ही त्याचीच उदाहरणे आहेत.

२. **स्वतंत्रवादी जमातवाद :** यामध्ये धार्मिक समुदाय प्रदेशावर आधारित सांस्कृतिक अस्मितांना राष्ट्र म्हणून व्याख्यित करतो. सांस्कृतिक अस्मिता जोपासण्यासाठी किंवा अबाधित राखण्यासाठी त्यांना स्वतंत्र राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेची गरज असते. भारतामधील पंजाबी सुबा म्हणून स्वतंत्र शीख प्रांताची मागणी हे त्याचेच उदाहरण आहे.

३. **कल्याणकारी जमातवाद :** भौतिक वंचिततेने ग्रस्त म्हणून धार्मिक समुदायाद्वारे अशा प्रकारच्या जमातवादाची मागणी केली जाते. त्याच्या निराकरणासाठी राजकीय आरक्षण, नोकऱ्यांमध्ये राखीव जागा, जमिनींचे वितरण यासारखे उपाय केले जाऊ शकतात. यासाठी धार्मिक समुदाय हितसंबंधी गट तयार करतो.

**आपली प्रगती तपासा**

१) जमातवादाचे तीन प्रकार कोणते आहेत?

## ४.२.५ सजातीयकरण

धर्माच्या आधारावर राष्ट्रीयत्वाचा दावा म्हणजे सजातीकरणाची प्रक्रिया होत याचा अर्थ तेथे श्रद्धा आहे आणि सामान्य जीवनशैलीचे लादणे आहे. धार्मिक सामुहिकतेद्वारे राष्ट्रीयत्वाचा दावा हा सांस्कृतिक सजातीयकरणाच्या प्रक्रियेला सुचक असतो. त्यामध्ये सामान्य जीवनशैलीचे लादणे समाविष्ट असते. स्वतंत्र भारतात विभिन्न संदर्भात आणि विभिन्न रूपांमध्ये याची अभिव्यक्ती झालेली दिसते.

हिंदू आणि शीख सामान्य जीवनशैलीचे सहभागी होते आणि आहेतही.

१९६० आणि ७० च्या दशकात सजातीयकरणाची ही अवस्था भारतीयकरण म्हणून पुढे आली जी आता हिंदूत्व म्हणून पुढे आली आहे. ते भारताच्या सर्व लोकांसाठी म्हणून एका सामान्य जीवनशैलीचा प्रसार करतात. अशाप्रकारे जो या जीवनशैलीचा अनुयय करतो तो हिंदू आहे.

जर जीवनशैलीमध्ये पोशाख पद्धती, कर्मकांड, कलेची रूपे, विवाह आणि कुटूंबाचे स्वरूप यांचा समावेश असेल तर विभिन्न प्रदेश आणि भाषिक क्षेत्रातील हिंदूमध्येही फार कमी समानता दिसून येते. असे असले तरी आपण भारताची सांस्कृतिक एकता नाकारित नाही. उदा. भारतीय वर्णव्यवस्थेमध्ये ब्राह्मण उच्च स्थानी आहेत. त्यांच्यासुद्धा खादयानाच्या सवयीमध्ये मोठा फरक आहे. अशाप्रकारे ब्राह्मण हे शाकाहारी असले तरी बंगाली ब्राह्मण मासे खातात आणि काश्मिरी पंडित मांस खातात अशाप्रकारे सर्व हिंदू आणि ब्राह्मणांमध्ये शाकाहार हा सामान्य नाही. परंतू हिंदू गोमास त्याज्य मानतात त्याचा ते उपभोग घेत नाहीत.

हिंदूसाठी गाय पवित्र प्राणी असल्याने गायीच्या कत्तल करण्याविरोधात इथे काही घटना घडलेल्या दिसतात. पण मुस्लिम, ख्रिश्चन आणि कनिष्ठ जातींसाठी गोमास त्याज्य नाही.

समान नागरी कायद्याच्या संदर्भात भारतीय सजातीकरण ऐरणीवर आलेले दिसते. भारतीय नागरिकांसाठी समान नागरी कायदा हा संविधानात्मक आहे पण जेव्हा हिंदू राष्ट्रवादी याचे समर्थन करतात तेव्हा संक्षिप्तवादी अल्पसंख्याकांना तो त्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक अस्मितेवरील आघात वाटतो.

### ४.२.५.१ पेच :

हिंदू राष्ट्रवाद्यांच्या सजातीकरणाचा प्रकल्प अंतर्गत संघर्षाचा निपटारा करतो. सजातीकरण केवळ एकत्रीततेला सूचित करते असे नाही तर समानतेलाही सूचित करते. हिदूत्वाची विचारधारा ही मोठ्या प्रमाणात हिंदूपट्ट्यातील द्विजजातींशी मर्यादित आहे परंतू बहूसंख्य भारतीय लोकसंख्येमध्ये येणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय असणाऱ्या द्रविडीयन हिंदूना विश्वासात घेण्यास त्याला अपयश आले आहे.

#### ४.२.५.२ सजातीयकरणातील अडथळे :

भारतीय समाज हा लोकशाही आणि सांस्कृतिक बहूल समाज आहे.

१. सजातीयकरणाचा अर्थ दुबळ्या अल्पसंख्यांक समुहांना त्यांच्या अस्मिता मागे टाकायला लावून मुख्य प्रवाही संस्कृतीमध्ये संम्मिलीत व्हावयास लावून प्रभूत्व समुहाचे धुरीणत्व निर्माण करणे हा आहे.
२. बहूसंख्य राज्यातील लोकसंख्येमध्ये विविधता आहे. अशातच संम्मिलीकरण आणि नाश हे विविधतेसाठी धोकादायक आहे. बहुविधता आणि लोकशाही विकासाच्या जबाबदारीला हे खंडित करणारे आहेत.
३. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे होणाऱ्या बाह्य प्रभावाला समकालीन समाज कायम वाचा फोडत आहे. अशा परिस्थितीत विविधता आणि बहूविधता आंतरसमूह समानता आणि लोकशाही प्रवाहांचा स्विकार करणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) सजातीयकरण म्हणजे काय? भारतीय समाजात सजातीयकरणावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांची चर्चा करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ४.२.६ सापेक्षतीकरण

सांस्कृतिक सापेक्षतावाद हा सजातीकरणाचा ओघाने आलेला परिणाम आहे. सापेक्षितीकरण ही सर्व प्रकारच्या मानवाची प्रवृत्ती आहे. उदा. सती, अस्पृश्यता यासारख्या प्रथांचा तिरस्कार करण्याची प्रवृत्ती विशिष्ट आहार घेण्याची प्रवृत्ती, पोशाख करण्याची प्रवृत्ती आणि इतर या सर्व प्रवृत्तींचे धर्माच्या नावाखाली समर्थन केले जाते. धर्माच्या संदर्भात सांस्कृतिक सापेक्षतावादास दोन पैलू आहेत.

१. पहिला पैलू म्हणजे सांस्कृतिक सापेक्षतावाद समकालीन संदर्भात अविवेकी प्रथांचे समर्थन करतो.
२. दुसरा पैलू म्हणजे सांस्कृतिक सापेक्षतावाद आधूनिक समाजातील असंबंध आणि असंगत प्रथांवर ठामपणे बोलतो.

हिंदू संक्षिप्तवादी किंवा स्थितीवादी घटक अनेकदा परंपरेच्या नावाखाली सती आणि अस्पृश्यतेसारख्या प्रथांचे समर्थन करतात आणि त्यांना अधिमान्यता देतात.

शीख हिंदू धर्मांच्या मूल्यांचे व परंपरांच्या जपवणूकीचे पालन करतो. शीख पाच प्रकारच्या ‘क’ चे पालन करतात.

- केश
- कंगा
- कच्छ
- कराह
- कृपान

हे घटकसूद्धा धार्मिक सापेक्षतावादास धक्का देतात.

## ४.२.७ सारांश

सजातीयकरणाची विचारधारा ही केवळ नियमने आणि मुल्य आणि प्रथांना प्रमाणित करीत नाही पण ती खालील गोष्टींना सूचविते सुद्धा.

१. वर्तमानकाळात संबंधित नसणाऱ्या प्रथा आणि नियमने आणि पारंपारिक मुल्यांचे पुनरुज्जीवन करणे.

२. धार्मिक अल्पसंख्यांक आणि इतर सहधर्मीयांवर ती मुल्ये लादणे.

## ४.२.८ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

Nationalism : पितृवंशीय
Democratic polity : मातृवंशीय
Homogenization : द्विपक्षीय
Territorialization : मालमत्तेचा वारसा
Communalization : वैवाहिक संबंध
Secesionist Communalism : पितृवंशीय
Separatist Communalism : मातृवंशीय
Welfarist Communalism : द्विपक्षीय
Relativization : मालमत्तेचा वारसा
Religious Fundamentalism : वैवाहिक संबंध

## ४.२.९ सरावासाठी स्वाध्याय

१. भारतीय संदर्भात टि.के. ऊमन यांनी प्रादेशिकीकरण आणि सजातीयकरण यांना कसे स्पष्ट केले, चर्चा करा.

२. प्रादेशिकीकरण आणि सापेक्षितीकरण यांच्या संदर्भासह भारतातील धार्मिक राष्ट्रवादाचे मार्ग तपशीलाने स्पष्ट करा.

३. टि.के. ऊमन प्रणित भारतीय संदर्भात सजातीकरण आणि सापेक्षितीकरण यांचे महत्त्व यावर भाष्य करा.

## ४.२.१० अधिक अध्ययनासाठी संदर्भ सूची


- ऊमन, टि.के. (२००१) "रिलीजन ॲज अ सोर्स व्हायलन्स, अ सोशिओलॉजिकल परस्पेक्टिव्ह" द ॲक्यूमेनियल रिव्हयू, व्हॉल्यूम ५३, इश्यू २, एप्रिल २००१, पृष्ठ क्र. १६८-१७९.
- ऊमन, टि.के. (२००५), "क्रायसिस ॲण्ड कन्टेशन इन इंडियन सोसायटी", सेग पब्लिकेशन, न्यू दिल्ली.
- भोळे, भा.ल. (२००२), "धर्मनिरपेक्ष लोकशाहीपूढील जमातवादाचे आव्हान", डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.


❖❖❖❖

# ५

# भारतीय समाजात समकालीन आव्हाने : जातीय चळवळी किंवा गतिशीलतेची रणनीती

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ परिचय

५.२ जातीय चळवळी किंवा गतिशीलतेची धोरणे

५.२.१ दलित जमवाजमव

५.२.२ दोन जाती आधारित चळवळींचा केस स्टडी

५.३ सारांश

५.४ प्रश्न

५.५ संदर्भ

## ५.० उद्दिष्टे

- भारतीय राजकारणातील जातीय गतिशीलतेचा अभ्यास करणे.
- १९५० नंतर भारतीय राजकारणातील दलित समाजाच्या उदयाचा अभ्यास करणे.

## ५.१ परिचय

जात ही भारतीय समाजातील सर्वात महत्त्वपूर्ण सामाजिक संस्था आहे. जिचे अध्ययन भारतीय समाजशास्त्राच्या प्रारंभापासून सुरु आहे. जातीचे भारतीयांच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि मानसिक जीवनातील प्रभाव आपण अभ्यासले आहे. उच्च जातीयांचे खालच्या जातीवरील वर्चस्व हे अबाधित होते. परंतू १९५० नंतर भारतीय राजकारणात अनेक बदल घडून आले आणि एका नवीन राजकारणाची सुरुवात झाली. ज्यात दलितांच्या सक्रिय समावेशाने उच्चवर्णियांच्या राजकारणाला आव्हान दिले. तसेच आरक्षणाच्या मुद्याला एक जातीय, तसेच राजकीय मुद्दा म्हणून चर्चेला आणले.

## ५.२ जातीय चळवळी किंवा गतिशीलतेची धोरणे

जेव्हा काही सामान्य उद्दिष्टे असतात तेव्हा हालचाल घडते. ही उद्दिष्टे प्रत्यक्षात अंमलात आणली जाऊ शकतात किंवा स्वप्नांच्या रूपात राहू शकतात जी लोकांना मतांसाठी दर्शविली जाते. कुमार यांच्या मते, उत्तर प्रदेशात दोन स्तरांवर जातीय जमवाजमव सहजपणे पाहिले जाऊ शकते. एक शिक्षण, धर्म, राजकारण यासारख्या विविध सामाजिक - राजकीय संघटनांनी आयोजित केलेल्या जातीय संबंधांच्या पातळीवर. उदाहरणार्थ : सर्व उपेक्षित जातींसाठी राजकीय पक्ष आयोजित केला. दुसरे एकल जातीनिहाय राजकारणांची निर्मिती. उपेक्षित जातीमध्ये विशिष्ट जातीसाठी काम करणारा एक राजकीय पक्ष. गुरु (२०१६) असे नमूद करतात की जातीचे वर्गीकरण करण्यात एक मोठी अडचण आहे कारण वर्गाप्रमाणे सामायिक अनुभव अस्तित्वात नाही. प्रत्येक जातीचा अनुभव वेगळा असतो आणि ते अगदी भिन्न असू शकतात.

### ५.२.१ दलित जमवाजमव :

कमल यांच्या म्हणण्यानुसार, भारतीय स्वातंत्र्य लढ्यासह दलितांच्या मानवी हक्कांसाठी संघर्ष सुरु झाला. ही अशी चळवळ होती जिथे दलितांनी इतरांनी त्यांचे प्रतिनिधित्व करण्याऐवजी स्वतःच स्वतःचे प्रतिनिधित्व करण्यास सुरुवात केली, स्वतःच्या हक्कांसाठी आग्रह धरला. डॉ. आंबेडकर यांनी ब्रिटिशांकडून थेट दलितांसाठी राजकीय हक्क मागितले आणि स्वतंत्र व विशेष हक्कांसाठी आग्रह धरला. अन्यथा, दलित राजकीय 'सहकार्य' अर्थात विलीन झालेल्या राजकीय गटात हरवले असते (कमल, २०१५).

### ५.२.२ दोन जाती आधारित चळवळींचा केस स्टडी :

#### १) मराठा आंदोलन :

पारंपारिकरित्या मराठा हे आरक्षणाच्या विरोधात आहेत. १९८२ मध्ये अण्णासोहब पाटील यांच्या नेतृत्वात मराठा महासंघाने जात-आधारित आरक्षणाला विरोध दर्शविला होता. सर्व मराठ्यांना मागासवर्गीय म्हणून वर्गीकृत करावे अशी मागणी करण्यासाठी पाटील यांनी आर्थिक निकषावर आधारित कोटा प्रणालीची मागणी केली (काळे २००६). वास्तविक, आरक्षणाची मागणी करणाऱ्यांनी मंडल आयोगाच्या शिफारशींचा म्हणजे ओबीसी आरक्षणाला विरोध केला. कुमार म्हणाले की, मराठ्यांनी पारंपारिकपणे स्वतःला योद्धा तसेच शेतीप्रधान म्हणून पाहिले आहे, ज्यांची महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वावर पकड होती. तथापि, शेतीतून घटत्या परताव्यामुळे, सेवा आणि ज्ञान यावर आधारित क्षेत्रात जागतिकीकरणानंतरच्या उत्कर्षाचा लाभ घेण्याच्या इच्छेमुळे आणि इतर मागासवर्गीय जातीच्या राजकीय शिडीच्या वाढीवरील भीतीमुळे मराठा समाजाने या समाजाला इतर मागासवर्गीय श्रेणीत समावेश करण्याची मागणी केली. १३ जुलै, २०१६ रोजी मराठा जातीच्या १४ वर्षाच्या शालेय विद्यार्थिनीवर अहमदनगर येथे चार मद्यधुंदांनी निर्घृण सामूहिक बलात्कार करुन तिचा खून केल्याची घटना घडली आणि त्यांनी न्यायाची मागणी केली. मुलींनी या चळवळीचे नेतृत्व केले. चळवळीचे वैशिष्ट्य असे होते की ज्यात एकही नेता नव्हता आणि मोर्चे कोणत्याही घोषणेविना आणि भाषण केल्याशिवाय वितरित केले जात असे, त्यांच्याकडे असलेले फलक आणि भगवे ध्वज हे त्यांचे संदेश पोहोचविण्याकरिता पुरेसे होते. आरक्षणाच्या त्यांच्या मागणीचा त्यांनी पुनरुच्चार केला, सुरुवातीला मराठा आरक्षण १६% हाते, मात्र सध्या शिक्षणात हे १२% आहे आणि २०१९ पर्यंत सरकारी नोकऱ्यांमध्ये १३% आहे.

**२) उत्तर प्रदेशातील राज्य आणि राजकारण :**

१९५० च्या दशकात खालच्या आणि मागास जातींतील लोक राजकीयदृष्ट्या एकत्रित नव्हते आणि सर्वच क्षेत्रावर उच्चवर्णियांचे त्यांच्यावर वाईट रीतीने वर्चस्व राहिले. औपनिवेशिक (वसाहतवादी) काळात उत्तर भारतात ब्राह्मणविरोधी कोणत्याही चळवळीचा इतिहास नाही. परंतु १९६० च्या दशकात खालच्या आणि मागासवर्गीय जाती नवीन महत्त्वपूर्ण राजकीय शक्ती म्हणून समोर आल्या, ज्याने भारतातील राजकीय सत्तेवर वर्चस्व असलेल्या उच्च जातींना विरोध दर्शविला आणि कडक प्रतिकार केला. काँग्रेसचे सरकार पडल्यानंतर अन्य राजकीय पक्षांनी भाजपा, सपा आणि बसपासारख्या मुख्यतः उत्तर प्रदेशमध्ये प्रवेश केला. मंडळ आयोगानंतर उत्तर प्रदेशमध्ये राजकारणाने एकीकडे उच्च जाती आणि ओबींसीमध्ये चकमकी पहिल्या आणि दुसरीकडे ओबीसींना निम्न जातीचा विरोध ही पाहिला. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जेव्हा दलित नेत्यांपैकी एक मुख्यमंत्रिपदी दिसली तेव्हा आतापर्यंत नुसत्या बघ्याच्या भूमिकेत असणाऱ्या दलित लोकांमधील राजकीय वर्तणूक सार्वजनिकपणे बदललेली दिसली.

**आपली प्रगती तपासा**

१) दलित संघर्षाची काही ओळीत चर्चा करा.

२) जातीवर आधारित कोणतीही एक सामाजिक चळवळ सांगा.

## ५.३ सारांश

या भागात जाती-जमवाजमव केल्याने देशाचे राजकीय चित्र कसे बदलू शकते याविषयी चर्चा केली गेली आणि स्वसमूह केंद्रित वर्तन विकसित होऊन ही दीर्घकाळ समस्या असू शकते.

## ५.४ प्रश्न

१) दोन जाती जमातीच्या चळवळीवर टीप लिहा.

२) जाती व राजकारणाचा संबंध उदाहरणासह थोडक्यात सांगा.

## ५.५ संदर्भ


- https://www.ncbi.nlm.nih.gov/pmc/articles/PMC6515727/
- https://unemploymentinindia.cmie.com/
- https://economictimes.indiatimes.com/news/economy/indicators/unemployment-rate-dips-to-23-97-data-from-cmie-shows/articleshow/75689370.cms

- https://www.orfonline.org/expert-speak/anti-globalisation-wave-affect-including-us-eu/
- https://hbr.org/2017/07/globalization-in-the-age-of-trump
- https://www.wired.com/story/how-whatsapp-fuels-fake-news-and-violence-in-india/
- https://theprint.in/india/spreading-fake-news-rumours-on-covid-19-can-land-you-in-jail-for-a-year/387611/
- https://www.ncbi.nlm.nih.gov/pmc/articles/PMC6515727/
- https://www.prsindia.org/theprsblog/explainer-citizenship-amendment-bill-2019
- http://egazette.nic.in/WriteReadData/2019/214646.pdf
- https://www.thehindu.com/news/national/migrant-woes-greatest-manmade-tragedy-in-india-since-partition-ramchandra-guha/article31663219.ece
- https://www.ugc.ac.in/oldpdf/Consolidated%20list%20of%20All%20Universities.pdf
- https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/51963/8/08_chapter%203.pdf
- https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/60853/9/09_chapter%203.pdf
- All the sites have been referred on 12th May 2020.
- Guru, Gopal.(2016) Shifting categories in the discourse on caste and class." Economic and Political Weekly 51, no. 47: 21-25.
- Kumar, M. (2009).Reservations for Marathas in Maharashtra. Economic and Political Weekly, 44(14), 10-12.
- Kamal, W. (2015) India Dalit Assertion and Electoral Politics in India with reference to UP, International Journal of Multidisciplinary Research and Development , Volume: 2, Issue: 6, 230-233
- Mathur, P., &Mascarenhas, L. (2019). LIFESTYLE DISEASES: Keeping fit for a better tomorrow. The Indian journal of medical research, 149(Suppl 1), S129.
- https://www.ncbi.nlm.nih.gov/pmc/articles/PMC6515727/
- Vivek Kumar, (2002) Caste Mobilization in UP and its Impact on Assembly Election, Mainstream, Vol. XXXX, No. 10, cited from https://sg.inflibnet.ac.in/jspui/bitstream/10603/225035/5/07_chapter2.pdf
- Vivek Kumar (2006), India’s Roaring Revolution: Dalit Assertions and New Horizons, Gagandeep Publications, Delhi.


❖❖❖❖

# ६

# वंशिक अस्मिता, लिंगभाव आणि सीमांतीकरणाचे पूर्नउथान

# (RESURGENCE OF ETHNIC IDENTITIES, GENDER AND MARGINALIZATION)

**प्रकरणाची रचना :**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ वंशिक अस्मिता

६.३ वंशिक अस्मिता व्याख्या

६.४ वंशिक अस्मितेची वैशिष्ट्ये

६.५ वंशिक अस्मितेच्या समस्या

६.६ वंशिक अस्मिता समस्या उपाययोजना

६.७ लिंगभाव

६.८ लिंगभाव व्याख्या

६.९ लिंगभावाची वैशिष्ट्ये

६.१० लिंगभावाची समस्या

६.११ लिंगभाव समस्याचे पुर्नउतान

६.१२ सीमांतीकरण

६.१३ सीमांतीकरण व्याख्या

६.१४ सीमांतीकरणची वैशिष्ट्ये

६.१५ सीमांतीकरणाचे घटक

६.१६ सीमांतीकरणाची कारणे

६.१७ सीमांतीकरणाची समस्या

६.१८ सीमांतीकरणाच्या पूर्नउथापनाचा योजनात्मक कार्यक्रम

६.१९ सारांश

६.२० तुमची प्रगती तपासा

६.२१ संदर्भ ग्रंथ

## ६.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

६. सीमांतीकरणाची संकल्पना समजून घेणे.

७. वंशिक अस्मिता, लिंगभाव आणि सीमांतीकरणाचे पूर्नउथानाचे सविस्तर विश्लेषण करणे.

## ६.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

संपूर्ण मानवी समाजाच्या जीवन व्यवहारामध्ये विभिन्नतेचे स्वरूप अभ्यासण्यास मिळते ही विभिन्नता वंशिकता धर्म, लिंग, जात, सांप्रदाय, भाषा, लिपी, सामाजिक आर्थिक, राजकीय आधारे पाहण्यास मिळते. आपल्या समूहामध्ये प्रत्येक व्यक्तिला वंशिक आणि लिंग भावाच्या आधारे जन्मजात अस्तित्व प्राप्त होत असते. त्या आधारे व्यक्ति परंपरेच्या आधारे ओळखी निर्माण होती. त्यानुसार त्यांचे वर्गीकरण आणि भिन्नतेच्या स्वरूपामध्ये स्पष्टता होत असते. त्याची व्यवहारामध्ये जपणूक केली जाते. ही वर्गीकृत स्तरीकृत आणि भेददर्शक व्यवस्था स्त्री-पुरुष वंशिक बहुतसंख्याक अल्पसंख्याक, दलित-सर्वण अवर्ण स्पृश्य, अस्पृश्य, गरीब-श्रीमंत इत्यादी स्वरूपात स्पष्ट होते. ही वास्तवाचा व्यवहार स्पष्ट करते याचा संबंध जाणीव नैनिवेच्या तर्काच्या आधारे स्थापित होतात. वंशिकता व लिंगभाव आणि सीमांतीकरण स्वरूप जरी वेगळे असले तरी या मधून वरचढ श्रेणीरचना कलंक आणि भेदभावाची जाणीव अधिक प्रकट होते. या जाणीवे संघटीत स्वरूप प्राप्त होऊ लागते. यातून समाजव्यवस्था परिवर्तनाच्या संबंधी नवीन उत्थानाचा आणि पुर्नरचनेचा विचाराची जाणीव एकवटण्यास सहाय्य ठरते. यासाठी लोकशाही विचार पद्धतीचा वापर करुन समाजात विषमतेविरुद्ध आवाज उठवण्यात येतो. सत्ता शासनव्यवस्था या समोर आव्हान उभा करण्यात येते. या विषयी उत्थात्मक मार्ग उभारण्यासाठी मानवी हक्क अधिकार आणि सुधारणात्मक योजनाची निर्मिती करुन या संबंधीच्या समस्या सोडवण्यास कार्यक्रमाची आणि व्यवहाराची अमंलबजावणी करण्यात येताना पाहण्यास मिळते. या संबंधी सखोल संकल्पनात्मक विश्लेषणाची सविस्तर मांडणी करणे आवश्यक आहे. या संकल्पना विविध असल्या तरी त्यामधील सहसंबंध हा वंचिततेच्या जाणिवा व्यवहाराशी स्पष्ट होतो. म्हणून या ठिकाणी वंशिक अस्मिता, लिंगभाव आणि सीमांतीकरण यांच्यातील परस्परसंबंध हा त्यांच्या उथानाच्या संबंधी कार्यक्रम समजून घेणे आवश्यक आहे.

## ६.२ वंशिक अस्मिता (ETHNIC IDENTITY)

विविधापूर्ण समाजामध्ये वंश आणि वंशिकतेचे स्वरूप अधिक स्पष्ट दिसते. या संबंधीची अनेक प्रश्न वाढताना पाहण्यास मिळतात. ही समस्या समाजशास्त्र, मानसशास्त्र आणि मानववंशशास्त्र या सामाजिकशास्त्र अभ्यास शास्त्रात अनेक अभ्यास संशोधनाचा करण्यात येत आहेत. वंशिक अस्मिता ही संकल्पना प्रामुख्याने व्यक्तिच्या सामाजिक अस्मिता म्हणुन बहुसंख्या समुदायाच्या संदर्भात समजून घेता येते. ही अस्मिता सामाजिक आणि सांस्कृतिक समूहामधून अधिक स्पष्ट अधोरेखित होते. समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्र अभ्यास शाखामध्ये समुहाच्या पातळीवर वंशिक अस्मितेचा अभ्यास केला जातो.

सध्यकाळात समाजशास्त्र अभ्यास शाखामध्ये वंशिक अस्मिता संकल्पनेचे विश्लेषण बहुआयामी स्वरूपात स्पष्ट केला आहे. ही संकल्पना बहुसंख्यात समूदायावरती वंशिक अस्मिता ही सामाजिक आणि सांस्कृतिक अस्तित्वाची जपणूक आणि पुढील पिढ्यामधील संक्रमन करण्याच्या अनुशंगाने स्पष्ट होते. याचे स्वरूप सामाजिक आणि राजकीय कार्यक्रमावरती स्पष्ट दिसून येते नागरी हक्काच्या प्रश्नासंबंधी अमेरिका देशामध्ये स्पष्ट दिसून येतो यातून Black live matter संबंधीचा जनचळवळ उभारण्याचे उदाहरण समजून घेता येतो.

वंशिक अस्मिता संबंधीचा अभ्यास करत असताना वंशिक समूदयामधील विविध वंशिक अस्मितेचे तुलनात्मक स्वरूप अभ्यास येते. वंशिक अस्मितेमध्ये वंश स्वतःची ओळख किंवा व्यक्तिग स्व लेबल ही वंशिक समूह म्हणून करण्यात येते. वंशिक समुहामधील वंशाविषयीची स्व जाणीव आणि आपलेपणाची भावना आणि वंशिक अस्मितेचे प्रतिनिधित्व या विषयीचे व्यक्तिगत ज्ञान ही मूल्य आधारित आणि समूह वंशिक संबंधीत संस्कृती मूल्य संघटना इत्यादी. मधून स्पष्ट होते. तसेच सामुदायिक संघटनात्मक आणि आपलेपणाची भावना ही वंशिक अस्मितेचे स्वरूप स्पष्ट करते. ही व्यक्तिगत आणि सामुदायिक स्तरावरती ओळखली जाते. ती अल्पसंख्याक म्हणून ओळखले जाते.

वंशिक अस्मिता विकासाच्यामध्ये स्वतःचे वर्गीकरणाचे अस्मिता बांधणीकरण करण्यात होते. या अस्मितीचा संबंध हा मानसिक व्यवहाराशी आहे. त्यांचा संकल्पना आणि निस्पितीकरण यातून वंशिक अस्मितेचा विकास होतो. ही अस्मिता बांधणी कृती निर्माण होते. ही अस्मिता विविध समुदायात वेगळेपण निर्माण करतात त्यांना बहुसंख्या समूदायापासून वेगळेपण निर्माण करणारा समूह म्हणून समजतात. या अस्मितेवरती वंशिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय अस्मितेचे अधिक प्रभाव स्पष्ट दिसतो. वंशिक अस्मिता ही संकल्पना शारीरिक आणि सामाजिक पैलू मधून समजून घेताना गैरसमज निर्माण होतात. ही व्यक्तिगत शारीरिक काळा आणि गोरा रंग या आधारे वेगळी वंशिकता स्पष्ट होते तर वंशिक अस्मितेचे सामाजिक स्वरूप / पैलू हा सामुदायिक एकत्रित समुदाय म्हणून ओळख स्पष्ट होते, यांची संकल्पना सविस्तर अर्थाना समजून घेणे आवश्यक आहे.

## ६.३ वंशिक अस्मितेची व्याख्या (DEFINITION OF ETHNIC IDENTIY)

वंशिक अस्मिता ही संकल्पना समजून घेत असताना वंशिक या शब्दाची निर्मिती कशी झाली हे स्पष्ट करता येईल. Ethnic या इंग्रजी शब्दास वंशिक असे म्हणतात. हा शब्द Ethnic हा लॅटीन आणि ग्रीक या शब्द Ethnicas आणि Ethnikas या दोन्ही शब्दाचा अर्थ Nation राष्ट्र होतो. ग्रीक भाषेत Ethos म्हणजे परंपरा रूढी, रीतीरिवाज आहे Ethnikas आणि Ethos या शब्दामधून लोकांची बांधणी एकत्रीत जीवन जगणे तसेच सार्वजनिक प्रथाचे एकत्रीत साजरीकरण करणे असा आहे. दुसरा शब्द म्हणजे Identity म्हणजे अस्मिता. हा शब्द लॅटिन भाषेत Identitas हा शब्द Idem म्हणजे सारखा आहे. अस्मितेचा अर्थ व्यक्ति किंवा वस्तू संबंधीत सर्व परिस्थिती मध्ये ती स्वतः मध्ये एकसंघ असणे असा आहे. या दोन्ही शब्दामधून Ethnic Identity वंशिक अस्मिता संकल्पना निर्माण झाली याचा अर्थ एखाद्या राष्ट्रामध्ये समान गुणधर्माचे बांधिलकी असणारा रूढी प्रथा परंपराचे पालन करणारा समुदाय

म्हणून ओळखले जाते. वंशिक अस्मिता ही रचनाकृत संकल्पना आहे. त्यामध्ये व्यक्तिगत दृष्टिकोण केंद्रित आहे. जो विशिष्ठ सामाजिक आणि सांस्कृतिक समुदायाशी संबंधी बांधिलकी निर्माण करतो. ही करत असताना वंश, राष्ट्र, कूल, प्रतिक खानपान वेशभूषा, केशभूषा, नृत्य, गायन, संगीत आणि सांस्कृतिक कार्यक्रम या संबंधीचा घटकाशी संबंध स्पष्ट होतो. वंशिक अस्मिता ही पुढच्या पिढ्यांना हस्तांतरीत करण्यात येते त्यामुळे सातत्य आणि गतिशीलतेमुळे वंशिक अस्मितेचे अस्तित्व टिकून आहे.

१) **फ्रेड्रीक बर्थ (Fredric Barth 1969)** यांच्या मते “वंशिक अस्मिता म्हणजे प्रत्येक समुदायामध्ये परस्पराच्या मध्ये सिमारेषा निर्मिती केली जाते त्यास वंशिक असे म्हणतात.”

२) **फिन्नये (Phinney)** “वंशिक अस्मिता ही बहुआयामी एका अस्मितेच्या संदर्भात निर्मिती आहे ती निश्चित वर्गीकरण नाही पण स्व आणि वंशिक पार्श्वभूमि विविध पैलूंची समज आहे. ती व्यक्तिगत म्हणून निर्मित आणि पूर्ननिर्मित संबंधित वंशिक जाणीव जागृत निर्माण करतात ती सामाजिक सांस्कृतिक बाजू मध्ये स्पष्ट दिसते.”

३) **युटे चेयुंग (Yuet Cheung 1993)** यांच्या मते “वंशिक अस्मिता म्हणजे वंशिक समुह किंवा वारसा संबंधी असणारी सलगनेशी असणारी मानसिकता म्हणजे वंशिक अस्मिता होय.”

वंशिक अस्मिता ही परिस्थिती संबंधीत आणि संदर्भतरूप संबंधीत आहे. वंशिक समूहामध्ये जाणीव ही पुढच्या पिढ्यांना प्रसारित करण्यात येते. त्यामुळे व्यक्तिगत आणि सामुदायिक जीवनात संस्कृती भाषा प्रतिके आणि इतर घटकाच्या माध्यमातून वंशिक अस्मितेची बांधणी होते.

## ६.४ वांशिक अस्मितेची वैशिष्ट्ये (CHARACTERISTICS OF ETHINIC IDENTITY)

वंशिक अस्मिता ही बहुआयामी सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपामध्ये समजून घेता येते. यातून आपली स्वातंत्र्य अस्मिता टिकवून ठेवण्यात येते. हेच त्यांच्या अस्तित्वाचे साहाय्याने ठेवले जाते. याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) भौगोलिक क्षेत्र (Geographical Area) :

वंशिक अस्मिता ही वंशाच्या संदर्भ समजून घेत असताना भौगोलिक क्षेत्राशी संबंधित आहे कारण विशिष्ट भूप्रदेशामध्ये राहणारा वंशिक समुदाय हा लोकसंख्या, स्त्री-पुरुष, सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवहाराच्या संदर्भात समजून घेता येतो. त्या भूप्रदेशावरती राहणाऱ्या लोकांची जीवन पद्धती ही वंशिक अस्मितेची जपणूक करण्याची आणि स्वतंत्र अस्तित्वाची ओळख भौगोलिक क्षेत्रामुळे स्पष्ट दिसून येते.

### २) संदर्भ आणि परिस्थिती (Contextual and Situational) :

वंशिक अस्मिता ही संदर्भ आणि परिस्थितीच्या संबंधीत असते जशी वंशिक अस्मिता ही भौगोलिक क्षेत्राशी संबंधीत असते त्याला सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवहाराचा संदर्भ आणि परिस्थिती संबंध जोडण्यात येतो. ही वंशिक अस्मिता ही संदर्भाला आणि परिस्थितीनुसार वर्तन व्यवहार आणि मानसिकतेशी संबंधित आहे. त्यानुसार वंशिक अस्मितीचे व्यवहार स्पष्ट करता येतो.

### ३) वंशिक अस्मितेची जाणीव (Consciousness of Ethical Identity) :

वंशिक अस्मिता ही जाणीवेच्या व्यवहार आहे. विशिष्ठ भूभाग वरती राहणारा वंशिक समूह हा जाणीवेच्या आधारित संघटित होत असतो आपल्या वांशिक समुहामध्ये आपलेपणाचा भावना आपुलकी सहानूभूति सहकार्य प्रेम जिव्हाळा इत्यादी मधून जाणीव निर्मिती होते. त्यामुळे वांशिक अस्मिता अधिक स्पष्ट दिसुन येते.

### ४) स्वतःची ओळख (Self Identification) :

वंशिक अस्मिता ही स्वतःची ओळख आहे. कारण वंशिक अस्मिता असणारा समूहातील व्यक्ती आपले अस्तित्व स्पष्ट करतात ती करत असताना सांस्कृतिक प्रथा परंपरा, रूढी चालीरिती कायदे लोकनीती इत्यादी माध्यमातून आपले स्वतःची ओळख निर्माण करण्यात येते.

### ५) पारंपारिक दृष्टिकोन आणि पद्धती (Traditional attitude and practices):

वंशिक अस्मिता ही पारंपरिक दृष्टिकोन आणि पद्धती मधून निर्मिती होतो. वंशिक अस्मिता ही पारंपरिक व्यवहाराशी सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवहाराची संबंधित आहे. वंशिक अस्मिता ही परंपराशी संबंधीत असते त्या संबंधीत प्रथा, परंपरा मूल्य नियमने यामधून जीवन जगण्याचा दृष्टिकोन आणि व्यवहार पद्धती निश्चित होत असते. त्या आधारे आपल्या समुहाची वंशिक अस्मिता स्पष्ट करण्यात येते.

### ६) स्वयंकेंद्रीयता (Self Centric) :

वंशिक अस्मिता ही स्वयंकेंद्रियता आधारित आहे. वंशिक अस्मिता व्यक्ती आणि समुहाने धारण केल्यानंतर त्या समुहाशी अपेक्षित असणारी वर्तन रिती ह्या श्रेष्ठ आहेत असा अहमभाव निर्माण केला जातो तेव्हा त्या समुहालाच श्रेष्ठ समजून इतरांना समुहाला दुय्यमतज्ञ देण्याच्या दृष्टीने पाहण्यात येते. परिणामी व्यक्ति आणि समुदाय हेच आपल्या वंशिक अस्मितेला श्रेष्ठ समजुन इतर समुदायाला दुय्यमत्वाची कनिष्ठपणाचा कमी दर्जा लेखनाच्या भूमिका निभावतात.

### ७) वंशिक अस्मिता सांप्रदायिकता (Ethnic Identity Communial) :

विशिष्ट वंशिक अस्मिता ही सांप्रदायिक जीवन पद्धती म्हणून ओळख निर्माण करत असतात. वंशिकतेचा संबंद हा सांप्रदायिक स्वरुप प्राप्त होत असते. त्यामुळे त्याचे विशिष्ट स्वरूपात जीवन व्यवहार स्पष्ट होतो ज्यातून त्यांच्या अस्मितेचे स्वरूप स्पष्ट होते. त्यामुळे इतर समुदायापासून आपल्या जीवन पद्धती वेगळेपणा स्पष्ट करतात त्याला सांप्रदायिकतेचे स्वरूप स्पष्ट आहे.

## ८) संदर्भसमुह (Reference Group):

वंशिक अस्मिता असणारा समुदाय हा संदर्भ समुहामधून व्यवहार स्पष्ट असतो. हा समुहामध्ये विशिष्ट समुहाची रूपी, प्रथा, परंपरा, नियम, मूल्य, जीवनपद्धती संदर्भ समजून आचरणात आणण्याचे काम करत असतात. आपल्या वंशिक अस्मितेची व्यापक जाणीवेच्या आधारे व्यवहार स्पष्ट करतात. त्यामूळे संदर्भ समूह हा सामाजिक धार्मिक सांस्कृतिक राजकीय आर्थिक स्वरूपामध्ये स्पष्ट होतो. त्याचा वर्तनात्मक आचरण जाणीव नेणिवेच्या तर्काशी सुसंगत वर्तन व्यवहार तपासून पाहिला जातो. त्यामुळे वंशिक अस्मिता ही संदर्भ समूहाच्या संदर्भात अर्थपूर्ण व्यवहार स्पष्ट करतो.

## ९) वंशिक अस्मिता गुंतागुलता (Complexity of Ethinic Identity) :

विशिष्ट वंशिक अस्मिता असणारा समूह हा गुंतागुंतीचा व्यवहार स्पष्ट करतात. कारण वंशिक अस्मितेचे स्पष्टीकरण करता येत नाही. त्याच्या जीवन व्यवहार आणि वर्तन पद्धती दिसून येते. प्रत्येक वंशाची स्वतंत्र अस्मिता धारण करण्यात येते त्यामुळे समान वंशाच्या गुणाच्या आधारे असणारा एकमेव वंशिक अस्मिता स्पष्ट होते. त्यामुळे विविधता असणारा वंशिक अस्मिता समुह हा गुंतागुंतीच्या स्वरूपात अस्मिता व्यवहार स्पष्ट करतो.

वंशिक अस्मितेचे स्वरूप हे व्यवहारिक वर्तन व्यवहाराच्या स्तरावरती स्पष्ट होते. हा व्यवहार जाणीव आधार केंद्रित माणून जीवन जगण्याचा कार्य करतात. दैनंदिन व्यवहारातील रुढी, प्रथा, परंपरा नियम मुल्य व्यवहाराचे जीवन अधिक गुंतागुंती मधून स्पष्ट होते. यासाठी वंशिक अस्मिता व्यवहार समजून घेणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) वंशिक अस्मितेची व्याख्या सांगा.

२) वंशिक अस्मितेची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

## ६.५ वंशिक अस्मितेची समस्या (PROBLEMS OF ETHNIC IDENTITY)

जागतिक स्तरावरती वंश धर्म लिंग भाषा प्रांत जाती संस्कृती इत्यादीच्या आधारे विविधता अधिक स्पष्ट दिसते. यामध्ये प्रामुख्याने वंशिक अस्मिते संबंधीच्या प्रश्नाचे स्वरूप अधिक स्पष्ट दिसते. विशेषतः वर्णवादाची समस्या ही वंशिक अस्मिताची समस्या म्हणून दिसून येते. अमेरिका सारख्या प्रगत देशामध्ये वर्ण वादाच्या आधारे अनेक आफ्रिकन निग्रोलोकांना समस्यानीशी मानवी हक्काच्या आधारे संघर्ष करावे लागत आहेत. या देशात सामाजिक आर्थिक राजकीय मागासलेपणा नागरिकत्व स्थलांतरण, मानवी हक्क, आत्मसन्मान, सांस्कृतिक गुंतागुंतता, बहुसंस्कृतीवाद, सापेक्षवचिंतता, सभ्यताकरण आणि जागतिकरण इत्यादी अनेक प्रश्न व समस्यांना वांशिक अस्मितेच्या समुहाला सामोरे जावे लागते.

### १) सामाजिक आर्थिक मागासलेपणा (Socio-Economic Backwardness) :

वंशिक अस्मिता ही सामाजिक आर्थिक मागासलेपणाच्या समस्या अधिक दिसते. वंशिक अस्मितेची जाणीव ही सामाजिक दर्जा व संधी मधील विसंगती अधिक स्पष्ट दिसते. त्यांना असमानता शोषणाच्या माध्यमातून मागास ठेवले असते. वंशिकतेच्या आधारे आर्थिक विकासाच्या संधी साधने आणि नफा मिळवण्याच्या आधारे मागासलेपणा निर्माण केले जाते. आर्थिक शोषणाला वंशिक अस्मिता समुहाना सामारे जावे लागते.

### २) नागरिकत्व (Citizenship) :

वंशिक अस्मिता समुहाना नागरिकत्वाची समस्या अधिक प्रमाणात स्पष्ट दिसते. जागतिक स्तरावरती वंशाच्या आधारे नागरिकत्वाच्या मान्यतेचे स्वरूप पाहण्यास मिळते. वास्तविक पाहता प्रत्येक नागरिकाला नागरिकत्वाच्या समान अधिकार मिळणे हा मुलभूत अधिकार आहे. पण प्रत्यक्षात वर्ण भेदाच्या आधारे काळा-गोरा अशा भेदाच्या आधारे नागरिकत्वाचे अधिकाराची गळचेपी केली जाते. आफ्रिका-आशिया खंडातील कृष्णवर्णी लोकांच्या नागरिकत्वाची समस्या अमेरिका सारख्या प्रगत देशात दिसून येते.

### ३) स्थलांतरण (Migration) :

वंशिक अस्मिता समुदाय ही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित होत असतो हा समुह सातत्याने अस्थिर स्वरूपाचे जीवन जगत आहे. त्यामुळे आपले स्थिरजीवन जगता येत नाही. हा समुदाय शिक्षण आरोग्य नोकरी व्यवसाय शोधासाठी स्थलांतरण करावी लागते. विशेषतः आफ्रिका आशिया देशामधील कृष्णवर्णीय लोक अमेरिका आणि इतर प्रगत देशामध्ये आपल्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी स्थलांतरित होण्याचे प्रमाण अधिक आहे.

### ४) मानवी हक्क (Human Rights) :

वंशिक अस्मिता समुहामध्ये मानवी हक्काची पायमल्ली होण्याचे अधिक प्रमाण आहे. आपली वंशिक अस्मिता सामाजिक आणि सांस्कृतिक आधारावती जपत असताना मानवी हक्काचा उल्लथान केले जाते त्यांनी मानवी अधिकारापासून अधिक वंचित ठेवण्याचा प्रयत्न त्या भागात उच्चवर्णी लोक करताना दिसून येते. उच्च वर्णीय लोक कनिष्ठ वर्णीयांना भेदभाव,

कलंक आणि शोषणाच्या स्वरूपात मानव अधिकाराचे नकारलेपण अधिक व्यापक स्वरूपात करताना पाहण्यास मिळते.

### ५) आत्मसम्मान (Self - Respect):

वंशिक अस्मिता ही सामाजिक वास्तवाची व्यक्तीगत आणि सामुदायिक जाणीव आहे. ही जाणीव आत्मसन्मानाशी संबंधीत आहे जी व्यक्तीच्या आत्मभान आणि व्यक्तिमत्त्वाची जाणीव जागृतीचे व्यवहार स्पष्ट करते. असे असले तरी उच्च वर्णीय आणि कनिष्ठ वर्णीय यातील सामाजिक संबंधाची संरचना ही विषमता भेदभाव आणि शोषणावरती आधारित आहे. तेव्हा उच्च वर्णीय वंशिक गटाकडून कनिष्ठ वर्णीय वंशिक गटाचा आत्मसन्मान जीवन नाकारुन अपमानास्पद कलंकीत आणि भेदभावाची वागणूक देणारी आहे. त्यामुळे वंशिक अस्मिता समुहाला आत्मसन्मानाची वागणूकीच्या समस्येला सामोरे जावे लागते.

### ६) सांस्कृतिक गुंतागुता (Cultural Complex) :

वंशिक अस्मिता ही एक सांस्कृतिक गुंतागुंतीची बाब आहे. ही वंशिक अस्मिता ही सांस्कृतिक व्यवहाराची म्हणजे जीवन जगण्याची बाब म्हणून समोर येते. समाजात विविध वंशाचे लोक आपली सांस्कृतिक जीवन पद्धती रुढ करु पाहत आहे. त्यामुळे प्रत्येक वंश हा इतर वंशापेक्षा वेगळे अलिप्त आणि समिश्रता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असतो. काही वंशामध्ये समिश्र संस्कृती घुसळण अधिक प्रमाणात दिसून यते. त्यामुळे सांस्कृतिक व्यवहाराचा गुंतागुंत समजून येते. याचे अनेक पैलू दिसून येतात हा सांस्कृतिक गुंतागुंत ही वंशिक अस्मितेचा प्रश्न म्हणून दिसून येतो.

### ७) बहुसंस्कृतीवाद (Multi culturalism) :

वंशिक अस्मितेचा प्रश्न हा बहुसंस्कृतीवादाशी संबंधीत आहे. विभिन्न वंशिक समुहामध्ये रूढी, प्रथा, परंपरा, जीवन पद्धती याच्या आधारे संस्कृतीची ओळख स्पष्ट दिसते. यामधून विशिष्ठ संस्कृतीविषय आपलेपणाची भावना वंशिक समुहामध्ये जाणीव केंद्रिय स्वरूपात पाहण्यास मिळते. या मधून बदलता आणि भिन्नता अधिक स्पष्टपणे दिसून येते. यातून संस्कृती गुंतागुंतीचे स्वरूप अधिक स्पष्ट होते. त्यामुळे वंशिक अस्मितेसमोर बहुसंस्कृतीवादाची समस्या म्हणून समोर येते.

### ८) सापेक्षवंचितता (Depravation):

वंशिक अस्मितेचा प्रश्न हा सापेक्षवंचितेशी निगडीत आहे. कारण समाजात वंशिकतेच्या श्रेष्ठ कनिष्ठाचा व्यवहार केला जातो. तेव्हा वंचिततेची जाणीव आणि अनुभव निर्मित होतो. विशिष्ठ वंशिक समुदायाना आपली अस्मिता श्रेष्ठ आहे आणि इतर प्रदेशात तशाच प्रकारची अस्मिता आधार आणि व्यवहार समान असेल असे नाही त्यामुळे सापेक्षवंचिता अधिक जाणवू लागते याची व्यापक जाणीव वंशिक अस्मिता समुदायात अधिक स्पष्ट दिसून येते.

### ९) सभ्यताकरण (Civilization) :

वंशिक अस्मिता प्रश्न समजून घेताना सभ्यता करणाच्या बाजूचा विचार करणे आवश्यक आहे. सभ्यताकरण ही अशी प्रक्रिया आहे. सामाजिक सांस्कृतिक आणि संघटनामता स्तरावरती अधिक प्रगत स्वरूपाची वाटचाल आहे. वंशिक अस्मिता आधारित समुदायामध्ये

सभ्यतेची अवस्था दुय्यम स्वरूपाच्या कमी प्रमाणात वेग दिसतो. त्यामुळे मानवी गरजाच्या आधारे सभ्यताकरण दिसून येते. त्यामुळे कोणत्या वंशाचा सभ्यता श्रेष्ठ आहे हे स्पष्ट दिसून येते. वंशिक अस्मिता ही सभ्यताकरणाच्या विविध स्वरूपात स्पष्ट पाहण्यास मिळतो. पण यामध्ये वंशिक समिश्र स्वरूपाची सभ्यताकरणास संबंध स्पष्ठ होतो. यामुळे वंशिक अस्मितेचे सभ्यताकरण स्पष्ट करणाची समस्या स्पष्ठ होते.

**१०) जागतिकीकरण (Globalization) :**

वंशिक अस्मितेचा प्रश्न हा जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अधिक स्पष्ट होताना दिसून येतो. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपूर्ण विश्व समिश्र आणि एकसंघ स्वरूपात पाहण्यास मिळत आहे. यामध्ये सामाजिक सांस्कृतिक धार्मिक आर्थिक राजकीय स्वरूपामध्ये परिवर्तित होत असल्याचे दिसून येते. याचा परिणाम वंशिक अस्मितेच्या संबंध आणि स्वरूप बदलत आहे. या वंशिकतेमधील उच्च वर्णीय व कनिष्ठ वर्णीय या मधील भेदभाव अत्याचार आणि शोषणाचे स्वरूप व्यापक स्वरूपात पाहण्यास मिळते. यामध्ये अन्याय अत्याचार विरुद्ध प्रतिकार आणि प्रतिरोधाच्या वंशिक अस्मिता चळवळी उभारताना पाहण्यास मिळते.

वंशिक अस्मितेचे प्रश्न हा सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपामधून समजून घेता येतो याचे स्वरूप अधिक व्यापक प्रमाणात दिसते. वंशिक संघर्षाच्या मधून गोरा काळा असा भेद स्पष्ट दिसून येतो. हा भेद मानवतावादाच्या विरोद्धा मध्ये आहे या साठी स्वतंत्र वंशिक अस्मितेची चळवळ निर्माण होते हे केवळ कृष्णीवर्णीय वंशिक समुदायाची भूमिका नसून समस्त मानवजातीने विकसनशील व्यवस्था परिवर्तनाचा मार्ग स्वीकारुन उभारणे आवश्यक आहे तेव्हा वंशिक अस्मिता प्रश्नाच्या मुक्तीचा मार्ग निर्माण करता येईल.

**आपली प्रगती तपासा :**

१) वंशिक अस्मितेच्या समस्येविषयी सविस्तर विश्लेषण करा.

## ६.६ वंशिक अस्मिता समस्येविषय उपाययोजना

जागतिक स्तरावरती वंशिक अस्मिते प्रश्नाच्या सोडवणूकीसंबंधी चर्चा करण्यात येत आहे. कारण संपूर्ण विश्वामध्ये गोरे आणि काळे या दोन वंशामध्ये संघर्ष अधिक स्पष्ट दिसून असतो. केवळ वंशिकतेच्या आधारावरती अन्याय भेदभाव आणि शोषण स्वरूप अधिक घट होताना दिसून येते. ही सामाजिक मानसशास्त्रीय बाब आहे. वंशिक समुदायातील व्यक्तीची मानसिकता ही भेदभाव कलंक वर्चस्व या आधारित सामाजिक संरचना निर्मिती करण्यात आली आहे. या विरुद्ध स्वातंत्र्य समता बंधुता सामाजिक न्याय सन्मान या आधारित मानवतावादी

विचारसरणी अदिक स्पष्ट दिसून येते. वंशिक समूदायातील संघर्ष संपूर्ण त्याच्या उत्कर्षाचा विकासाचा मार्ग निर्माण करणे आवश्यक आहे.

### १) व्यक्तिगत आणि संस्थात्मक स्तरावरती भेदभावास नकार (Regecting Discrimination of Individual and Institution) :

वंशिक अस्मितेचा प्रश्न सोडवत असताना सर्व प्रथम व्यक्तिगत आणि संस्थात्मक स्तरावरील भेदभावास नकार देणे आवश्यक आहे. वंशिकतेच्या आधारावरही कार्यक्रम किंवा शिकण्याचा कार्यक्रम किंवा जीवन जगण्याच्या आधारे स्तरावरती संदर्भ आणि परिस्थिती मधून पूर्व नियोजित आणि शोषणाची कृती करु नये. संस्थात्मक आणि संदर्भ साधनाच्या माध्यमातून समुहा अंतर्गत संबंध सुधारण्यासाठी विशिष्ट कार्यक्रम देऊन त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यातील संरचनात्मक व्यवहारात मुल्यमापन किंवा निवड प्रक्रियेमध्ये स्थानिक स्तरावरती भूमिका निभावने आवश्यक आहे. ज्यातून वंशिक अस्मिता संघर्ष टाळण्यासाठी वर्तन व्यवहाराचे स्वरूप व्यवहारात स्पष्ट करण्यात यावेत.

### २) क्षमता आणि प्रेरणाचा विकास (Development of Motivation and Capability) :

वंशिक अस्मिता समुदायामधील संघर्ष आणि ताणतणावाचे प्रश्न सोडवण्यासाठी वंचित वंशित अस्मिता समुदायामध्ये त्याच्या विकासासाठी त्यांच्या क्षमता आणि प्रेरणाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्या नियोजनाच्या दृष्टीने या संबंधीचे ज्ञान आणि कृती कार्यक्रम देणे आवश्यक आहे. यासंबंधी स्वतःच्या वर्तनामध्ये बदल करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. या संबंधी पूर्वाग्रह दूर करण्याचा कृती कार्यक्रमाची व्यवहारात अंमलबजावणी करण्यात यावी. यामुळे वंशिक अस्मिता समुदायामध्ये क्षमता आणि प्रेरणाचा विकास होऊ शकतो.

### ३) वंशिक अस्मिता समुहाचा सहभाग (Ethinic Identity Group Participation) :

वंशिक अस्मिता समुहाचा सहभाग हा संबंध कार्यक्रम आणि कृती आधारित जाणीव आणि ज्ञानाच्या संबंधीत आहे. व्यक्तिच्या रंगाच्या आधारे मिळणाऱ्या वागणूक विरोधात सहभाग, भेदभाव आणि शोषण नाकारणारा असा कार्यक्रमात सहभाग वाढवणे आवश्यक आहे. ज्यामुळे विभिन्नता नष्ट करता येईल. वंशिक भिन्नतेच्या विरोधात व्यापक जाणीव जागृतीचे कार्य करणे आवश्यक आहे. या माध्यमातून सहभाग वाढवणे आवश्यक आहे.

### ४) सहकार्य आणि समान भूमिका (Cooperative and Equal Roles) :

विभिन्न वंशिक समुदायातील व्यक्तिना सहकर्या आणि समान दर्जाची भूमिका देण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत यासाठी समान संधीची सकारात्मम भूमिका समुहामध्ये करणे आवश्यक आहे. विविध पार्श्वभूमी असणाऱ्या वंशिक अस्मिता समुहाना समान हक्क आणि न्यायाच्या पातळीवरती एकत्र आणण्याचे कार्य करणे आवश्यक आहे. यासाठी प्रभावी धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी संघटनात्मक सहकार्याची कृती कार्यक्रम करणे आवश्यक आहे. याचबरोबर विविध वंशिक अस्मिता समुहातील गटाना एकरुप संघटीत आणण्यासाठी समान दर्जाची भूमिका प्रदान करणे त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या समुहात

सहकार्याबरोबर समुहा अंतर्गत निर्माण झालेले ताणतणाव निर्मान होऊ नये यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**५) सत्ता आणि अधिकार प्रदान करणे (Provid Power and Authority):**

वंशिक अस्मिता समुहा विकासाचे नियोजन हे सत्ता आणि अधिकाराच्या प्रदान करण्यातून होऊ शकते. या समुहाच्या सुधारणेसाठी समुहा अंतर्गत शिकण्याच्या कार्यक्रमाध्ये सहभाग वाढवणे त्यांना कोणत्या परिस्थिती कोणती कृती करावी याविषयी शिक्षण देण्यात येते. याचा परिणाम वंशिक अस्मिता समुदाय मध्ये नेतृत्वाचा विकास बरोबर शोषणाच्या निर्मलनाविषयीचा कृती कार्यक्रम करता येईल. या समुदायातील लोक या कार्यक्रमामुळे समाज स्तरावरती एकत्रित येतील. जे अधिकाराला अपेक्षित असे वर्तन करतील तेव्हा हक्काच्या अंमलबजावणीसाठी सामुदायिक प्रयत्न होऊ शकतील. तेव्हा या समुदायावरील होणाऱ्या अत्याचाराचे निर्मूलन करता येईल.

**६) सतत प्रोत्साहित आणि प्रबलित (Continually Encouraged and Reinforced) :**

वंशिक अस्मिता समुहाच्या विकासासाठी नियोजनबद्ध कार्यक्रमात सतत प्रोत्साहित आणि प्रबलित करण्यात यावे. वंशिक अस्मिता समुहा विविध उपगटामध्ये विभागाला जातो. या उपगटा संघटीतरित्या एकत्र आणून समानतेच्या आणि सकारात्मक अंतर्गत संबंधाची व्यवस्था निर्माण करण्यात येते. तसेच त्याच्या अंगभूत विकास करण्यासाठी प्रोत्साहनपर संधीची उपलब्ध करुन त्याचे प्रश्न कसे सोडवता येतील यासाठी प्रयत्न करता येईल. तसेच त्याच्यातील कमतरता व मर्यादा ओळखून त्याच्या सक्षमी करणासाठी कृती कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी प्रयत्न करणे त्यामुळे वंशिक समुदायाचे विविध स्तरावर होणारे शोषण निर्मूलन करता येईल.

**७) शाळा महाविद्यालय संस्थातील शिक्षण कार्यक्रम (Education Programme of School Education and Organization Level) :**

वंशिक अस्मिता समुहातील समस्या निर्मुलन करण्यासाठी शाळा महाविद्यालय आणि संस्था स्तरावरती कृती कार्यक्रम देणे या संबंधी विद्यार्थ्यामध्ये सामाजिक समानता आणि न्यायाच्या मुल्याआधारित उपक्रम देणे आवश्यक आहे. त्यामुळे वंशिक अस्मिता संघर्षाची मानसिकता दूर जाईल आणि सकारात्मक सामाजिक संबंधाची व्यवस्था निर्माण करता येईल. त्यामुळे संस्थात्मक स्थरावरती सकारात्मक एकत्रिकरण करण्यासामध्ये यश प्राप्त होईल.

**८) वंश, लिंग, सामाजिक वर्ग आणि भाषा या पलिकडे (Cross the Ethinic Gender, Social Class & Language):**

वंशिक अस्मिता समुदायामध्ये अंतर्गत सकारात्मक एकात्मता निर्माण करण्यासाठी वंश, लिंग सामाजिक वर्ग आणि भाषा इत्यादींच्या पलिकडे जाऊन निर्माण करण्यात येईल. तरच सामाजिक एकात्मता आणि समानता बांधणी करण्यात येईल. यासाठी वंशिक समुहामधील अंतर्गत संघर्षाची कारणे ही या संबंधीत अधिक दिसून येतात. त्या समस्या सोडवणूक करण्यासाठी कृती कार्यक्रम देण्यात येतो.

**९) व्यक्तिगत आणि सामुहिक बहुसंस्कृती अस्मिता मूल्य मान्यता (Recognize the value of multicultural identicated individuals and group) :**

वंशिक अस्मिता ही बहुसंस्कृती मुल्याच्या आधारे उपगटात निर्माण करण्यात येत यांना सामुदायिक मान्यता देण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे. कारण गोरे लोक संस्कृती वर्चस्व हे कृष्णवर्णीय संस्कृतीवरती अधिक लादण्यात येते या विरोधात बहुसंस्कृती वंशिक अस्मिता समुहाचे मूल्याचे स्वरूप समजुन घेणे आवश्यक आहे. तरच त्यांच्या अंतर्गत संघर्षाचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल. यासाठी बहुसंस्कृती शिक्षण अभ्यासक्रम देण्यात यावा त्यामुळे शब्दातील विविधतापूर्णता अपेक्षित असणारी समायोजनाची आणि मुल्यनिर्मितीकरण मदत होईल. यामुळे समुहा अंतर्गत एकात्मता निर्माण करण्यात येते.

### १०) दंतकथावरती वाढीवरती प्रकाश टाकणे (Expose the Inaccuracies of Maths) :

वंशित अस्मितीच्या संदर्भात अनेक दंतकथाच्या माध्यमातून संकुचितपणा आणि पूर्वग्रहाता निर्माण करण्यात येते. त्यांच्या स्पष्टीकरणातून दंतकथा विषयीची माहिती उघड करता येईल. उदा. कृष्णवर्णीय लोक हे गुन्हेगार म्हणून कलंकीत केले जाते. याविषयीची दंतकथा अधिक समुहात गैरसमज निर्माण करतात. यामुळे या वंशाच्या लोकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा संकृचित आणि गैरसमजातून अधिक स्पष्ट व्यवहारात दिसून येतो. त्यासंबंधी समुहात या दंतकथाबदल सविस्तर व योग्य माहिती ज्ञान मिळणे आवश्यक आहे. याचा नकारात्मक परिणाम दोन्ही वंशामध्ये तेड तिरस्कार द्वेष निर्माण करण्यात येतो हे समजून याविषयीची ज्ञान सविस्तर प्रसारित करणे आवश्यक आहे.

### ११) विशिष्ट परिस्थितीत समायोजन पद्धती (Adapting Method to the Particular Setting) :

वंशिक अस्मितेची समस्या निर्माण होण्यामध्ये विशिष्ट परिस्थितीत समायोजनाची पद्धती हा कृती कार्यक्रमात समावेश करण्यात यावी. यामुळे समूह अंतर्गत संबंधाची सुधारणा करण्यास मदत होईल. यामध्ये सत्य जाणीवाची अभिव्यक्ती करणे आवश्यक तसेच सर्व मनातील निराशा दूर करुन समायोजन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. यासाठी समुदायात घडणाऱ्या घटना कार्यक्रमात सातत्याने सहभाग नोंदवणे आवश्यक आहे. तसेच सहभागाची वचनबद्धता असावी लागते. यासाठी प्रभावी महत्वपूर्ण योगदान देण्यात यावे. त्यासाठी आवश्यक साधनाचा वापर करण्यात यावा तेव्हा वंशिक अस्मिता प्रश्नांची सोडवणूक करण्यात येऊ शकते.

### १२) सातत्याने वर्तनाच्या परिणामाचे मूल्यमापन (Continuing Evaluation of Outcomes, Especially effects on) :

वंशित अस्मिता प्रश्नासंबंधी वंशिक गटातील वर्तनाच्या परिणामाचे मुल्यमापन करणे आवश्यक आहे. कारण वंशिक अस्मिता ही वर्तन आणि व्यवहाराशी संबंधित बाब आहे. त्या विशिष्ट समुदायातील संरचनाच्या सहभाग आधारे ह्या समस्येचे मूल्यमापन करणे यासबंधी आहे. याविषयी वंशिक समुदायामध्ये कोणत्या प्रकारचे विकासात्मक परिणाम झाले याचा सकारात्मक पातळीवरती स्पष्ट नोंद करणे आवश्यक आहे.

वंशिक अस्मिता समुहाच्या समस्या सोडवण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजनाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरच या समस्या सोडवण्यास मदत होईल. समुहातील अंतर्गतवाद विवाद मोडून त्या ठिकाणी सकारात्मक संघटीत विकास करण्याचे प्रयत्न होणे गरजेचे आहे. तरच सामाजिक संबंधाची संरचना अधिक सक्षम बनत जाईल.

**आपली प्रगती तपासा :**

१) वंशिक अस्मितेच्या समस्ये संदर्भात उपाययोजना सविस्तर लिहा.

## ६.७ लिंगभाव (GENDER)

**प्रस्तावना (Introduction) :**

जागतिक स्तरावरती मानवी समाजाचा अभ्यास करताना स्त्री-पुरुष संबंधाविषयीचा अभ्यास करण्यात आला. विशेषतः सामाजिक शास्त्राच्या अभ्यासामध्ये स्त्री-पुरुष संबंधाच्या विश्लेषणात्मक अभ्यासाला महत्व आले. यामध्ये समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र या अभ्यास शाखेमध्ये याचे सखोल संशोधनात्मक विश्लेषण अभ्यासण्यास मिळते. या अभ्यासात लिंगभाव या संकल्पनेचे विश्लेषण करण्यात आले. लिंगभाव ही सामाजिक संकल्पना म्हणून ओळखतात. ही स्त्रीत्व आणि पुरुषत्व याच्या विभिन्नत्वाची बाब आहे. यामध्ये जीवशास्त्रीय लिंगाचा समावेश करण्याच्या आणि सामाजिक संरचनेच्या संदर्भात लिंगभाव या संकल्पनेचा अर्थ समजून येतो. लिंगभाव आधारित सामाजिक संरचनेचे वर्गीकरण आणि विभेदीकरणाचा अर्थ समजून घेता येईल. याही पलिकडे जाऊन तृतिय पंथी लिंगभावाच्या ओळखीचा समावेश होतो. जे या वर्गीकरणाच्या पलीकडे जाऊन स्वतंत्र अस्मिती असणारा समाज आहे.

सन १९५५ साली जॉन मोन्ये (John Money) यांनी लिंग आणि लिंगभाव या दोन्ही संकल्पनेमधील भेद स्पष्ट केला आहे. त्यांनी लिंग आणि लिंगभावाचे भूमिका म्हणून जैविकतेनुसार करण्यात आली. त्या अगोदर व्याकरणाच्या स्तरावरती लिंगभाव संकल्पनेचा वापर करण्यात आला होता. पण सन १९७० पर्यंत Money यांच्या संकल्पनेचे विस्तृत स्तरावरती स्वीकार करण्यात आला नव्हता, नंतर मात्र स्त्रीवादी सिद्धांतामधून स्त्री आणि पुरुष ही जीवशास्त्रीय मांडणीचे लिंगभावाची सामाजिक संरचना म्हणून समजून घेण्यात आले. सद्यस्थिती मध्ये जागतिक आरोग्य संघटना कडून लिंगभावाच्या संबंधीत संशोधनपर अभ्यास नोंदवण्यात आले आहेत. सन १९८० च्या काळात लिंगभाव संकल्पना ही जीवशास्त्र लिंग समजून घेण्यामध्ये उपयोगात आणली. सन १९९३ साली अमेरिकेतील Food and Drug Administration (F.D.A) यांच्या मते लिंगभाव हा लिंग मधीलच आहे. सन २०११ नंतर (F.D.A) यांनी लिंगभाग संकल्पनेचा अर्थ लिंगभाग ही स्त्री पुरुष स्व प्रतिनित्व आहे की जी व्यक्तिगत स्तरावरती लिंगभावाचे सादरीकरण सामाजिक संस्थाच्या माध्यमातून लोक कसे प्रतिसाद देतात या संबंधीत अर्थ लावण्याची प्रक्रिया आहे.

सामाजिक शास्त्रामध्ये लिंगभाव अभ्यासाचा स्वतंत्र शाखा निर्माण करण्यात आली आहे. या शाखानुसार लिंगभाव ही सामाजिक संरचना आहे आणि लिंगभाव हा जीवशास्त्रीय अभ्यासामध्ये लिंग आधारीत भेद समजून घेण्यात येतो. मानवी समाजातील लिंगभावाचा विकासाचा परिणाम स्त्री-पुरुषावरती पाहण्यास मिळतो. त्यामुळे लिंगभावाची अस्मिता

निर्मितीवरती जैविक आणि सामाजिक घटकावरुन स्पष्ट दिसतो. लिंगभाव सामाजिक भूमिका आणि संबंधाची रचना म्हणून स्पष्ट होते. जी समाजात असमानता, भेदभाव आणि सीमांतीकरणाच्या संबंधीत बाबत आहे. ह्या बहुआयामी वंश सामाजिक आर्थिक दर्जा, अपात्रता, वय, भौगोलिक स्थान आणि लैंगिकता अभिव्यक्ती आधारित व्यवस्था आहे. या अनुशंगाने संकल्पनात्मक अर्थ विश्लेषण समजून घ्यावे लागते.

## ६.८ लिंगभावाची व्याख्या (DEFINITION OF GENDER)

लिंगभाव या शब्दाला इंग्रजीमध्ये असे म्हणतात, हा शब्द लॅटिन भाषेत शब्द पासून तयार झाला आहे. याचा अर्थ वंश किंवा अर्थाचा प्रकार असा समजून घेतला जातो. याचा अर्थ समजून घेताना स्त्री-पुरुष किंवा तृतीयपंथी यांना सामाजिक आंतरक्रिया, कायदेशीर दर्जा, सार्वजनिक व्यक्तिगत अनुभव आणि मानसशास्त्रीय धारणा या आधारे लिंगभाग समजून घेतला जातो.

**१)** जागतिक आरोग्य संघटना यांच्या मते, “लिंगभाव म्हणजे समाजाने निश्चित केलेल्या भूमिका, वर्तन, कृती, व्यक्तिमत्त्व आणि संधीच्या संदर्भातील मुलगा-मुलगी, स्त्री-पुरुष यांच्या संबंधीत बाब आहे. लिंगभाव ही जीवशास्त्रीय लिंगाच्या विभागणी असून ती आंतरक्रियेमध्ये विविध वर्गीकृत विभागणी आहे.”

**२)** कॉलिन्स डिक्सनरी मते, लिंगभाव ही संकल्पना स्त्री-पुरुषी अपेक्षित नितीकरण करण्यात आलेली सामाजिक आणि सांस्कृतिक भूमिकाच्या माध्यमातून संबंधाची व्यवस्था समजून घेणे.

**३)** ऑक्सफर्ड डिक्सनरी मते, “लिंगभाव ही संकल्पना विशेषतः स्त्री-पुरुषाच्या विभिन्नते मध्ये जीवशास्त्रापेक्षा सामाजिक सांस्कृतिक वेगळेपणाच्या संदर्भात निश्चितीकरण केले जाते. ही संकल्पना स्त्री-पुरुषाच्या आदर्श संकल्पनाच्या स्थापनेच्या संबंधीत नसून अस्मितेच्या रेषा अदिक विस्तृत प्रमाणात समजून घेण्यासाठी वापरण्यात आली आहे.”

थोडक्यात, लिंगभाव या संकल्पनेचा अर्थ केवळ जैविक लिंगाच्या आधारे विभागणी नसून ती सामाजिक आणि सांस्कृतिक भूमिकेच्या वर्गीकृत स्त्री-पुरुष या संबंधीत समजून घेतली जाते. ही विभागणी विविध स्तरावरती पाहण्यास मिळते.

## ६.९ लिंगभावाची वैशिष्ट्ये (CHARACTERISTICS OF GENDER)

मानवी समाजामध्ये स्त्री-पुरुष जीवशास्त्रीय लिंग आधारित स्वतंत्र ओळख स्पष्ट होते. या नुसार पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी म्हणुन दोन जाती हे लिंगआधारित समान म्हणून समजून घेतात. पण समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून लिंग ही सामाजिक सांस्कृतिक संकल्पना आहे. जी रुढी, परंपरा, मुल्य नियमनी इत्यादींच्या आधारे सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपात स्पष्ट होतात. ती सामाजिक वर्तन व्यवहाराची पद्धती आहे. त्यानुसार दर्जाला अनुसरुन भूमिकाची

पद्धती सामाजिक संस्था मार्फत शिकवल्या जातात. या वर्तन व्यवहाराच्या स्त्री-पुरुषाच्या लिंगानुसार विभिन्न दिसते. हे भिन्नत्व हे लिंगभाव म्हणजे स्त्री-पुरुष भेदभावाचे स्वरूप विविध सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक राजकीय असा अनेक स्तरावरती पाहण्यास मिळते. हे अदिक समजून घेण्यासाठी लिंगभावाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे समजून घेता येतील.

### १) लिंग आधारित भिन्नता (Sex Differences) :

लिंगभावाचा व्यापक अर्थ समजून घेताना स्त्री आणि पुरुष यांच्यातील लिंग आधारित भिन्नता ही स्त्रीलिंग आणि पुरुषलिंग अशी लिंग भिन्नतत्व जीवशास्त्रीय आधारावरती स्पष्ट होते. असे असले तरी सामाजिक जीवन पद्धती मध्ये स्त्री आणि पुरुषांच्या लिंगभिन्नतेला रुढी, प्रथा, परंपरा नियम मुल्य इत्यादिंच्या आधारित सामाजिक संस्था आणि सामाजिक संरचना या माध्यमातून वर्तन व्यवहाराचे दर्जा व भूमिका निश्चित होतात, तेव्हा लिंगभावाचे समाजीकरण व्यक्तिमत्त्वाच्या विकासातून स्पष्ट दिसून येते. यामधून लिंग आधारित भिन्नत्व हे लिंगभावाचे स्वरूप अधिक स्पष्ट होते. त्या आधारे जीवन जगण्याचा गतिनियम निश्चित होतो.

### २) पुलिंगत्व आणि स्त्रीलिंगत्व (Masculinity and Feminity):

लिंगभावाच्या निर्मितीचा आधारा जीवशास्त्रीय पुलिंगत्व आणि स्त्रीलिंगत्व मधून स्पष्ट होतो. त्या आधारे सामाजिक वर्तन व्यवहाराचे स्वरूप समजून येते. यातून स्त्री आणि पुरुषाच्या भूमिका दर्जा नियमने आणि मुल्याच्या व्यवहार स्पष्ट होतो. यामध्ये पुलिंगी मुल्यामध्ये सामाजिक नियंत्रण प्रतिकृत आणि रचनात्मक मालकी व्यवहाराला महत्त्व आहे याची भूमिका ही आक्रमक, अहंकारी, स्वाभिमानी, उद्धटपणा, अतिशयोक्ती या भूमिकेतून दर्शवत असते. तर स्त्रीलिंगी मुल्य व्यवहार प्रेमळ सहानूभूती भावनिक अहिसंक समजूतदार जिव्हाळा आपुलकी आपलेपणाचे संबंध दर्शवणारी मुल्ये यामध्ये समावेश असतात तर त्याची भूमिका सयंमी, आज्ञाधारक, स्वाभिमानी सेवावृत्ती अंहकाराचा दोष या स्वरूपामध्ये स्पष्ट होतो. पुलिंगत्व आणि स्त्रीलिंगत्व याचा निश्चितीकरण परिस्थिती, सामाजिक संस्था जबरदस्ती भयभिती या आधारे होते. स्त्रीतत्व आणि पुरुषतत्व ही परिस्थितीनुरुप पुरुषाचे वर्चस्व आणि स्त्रीचे दुय्यमत्व निश्चित केले आहे. यामध्ये सामाजिक संस्था धर्म व कुटुंब या मुलभूत संस्था मध्ये स्त्रीयांना दुय्यमत्व देण्यात आले आहे. तसेच स्त्रीयांनी या सामाजिक संस्था आधारित दुय्यमत्वास नकार दिल्यास त्यावरती जबरदस्ती केली जाते. यातून स्त्रीयांना कनिष्ठात्वाच्या वागणूकी मधून शोषण, भिती, कलंक आणि भेदभावाच्या जीवन व्यवहाराचा स्वीकार करावा लागतो.

### ३) पितृसत्तात्मक (Patriarchy) :

लिंगभावाचे स्वरूप समजून घेत असताना स्त्री पुरुषात असमानता निर्माण करण्यात पितृसत्ता व्यवस्था कारणीभूत आहे. ही व्यवस्था सामाजिक संस्था आणि संरचनात्मक व्यवहारातून संबंधाची जाणीव व व्यवहार स्पष्ट नोंदवते. या ठिकाणी पितृसत्ताचा अर्थ हा कुटुंबावर पित्याची अंतिम भूमिका ही मुलांना वारसा हक्क अधिकाराचे सामाजिक व्यवस्थेत स्थान निर्माण करण्यातून समजून घेता येते. या व्यवस्थेमध्ये स्त्रियांना कनिष्ठ स्थान असते. त्यांना कुटुंबीय कोणत्याही प्रकारचे स्थान आणि निर्णय भूमिका घेण्याचा अधिकार नसतो. तसेच वारसा हक्काची मागणी दर्शवता येत नाही. यामध्ये पुरुषी अधिकार वर्चस्वाला महत्त्वाचे स्थान दिले जाते. त्यामुळे सामाजिक परिस्थिती स्त्रीला कनिष्ठ दर्जा दिला जातो. तसेच सामाजिक संस्था आणि संरचनेचे अधिक पितृसत्ताक वर्चस्व व्यवहार स्पष्ट करणाऱ्या असतात. त्यामुळे लिंगभावाचे स्वरूप स्पष्ट होते.

### ४) लिंगभावाचे समाजीकरण (Gender Socialization) :

लिंगभावाच्या व्यवस्थेचे निर्मिती स्त्रीतत्व आणि पुरुषत्वाच्या माध्यमातून होते. ही सामाजिक संस्था आणि संरचनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची प्रक्रिया आहे. ज्यामध्ये वर्तन व्यवहाराचे नियमनाचे अनुकरण आणि स्वयं विकास होण्याची प्रक्रियातील समाजीकरण म्हटले जाते. धर्म आणि कुटुंब या सामाजिक संस्थाच्या माध्यमातून ही प्रक्रिया रुजवली जाते. यातून व्यक्तिच्या वागणूकीची शिकवण व अनुकरण करण्यास चालना मिळते. विशेषतः पितृसत्ताक कुटुंब पद्धतीस पुरुषांना अधिक स्थान असते तर स्त्री कनिष्ठ स्थान असते. हे परिस्थितीजन्य अवस्थेमध्ये संस्कार आणि वर्तनव्यवहार रुजवला जातो. त्यातून लहान मुले आपल्यासारख्या व्यक्तिचे वर्तन शिकून घेतात त्यांची नकल करण्यातून अनुकरण केले जाते. यातून स्त्री पुरुषाच्या जाणीव भावभावना आणि व्यवहाराचे सामाजिक सांस्कृतिक घटकानुसार निश्चित होतात. त्यानुसार पुरुषी वर्चस्व वर्तन प्रकार स्त्रीयांच्या कनिष्ठ स्थान आणि भूमिका निश्चित करते. यामधून असमानतेचे मुल्य प्रस्थापित होणारे लिंगभाव समाजीकरण स्पष्ट नोंदवले जाते.

### ५) लैंगिकतेवरती नियंत्रण (Control on Sexuality):

लिंगभाव अभ्यास करत असताना स्त्री-पुरुष लैंगिकतेवरील नियंत्रणाशी सबंधीत आहे. धर्म आणि कुटुंब संस्थेच्या माध्यमातून लैंगिकतेच्या नियंत्रणाची बंधने लाधण्यात आली आहेत. पुरुष प्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रीयांच्या लैंगिकतेवरती नियंत्रण वर्चस्वाच्या माध्यमातून केले जाते. त्यानुसार स्त्रीयांच्या लैंगिकतेच्या व्यवहारावरती वर्चस्व आणि जबरदस्ती करण्यात येते. परिणामी पुरुषाच्या वर्चस्वाची बंधने स्त्री लैंगिकतेवरती गुलामीची व्यवस्था स्पष्ट करते. या व्यवस्थेत पुरुषी संस्कृती ही स्त्री ही लैंगिक सुखा साठीची वस्तू म्हणून समजली जाते. तिचा पुरुष गरजेप्रमाणे लैंगिक सुख सेवा प्राप्त करुन घेण्यासाठी येते. त्यामुळे स्त्रीयांना कोणत्या पुरुषाशी लैंगिक संबंध ठेवावेत यावरती नियंत्रण येते. विवाहाच्या माध्यमातून स्त्रीला आपल्या पती सोबत लैंगिक संबंध ठेवण्याचा अधिकार प्राप्त होतो तर स्त्री विवाह पूर्व व बाह्य संबंध ठेवण्यास मात्र बंधने लादण्यात येतात. पण पुरुषांना मात्र लैंगिक स्वातंत्र्य देण्यात आले आहे तरी स्त्रीच्या लैंगिकतेला लज्जा आणि मान ह्याचा संबंधीत लैंगिकतेची बंधने पाळली जातात. यामुळे पुरुषी लैंगिक वर्चस्वातून बलात्काराचे अधिक प्रमाण वाढत आहे. याबरोबर अश्लील वाङ्मय, वेश्या व्यवसाय यामधून स्त्री लैंगिकतेवर नियंत्रण व वर्चस्व लादले जाते.

### ६) स्त्रियांचे पुनरुत्पादन नियंत्रण (Control on Female Producation) :

लिंगभाव अधिक नियंत्रण हे स्त्री पुनरुत्पादन संबंधी स्पष्ट दिसते. हे नियंत्रण विविध स्तरावरती नियंत्रण दिसून येते. यामध्ये व्यक्तिगत पुरुष नियंत्रण हे स्त्रीयांना किती मुले असावीत, स्त्रीने गर्भधारणा कधी करावी, केव्हा करावी कि करु नये या विषयीचे स्त्रीला कोणत्याची प्रकारचे स्वांतत्र्य नसते. त्यामुळे व्यक्तिगत पुरुष विषयक नियंत्रण स्पष्ट होते. तसेच यावरती धर्मसत्ता अधिक पुरुषांना अधिकार देते. त्यामुळे स्त्रीला गर्भधारणा करण्याचे नियंत्रण ठेवण्यात येते. मुलांना जन्म देण्याचे स्वातंत्र स्त्रीला देण्यात येत नाही. तसेच राज्यशासन व्यवस्थेकडून स्त्रियांना मुलांना जन्म देण्यावरती नियंत्रण ठेवण्यात आले. यासाठी कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम स्त्रीयांच्यावर मुलांना जन्म देण्यावर नियंत्रण ठेवण्यात आले. यामुळे स्त्रीयांना मुलांच्या जन्म देण्याच्या स्वातंत्र्याचा विषयी चर्चा केली जाते.

### ७) मालमत्ता आणि अन्य आर्थिक स्त्रोतावर नियंत्रण (Control on Property and any economic resources) :

लिंगभावाचे वास्तविक स्वरूप हे स्त्री-पुरुषाच्या मालमत्ता आणि अन्य आर्थिक स्त्रोतावर नियंत्रण संबंधातून स्पष्ट होते. पितृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीयांना संपत्ती आणि आर्थिक स्त्रोतांचे अधिकार दिले जात नाहीत. त्यांना यावरती अधिकार व हक्क ठेवू नये यासाठी अत्याचार केले जातात. स्त्रीयांना उत्पादन निर्मितीच्या साधनावरती अधिकार दिले जात नाही कारण पुरुषांची उत्पादन साधन मालमत्ता समान वाटेकरी होऊ नये यासाठी अधिकार दिले जात नाही. स्त्रीयांना पुरुषांवर अवलंबून व परात्मता अलीकृत राहावे यासाठी त्यांचे मालकी अधिकार टिकू दिले जात नाहीत.

### ८) श्रमाची विभागणी (Division of Labour):

समाजामध्ये स्त्री-पुरुषाची लिंगभाव आधारित श्रमविभागणी केल्याचे दिसून येते हे श्रमविभाग पितृसत्ता आधारित व्यवस्था कायम ठेवण्याच्या आधारे सामाजिक संस्थात्मक आणि संरचनात्मक स्वरुपात करण्यात आले आहे. या माध्यमातून विषमता भेदभाव आणि शोषण आधारे श्रमविभाजनाचे स्वरूप स्पष्ट होते. हे स्त्री पुरुषाच्या कामाच्या विभागणीत पाहण्यास मिळते. पुरुषांना अंग मेहनतीची आणि श्रमावरती मालकी मोबदला मिळवण्याची कामे केली जातात तर स्त्रीला प्रजोउत्पादन बालसंगोपन आणि घरकामे बाहेरील कामे इत्यादी स्वरूपात कामे करावी लागतात. या कामाच्या कोणताही मोबदला वेतन दिले जात नाही. या व्यतिरिक्त शेती, व्यवसाय, नोकरी आणि इतर क्षेत्रातील कामाचा मोबदला स्त्रीयांना कमी प्रमाणात देण्यात येतो. यावरती पुरुषांचा अधिकार स्थापित केला जातो. त्यामुळे स्त्रीने निर्माण केलेले उत्पादन श्रम कौशल्य आणि वेतन यावरील अधिकार पुरुषांकडेच असतो. नव्या भांडवली अर्थव्यवस्थेत स्त्रीयांच्या कामाचे स्वरूप बदलत आहे ते शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या स्वरूपात स्पष्ट होते. हे स्वरूप कुटुंब, नातेवाईक आणि सार्वजनिक क्षेत्रात आढळून येते. स्त्रीयांच्या श्रमाचे लिंगभावाच्या आधारे सार्वत्रिकरण दिसून येते.

### ९) स्त्रीयांच्या जीवनशैलीवरती नियंत्रण (Control on Women lifestyle) :

लिंगभावाच्या आधारे स्त्रीयांच्या जीवन शैलीवरती नियंत्रण प्रस्थापित केले जाते. याला सामाजिक संस्था आणि संरचनेच्या माध्यमातून नियंत्रित केले जाते. विशेषतः धर्म आणि कुटुंबसंस्था स्त्रीयाच्या वर्तन व्यवहारावरती नियंत्रण करत असतात. त्यामध्ये रूढी, प्रथा, परंपरा, मुल्य, नियमने, स्थान, भूमिका इत्यादी आधारे निश्चित केले जाते. त्यानुसार काय कसे, कुठे, केव्हा, का करावे?, करु नये या संबंधीत नियम नियंत्रण स्वरूपात दर्शवित असतात. स्त्रीयांनी आधुनिक विरुद्ध पारंपरिक जीवन पद्धती स्वीकारावी. ही पुरुषसत्ता केंद्री व्यवस्था ठरवत असते. त्यामुळे स्त्रीयांना आपल्या जीवनशैली मुक्तपणे जगता येत नाही.

### १०) अस्मिता राजकारण (Identity Politics) :

लिंगभावाच्या आधारे स्त्री पुरुष विषमता दर्शवली जाते. ही विषमता स्त्री पुरुषाच्या व्यक्तीगत जीवनाच्या अस्तित्वाचे राजकारण दर्शवित असते. स्त्रीची स्वतःची अशी अस्मिता असते. त्याची जाणीव नेणीव अस्तित्वाच्या स्वरुपात नोंदवण्याचा प्रयत्न केला जातो. तेव्हा लिंगभेदाचे राजकारण अधिक स्पष्ट होते. यामध्ये धर्म, वंश, प्रदेश, जात, कुटुंब आणि जीवन

पद्धती ही अस्मितेची केंद्र म्हणून अधिक प्रबळ बनत आहे. त्यामुळे त्याचे व्यक्तिगत कारण बनत आहेत हे या राजकारणात अधिक प्रगल्भ आणि गतिशील बनवत आहेत.

लिंगभावाच्या संकल्पनात्मक वैशिष्ट्याचे विश्लेषणातून स्त्री-पुरुष भेदभावाच्या विषमतेची आणि शोषणाच्या व्यवस्था स्पष्ट होते. ही पितृसत्ता समाज व्यवस्थेत अधिक स्पष्ट होते. या व्यवस्थेत सामाजिक आणि सांस्कृतिक आधारे लिंगभावाचे स्वरूप निश्चित होते. यानुसार रूढी, प्रथा, परंपरा, मुल्य, नियमने या आधारे स्त्री पुरुषाचा वर्तन व्यवहार निश्चित होतो. या मधून स्त्री पुरुषाच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय अधिकाराचे मानसन्मान प्रतिष्ठा आणि हक्काची निश्चिती होते. यामध्ये स्त्रीयांचे परावलंब हेच त्यांच्या शोषणाचे व्यवस्था म्हणून पाहण्यास मिळते.

**आपली प्रगती तपासा :**

१) लिंगभावाची संकल्पना स्पष्ट करा.

२) लिंगभावाची वैशिष्ट्य सविस्तर स्पष्ट करा.

## ६.१० लिंगभावाच्या समस्या (GENDER ISSUES PROBLEMS)

जागतिक स्तरावरती लिंगभावाच्या आधारे स्त्री-पुरुष असमानता याच्या समस्येच्या विविध पैलू संबंधीत घटकाचा समावेश होतो. या सर्व समस्या परस्पर संबंधीत बाबीचा आंतरसंबंधाची व्यवस्था स्पष्ट करते. ही समस्या संसाधन वावर त्याच्या क्रियात्मक संबंधा सोबत स्वातंत्र्य समता न्याय अधिकार संधी सन्मान इत्यादी संबंधीत आहे. ही समस्या आरोग्य, शिक्षण, आर्थिक आणि राजकीय असा अनेक घटकांशी संबधीत आहे. त्यामुळे स्त्रीयांना वर्चस्व, परावलंबत्व, भेदभाव आणि शोषणाच्या स्वरूपात समस्या अधिक प्रमाणात वाढत असल्याचे स्पष्ट दिसून येते.

लिंगभावाची समस्या पुढील मुद्याच्या आधारे समजून घेता येईल.

## १) असमान लिंग गुणोत्तर प्रमाण (Unequal Sex Ratio) :

लिंगभावाची असमानता ही लोकसंख्येतील स्त्री आणि पुरुष यांच्या लिंग गुणोत्तर प्रमाणामध्ये दिसते. यामध्ये मुलींच्या जन्माचे प्रमाण कमी आहे तर मुलांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे लिंग गुणोत्तर प्रमाण असमान स्वरुपात दिसून येते. कुटुंब संस्थेच्या माध्यमातून पितृसत्ता असमान स्वरुपात दिसून येते. कुटुंब संस्थेच्या माध्यमातून पितृसत्ता व्यवस्था अधिक प्रबळ असल्याने मुलींना जन्म देण्याचा निर्णय घेतला जात नाही. त्यामुळे लिंग गुणोत्तर प्रमाण कमी होते. याच बरोबर मुलींना आहार आरोग्य सेवा याचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण वाढत आहे. आरोग्याच्या क्षेत्रात गर्भजन तपासणी करण्यामुळे मुलीच्या गर्भाची हत्या केली जाते. यामुळे लिंगगुणोत्तर प्रमाण असमान दिसून येते.

## २) मुलभूत सुविधांचा अभाव (Lackuna of Basic Facility) :

लिंगभावाची ही अमानवी जीवन पद्धती आहे जी स्त्री-पुरुषांमध्ये मुलभूत सुविधा अभाव व्यवस्था म्हणून पाहण्यास मिळते. पितृसत्ता समाज व्यवस्थेत स्त्रीयांना मुलभूत सुविधा पासून वंचित ठेवले जाते. सर्व सुविधा विषमता आधारे विभागली जाते. त्यामुळे मुलींना आपला विकास राहावे लागते. स्त्रीयांना शिक्षण, आरोग्य, नोकरी, व्यवसाय आणि जीवन जगण्याचे स्वातंत्र्य मिळवून देणे आवश्यक आहे. पण प्रत्यक्षात ही व्यवस्था असमानता सामाजिक संबंध निर्माण करते. तेव्हा स्त्रीयांना मुलभूत सुविधा पासून वंचित ठेवले जाते.

## ३) विशेष संधीची समस्या (Special - opportunity Problem) :

लिंगभावाच्या आधारे स्त्रीयांना विशेष संधी पासून वंचित ठेवण्यात येते. त्यांना शिक्षण, आरोग्य, नोकरी, व्यवसाय, राजकारण अश्या अनेक क्षेत्रामध्ये विशेष संधी उपलब्ध करुन दिली जात नाही. त्यामुळे त्यांच्या विकासाच्या संधी नकार दिल्या जात. परिणाम स्त्रीयांच्या जीवन जगण्याचा दर्जा उंचावता येत नाही. कारण पुरुषांना अधिक वर्चस्व असल्यामुळे स्त्रीला कनिष्ठ स्तरावरती जीवन जगावे लागते. त्यामुळे अपेक्षित विकासाच्या मुळ प्रवाहात येत नाही.

## ४) आरोग्याची समस्या (Health Issues) :

लिंगभावाच्या अनुसरुन स्त्रीयांना पुरेशा आरोग्य सुविधा प्राप्त आल्या नसल्याने आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते. आरोग्य हा मानवी अधिकार आहे. पण प्रत्यक्षामध्ये स्त्रीयांना त्याच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी आणि सुलभतेसाठी सुविधा मिळणे आवश्यक आहे. स्त्रीयांना पोषक आहाराचा अभाव, स्वच्छतेचा अभाव, औषध उपचार दवाखाने, डॉक्टर याच्या सुविधा नसल्या कारण्याने स्त्रीया आरोग्याचा प्रश्न सोडवू शकत नाही. स्त्रीया प्रसुतीच्या वेळी मृत्यूचे प्रमाण अधिक प्रमाणात आहे. त्याचबरोबर शारीरिक, मानसिक आणि लैंगिक आजाराचे योग्य निदान आणि उपचार पद्धती उपलब्ध होत नाही. त्यामुळे या स्त्रीयांना आरोग्याच्या समस्याना सामोरे जावे लागते.

## ५) शिक्षण समस्या (Education Problem):

स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकारापासून वंचित ठेवण्याचे प्रमाण अधिक असल्याने स्त्रीयांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांना मागासलेपणाचे जीवन जगत आहेत. स्त्रीयांना मुलभूत शिक्षणाच्या सोई सुविधांचा अभाव असल्याने त्यांना वंचित राहावे लागते. स्त्रीयांना मुलभूत शिक्षणासोबत व्यावहारिक तंत्रज्ञान आणि इतर शिक्षण सुविधा

उपलब्ध करुन न दिल्याने शिक्षणाच्या आधारे मिळणाऱ्या नवीन संधी आणि सुविधा या पासून वंचित राहावे लागत आहे.

### ६) नोकरी संधीची समस्या (Employment Opportunity Problem) :

स्त्रीयांना नोकरीची संधी अपेक्षेप्रमाणे पूर्ण करणे शक्य होत नाही. त्यामुळे पुरुषा इतकी स्त्रीयांना नोकरिमध्ये संधी मिळत नाही. त्यामुळे स्त्रीयांची आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा होत नाही. त्याचे पुरुषांवरती अधिक परावलंबन प्रमाण वाढत आहे. या क्षेत्रात पुरुषाचे वर्चस्व अधिक प्रमाणात आहे. स्त्रीया नोकरी क्षेत्रातील संधी प्राप्त होत नाही.

### ७) प्रशिक्षण समस्या (Problem of Training) :

स्त्रीयांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. याविषयीची अपेक्षित सुविधा नसल्यामुळे समस्या निर्माण होते. स्त्रीयांना त्यांच्या अंगीभूत कौशल्याचा विकास व्हावा तसेच नवीन माहिती तंत्रज्ञान विषयीची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता अधिक प्रमाणात दिसून येते.

या प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वयंम विकासाचे माध्यम म्हणून वापरण्यात यते. पण प्रत्यक्षात मात्र प्रशिक्षणाचा अभाव अधिक प्रमाणात दिसून येतो.

### ८) लैंगिक अत्याचार (Sexual Harashment):

लिंगभावाचे विदारक वास्तव म्हणून लैंगिक अत्याचाराच्या स्वरूपात पाहण्यास मिळते. स्त्रीयांच्या अत्याच्यारामध्ये वाढ होताना पाहण्यास मिळते. स्त्रीयांच्या असह्यतेचा व परावलंबनाचा फायदा घेऊन स्त्रीयांवरती अत्याचार केले जातात. या अत्याचारात लैंगिक इशारे करणे, स्पर्श करणे, बलात्कार करणे, विनयभंग करणे, अश्लिल साहित्य व व्हिडीयोची निर्मिती करणे. वेश्याव्यवसाय चालवणे, महिला बालकाची विक्री करणे अशा अनेक प्रकारच्या लैंगिक अत्याचाराला सामोरे जावे लागते. यामध्ये स्त्रीयांना शारीरिक मानसिक आणि लैंगिक शोषणाला सामोरे जावे लागते. त्यामुळे दिवसेंदिवस या अत्याचाराचे स्वरूप गंभीर बनत आहे.

### ९) साधन संपत्ती मालमत्तेत असमानता (Unequal Distribution of Property Resources) :

लिंगभावाच्या आधारे स्त्री-पुरुषांची असमानता ही साधन संपत्ती मालमत्तेच्या असमान वाटपातून दिसून येते. स्त्रीयांना कुटुंबामध्ये मालमत्तेचा अधिकार मिळत नाही. कारण पुरुषप्रधान संस्कृती जीवन पद्धती असल्याने स्त्रीयांना साधन संपत्ती मालमत्तेची असमानता निर्माण केली जाते. त्यांच्या मधील असमानतेच्या आधारित सामाजिक हितसंबंधाची व्यवस्था निर्माण केली जाते. त्यामुळे या अधिकारापासून स्त्रीयांना अलगीकृत ठेवले जाते. त्यामुळे स्त्रीयांच्या अधिकारापासून वंचित ठेवले जाते.

### १०) राजकीय सहभाग (Political Participation) :

लिंगभावाच्या माध्यमातून स्त्री-पुरुष भेदभाव हा राजकीय प्रतिनिधीत्व हक्का पासून वंचित ठेवले जाते. स्त्रीया राजकीय प्रतिनिधी सहभाग मिळावा असे पुरुषी वर्चस्वाच्या

मानसिकतेत मान्य आणि स्वीकारशील नाही. त्यामुळे स्त्रीयांना विशेष आरक्षण देऊन, राजकीय सहभाग वाढवण्यासाठी मदत करण्यात आली तरी ही स्त्रीयांचे राजकीय प्रतिनिधित्व त्यांच्या घरातील पुरुष मंडळी करत असतात. त्याचा निर्णायक प्रक्रियेतील सहभाग अत्यल्प असतो. त्याच्या विचाराचा मताचा सल्याचा सहभाग विचारात घेतला जात नाही. त्यामुळे स्त्री राजकीय सहभाग वाढू शकत नाही.

**११) पोलीस न्यायालय प्रशासनाची दुर्लक्ष (Neglected by Police audicery and Administration) :**

स्त्रीयांच्या अत्याचाराच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसते. हे स्त्रीयांच्या भेदभावाच्या अत्याचार आणि कलंकीत करण्याचे प्रमाण आहे. स्त्रीयांना कौटुंबिक, सामाजिक आणि सार्वजनिक कामाच्या ठिकाणी अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. या प्रश्नांकडे पोलीस यंत्रणेकडून दुर्लक्ष केले जाते. त्यांना संरक्षण देण्यामध्ये कमतरता निर्माण होते. न्यायालयीन स्तरावरती स्त्री अत्याचाराचे नोंद घेण्यास विलंब करणे त्यांना न्यायालयामार्फत न्याय मिळवून दिला जात नाही. या सर्व प्रक्रियेत स्त्रीयांचे जीवन जगणे असह्य होऊन जाते.

वरील सर्व मुद्यांमधून लिंगभावाच्या आधारे निर्माण झालेल्या समस्या अधिक समजून घेता येतात. विशेषतः स्त्री-पुरुष भेदभाव ही सर्व सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक राजकीय आणि विविध स्तरावरती पाहण्यास मिळते. हा भेदभाव, कलंक आणि अत्याचार हा पुरुषी वर्चस्वामधून स्पष्ट दिसतो. त्यामुळे स्त्रीयांना या सर्व प्रकाराना सामोरे जावे लागते.

**आपली प्रगती तपासा :**

१) लिंगभावाच्या समस्येचे सविस्तर आढावा घ्या.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ६.११ लिंगभाव विकासाचे पुर्नउथान (RESURENCE OF GENDER DEVELOPMENT)

लिंगभावाची समस्या सोडवण्यासाठी स्त्री-पुरुष समता आधारित समाज निर्माण करण्याचे धोरण आवश्यक आहे. लिंगभावाच्या आधारे समाजामधील सर्व क्षेत्रातील विषमता, भेदभाव, कलंक आणि शोषण मुक्त समाज निर्माण करणे. हे मुख्य उद्देश आहे. जागतिकीकरण आणि आर्थिक विकास परिणाम हा स्त्रीवादी दृष्टिकोणामधून समजून घेण्यात आला आहे. या विकासात स्त्री-पुरुष समानता आधारित विकास करणे. हा विकास करत असताना त्यांची पार्श्वभूमी, लिंग, वर्ग आणि इतर सामाजिक आर्थिक अस्मिता या विषयाचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचा सामाजिक जीवनमानाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल. आर्थिक दृष्टिकोन गुणात्मक स्तरावर विकास करण्यामध्ये कामाची निर्मिती परिणामकारक नियंत्रण आणि

उच्च नोकरी इत्यादी मुळे आर्थिक विकास करण्यामध्ये महत्त्वाचे ठरते. याचबरोबर शिक्षण, आरोग्य, निवासाची सोय, स्वच्छ पर्यावरण आणि गुन्ह्याचे प्रमाण करणे आवश्यक आहे. हे जागतिकीकरण, संस्कृती आणि प्रशासनाच्या संदर्भात स्त्रीयांच्या विकासाच्या योजना कशा करता येतील, त्यांची अंमलबजावणी कशी करता येतील याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

भारताच्या संदर्भात व स्त्रीयांच्य विकासाच्या योजनाच्या निर्मिती करण्यात आली. त्यामुळे त्याच्या विकासाचे धोरण निश्चित केले आहे. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्त्रीयांचे हक्क अधिकार सुरक्षित करण्यात आले. सन १९५० च्या आर्थिक विकास नियोजनामध्ये स्त्रीयांच्या विकासाच्या तरतुदी करण्यात आल्या. यानंतरच्या पंचवार्षिक योजना मधून कुटुंब नियोजन माध्यमातून स्त्रीयांच्या विकासाचे नियोजन करण्यात आले, सन १९६२ साली युनायटेड नेशन जनरल असेम्बिली यांनी कमिशन ऑन द स्टेट्स ऑफ विमेन्स या माध्यमातून विकसनशील देशातील स्त्रीयांच्या संदर्भा विकास धोरण निश्चित करण्यात आले. यामध्ये विकासातील स्त्रीया वरुन स्त्री आणि विकास याचे लिंगभाव आणि विकास असा सामाजिक दृष्टिकोन निर्माण करण्यात आला. जागतिक बँकेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय नाणे निधी मार्फत स्त्री विकासाचे धोरण अंमलबजावणी आणि तरतुदी करण्यात आल्या आहेत. यातून स्ट्रकर्चल एडजेस्टमेंट प्रोग्राम तयार करण्यात आला. या माध्यमातून स्त्रीयांचा विकास करण्यात आला आहे.

स्त्रीयांच्या विकास योजनाची निर्मिती पाचव्या पंचवार्षिक योजना पासून (१९७४-७८) यामध्ये करण्यात आली. त्यांचे मुख्य उद्देश स्त्रियांना निरनिराळ्या क्षेत्रातील उन्नती व कल्याण कार्य ते वकिास या अनुषंगाने करण्यात आला. महिलांना स्वतंत्र दर्जा आणि स्थान मिळवून देण्यासाठी सन १९९० साली लोकसभेत स्त्रियांसाठी राष्ट्रीय कमिशन या कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांच्या हक्क आणि संरक्षण देण्यात आले. भारतीय राज्यघटनेला ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्ती (१९९३) नुसार स्थानिक व स्वराज्य संस्था नगरपालिका महानगर पालिका यात महिलांसाठी राखीव जागाचे प्रतिनिधीत्व आरक्षण तरतुद केली आहे. त्यामुळे महिलांना राज्य पातळीवरती निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी संधी प्राप्त झाली. स्त्रीयांच्या वरती होणाऱ्या अन्याय व अत्याचाराच्या विरोधात चर्चा, आंतरराष्ट्रीय परिषदा आणि मानवी हक्काच्या स्थरावरती होऊ लागली. याचा पाठिंबा देण्यात आला. यातून सन १९९३ साली विविध हिंसाचाराचे निर्मुलन परिषदामधून स्त्री प्रश्नाच्या सोडवणूकच्या चर्चा होऊ लागली. सन १९९५ साली कृतिशील व्यासपिठ (Platfrom for Action) करारनामा यामधून सेशन ऑन जेंडर एक्विलिटी अँन्ड डेव्हलपमेंट अँन्ड पीस फॉर 21th सेंचूरी या शिर्षका बिजींग परिषदेचा जाहिरनाम्याची अंमलबजावणी भारतीय स्त्रीचा विकास धोरणानाच स्वीकार आणि अंमलबजावणी केली. याचा नववी पंचवार्षिक धोरणामध्ये समावेश करण्यात आला.

भारतीय स्त्रीयांच्या विकासासाठी लोकशाही संविधानिक तरतुदी, पंचवार्षिक विकास योजना या माध्यमातून विविध स्तरावरती विकास कार्यक्रम अंमलबजावणी करण्यात आली.

### १) महिला कल्याणासाठीच्या राज्यघटनेतील तरतुदी (Women Welfer In Constitution) :

भारतीय राज्यघटनेमध्ये मुलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तज्ञाच्या आधारे स्त्री-पुरुष समानतेचे अधिकार देण्यात आले. यामध्ये स्त्री-पुरुषांना सामाजिक आणि आर्थिक तत्वावरती

समानतेचा अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळे स्त्रीयांना समान दर्जा आणि वेतनाची समानता देण्यात आली आहे. तसेच प्रत्येक नागरीकाप्रमाणे सर्व उपजीविकेची साधने देण्यात आली आहे. घटनेच्या अनुच्छेद १४ नुसार स्त्री आणि पुरुषांना आर्थिक सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात समान संधी देण्यात आली आहे. या माध्यमातून स्त्रीयांच्या विकासासाठी विविध संधी आणि उपाययोजना बरोबर सन १९५५ चा हिंदू विवाह कायदा सन १९७६ चा समान वेतन कायदा आणि बालविवाह कायदा इत्यादी विषय तरतुदी करण्यात आला.

### २) पंचवार्षिक योजना (Five year Planing) :

भारतातील स्त्रीयांच्या उन्नतीसाठी पहिला पंचवार्षिक योजनात महिला कार्यक्रमाची तरतुद करण्यात आली. सन १९५३ साली केंद्रीय समाज कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली. सन १९५६ साली दुसऱ्या पंचवार्षिक योजनात महिला महामंडळामार्फत सहकार्य करण्यात आली. यामध्ये शिक्षण आणि आरोग्य सेवा योजनाची अंमलबजावणी करण्यात आली. या पुढील योजनामध्ये शिक्षण आरोग्य आणि रोजगार विकासा विषयी भरीव तरतुद करण्यात आली. यातून यांना अधिकार आणि हक्काची जाणीव निर्माण करण्यात आली.

### ३) महिलांसाठी स्वतंत्र विभागाची निर्मिती (Develop Independent Women Sector) :

सन १९७६ साली भारत सरकारने महिलांसाठी स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आली. या विभागामार्फत महिला समुपदेशन, महिला वस्तीगृह इत्यादी स्वतंत्र विभाग करण्यात आले आहेत. या विभागामार्फत गरीब महिलांना केंद्रीय आणि राज्यशासन अंतर्गत महिला सबलीकरणाच्या विविध योजनाची निर्मिती आणि अंमलबजावणी करण्यात आली.

### ४) केंद्रीय समाजकल्याण मंडळ (Centrel Social Welfear) :

भारत सरकारने केंद्रिय स्तरावरती सन १९५३ साली शिक्षण मंत्रालयाच्या प्रस्तावानुसार केंद्रीय समाजकल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली. यामार्फत महिला विकास योजनाची अमंलबजावणी करण्यात आली. स्वयंसेवी संस्था व महिला मंडळामार्फत गरीब महिला ग्रामीण शहरी आणि आदिवासी भागातील महिलांसाठी योजनाचा लाभ देण्यात आला. या अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांमध्ये जागृतीसाठी विविध मेळावे घेणे, महिलांचा कलागुणांना वाव देणे, हस्तकला, शेळीपालन, कोंबडी व्यवसाय, आर्थिक मदत करतात. प्रौढ साक्षरता अभियान, आरोग्य स्वच्छता इत्यादी स्तरावरती कार्य करतात.

### ५) महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय मिशन (National Mission of Women Empowerment):

८ मार्च २०१० साली भारतीय केंद्र सरकारने महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय मिशन योजनेची निर्मिती केली. या योजनेचे उद्दिष्ठा मध्ये महिलांचे सामाजिक आणि आर्तिक विकास योजना मधून सबलीकरण करणे ही योजना राजस्थान मधील पाली जिल्ह्यात सर्वप्रथम करण्यात आली. या योजनेत महिलाकरिता भाव तालुका व जिल्हापातळीवरती योजना निर्माण महिलाची जाणीव जागृत केली. तसेच उद्योगासाठी आवश्यक साधन सामग्री व आर्थिक तरतुदी करणे. या योजनेतून महिलांना सक्षम करण्यावरती भर देण्यात आली.

### ६) राष्ट्रीय महिला आयोग (National Women Communications) :

सन १९९२ साली भारत सरकारने भारतीय संविधानाच्या तरतुदीनुसार राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली. समाजातील सर्व जगातील स्त्रीयांचे संरक्षण आणि विकास साध्य करण्यासाठी असमान दर्जा आणि अन्यायाच्या वागणूकीस प्रतिबंध करणे, कायद्याचा आढावा घेऊन सुधारणा करणे या उद्देशाने राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. सन ३० ऑगस्ट १९९० रोजी राष्ट्रीय महिला आयोग अभियान जनता दलाचे सरकारने प्रेरित करण्यात आले. त्यानंतर ३१ जानेवारी १९९२ रोजी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय महिला आयोगामध्ये एक अध्यक्ष आणि पाच सदस्य असतात. हे सदस्य समाजशास्त्रीय समुह, कायदे पंडित गट औद्योगिक व्यवस्थापन प्रशासन गट, सामाजिक आणि आर्थिक गट, श्रमिक संघटना गट इत्यादी मधून त्याची नेमणूक करण्यात येते. एक सदस्य सचिव प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येते. या आयोगामार्फत महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासासाठी नियोजन प्रक्रियेत सहभागी करुन घेणे, कायद्यामार्फत न्याय मिळवून देणे, जनजागृती प्रशिक्षण देणे, महिला विकास अहवाल तयार करणे, तुरुंग, कारागृहातील स्त्रीयांची आरोग्य तपासणी करणे, शैक्षणिक संशोधन कार्य करणे, कायद्याचे परिक्षण करुन सुधारणा करणे, इत्यादी कार्य केली जातात.

### ७) राष्ट्रीय महिला कोष (National Women Board) :

सन १९९३ साली महिला व बालविकास विभागामार्फत राष्ट्रीय महिला कोषाची स्थापना केली. या आयोगाचा उद्देश ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील गरीब महिलांना त्यांच्या सोयीनुसार कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देणे हा मुख्य उद्देश राष्ट्रीय महिला कोष स्थापना केली. या मार्फत स्वयं सेवी संस्थाना ८.८ टक्के प्रतिवर्ष व्याजावर कर्ज देणे. सदर कर्ज दहा महिन्यासाठी रू. २,५०० प्रति लाभार्थी व २ ते ५ वर्षासाठी रू. ५,००० प्रमाणे लाभार्थी पर्यंत दिले जाते. या संस्था मार्फत महिलांना अर्थसाहाय्य दिले जाते व महिला बचत गट स्थापनेस मदत करणे.

### ८) महिला सबलीकरणासाठी केंद्र शासनाची योजना (Women Empowerment Central Government Policies):

महिलांचा सामाजिक व आर्थिक आणि राजकीय विकासासाठी महिला सबलीकरणाची योजने अंतर्गत विविध योजना करण्यात आल्या. यामध्ये महिला समृद्धी योजना, महिलांच्या शिक्षणासाठी योजना, स्वयंसेवी संस्थासाठी सर्वसाधारण अर्थसहाय्य योजना, राष्ट्रीय पाळणाघर योजना, महिलांसाठी वस्तीगृहे, जैवतंत्रज्ञानानुसार प्रकल्प, प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रमास अर्थसहाय्य योजना, महिला कारागिरांसाठी योजना, राष्ट्रीय महिला कोष, इंदिरा महिला योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोत्री अभियान कायदे, दलित आणि आदिवासी महिला कायदे इत्यादी योजनांचा समावेश करण्यात आला.

### ९) केंद्र शासनाचे महिला विकास धोरण (Center Women Development Policy) :

भारतीय महिला सबलीकरण योजना केंद्र शासनाने महिला विकास धोरण अंमलबजावणी करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश शारीरिक, मानसिक व भावनिक जीवनाची गुणवत्ता सुधारणा करणे हे आहे. सन २००५ हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष घोषित

करण्यात आले. भारतीय स्त्रियांना समान अधिकार, समान संधी, समान कामाचे समान संधी राज्याकडून होणाऱ्या भेदभावापासून संरक्षण देण्यात आले. दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये महिला सबलीकरण व कल्याण याकरिता विशेष तरतुद करण्यात आली. या योजनेची उद्दिष्ट्चे महिलांसाठी आर्थिक आणि सामाजिक धोरणाची निर्मिती महिलांना कार्यक्षम स्वातंत्र्य समान शासन कर्तव्य करणे. स्वतंत्र अंदाजपत्रक महिला सबलीकरण तरतुद करणे, शिक्षण आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात महिला सबलीकरण करणे, शहर आणि ग्रामीणभागात स्थानिक स्वराज्य संस्थात आरक्षण देणे, राज्यस्तरावरती महिला सबलीकरण समिती अध्यक्ष राज्याचे मुख्यमंत्री म्हणून आहे.

### १०) महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण (Womens Policies of Government of Maharashtra) :

सन १९९४ साली महाराष्ट्र शासनाने महिला धोरण निर्माण करण्यातील भारत देशातील पहिले राज्य आहे. हे धोरण १९ भागामध्ये विभागले आहे. या धोरणाचा उद्देश सामाजिक, शारीरिक, मानसिक आणि भावनिक जीवनात सुयोग्य सुधारणा करते, सामाजिक आर्थिक राजकीय, सांस्कृतिक भावनिक क्षेत्रात महिलांची विशेष तरतुद करणे. दुर्बल घटकाचा विकास करणे, महिला प्रशिक्षण देणे, कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण देणे इत्यादी तरतुदी करण्यात आल्या. सन १९९८ साली नवीन महिला धोरण जाहिर करण्यात आले. या धोरणामध्ये महिलांना आर्थिक सबलीकरणावर लक्ष केंद्रीत करण्यात आले. याचबरोबर कायद्याद्वारे महिलांचे सबलीकरण करणे, आर्थिक कार्यक्रम, शिक्षण व साक्षरता आरोग्यविषयक जागृती इत्यादी घटकाचा समावेश करण्यात आला, महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण २००१ याची अंमलबजावणी करण्यात आली. हिला व बालकल्याण विभागामार्फत या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येते. या धोरण समितीमधील एक तृतीयांश महिला सदस्य असतील, महिला संस्थांना उत्पादन विक्रीला प्रोत्साहन देणे, प्रत्येक जिल्ह्यात व्यसनमुक्त केंद्र, लोकसभा व राज्यसभेत महिला एक तृतीयांश आरक्षण देणे, गर्भजल परिक्षण आणि अवैध गर्भपात नियंत्रण, गाव महिला सभा स्थापणे, प्रौढ शिक्षण प्रसाधनगृह बांधणे, देवदासी प्रथा नष्ट करणे या अंतर्गत महिला सबलीकरणासाठी महाराष्ट्र शासनाने योजना निर्माण केल्या. यामध्ये आधारगृहे, सुधारित माहेर योजना, महिला संरक्षणगृह, महिला मंडळ, अनुदान, सामुहिक विवाह योजना, मातृत्व अनुदान योजना, स्वाधार योजना, देवदासी योजना, कामधेनू योजना, स्वयंरोजगार मदत योजना, महिला आर्थिक विकास महामंडळ इत्यादी योजना मधून महिला सबलीकरणाचा प्रयत्न यशस्वीपणे करण्यात आला आहे.

महिला सबलीकरणाच्या योजना मार्फत विकासात्मक भूमिकेची अंमलबजावणी करण्यात येते ही योजना केंद्रीय आणि राज्य स्तरावरती त्याची निर्मिती करण्यात आली. त्या मार्फत महिलांच्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय सबलीकरणाच्या स्तरावरती या योजनाची निर्मिती करण्यात आली. या योजनेचा लाभ वंचित घटकातील महिलांना अधिक प्रमाणात निर्माण करुन त्याच्या विकासाची भूमिका म्हणून या धोरणाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) महिला सबलीकरण योजनाचा थोडक्यात आढावा घ्या.

## ६.१२ सीमांतीकरण (MARGINALIZATION)

### प्रस्तावना (Introduction)

जागतिक स्तरावरती सीमांतीकरणाचा अनुभव प्रत्येक व्यक्ति आणि समुदायाला आल्याचे स्पष्ट होते. सीमांतीकरणाची संकल्पना ही समाजातील विशिष्ठ व्यक्ति आणि समुदाय सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्तरावरती वंचित ठेवले जाते. त्यांना विकासाच्या मुळ प्रवाहामध्ये येऊ दिले जात नाहीत. त्यामुळे विकासाच्या प्रक्रियेत याचा सहभाग व निर्णय प्रक्रियेत सहभाग घेतला जात नाही. या संबंधीची चर्चा व्यापक प्रमाणात करण्यात येत आहे. ही संकल्पना युरोपातील फ्रेंच देशामध्ये वापरण्यात आले. या बरोबर शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र इत्यादी अभ्यासशास्त्रामधून अभ्यास व संशोधन कार्य करत आहे. त्यामुळे बहुअभ्यास शाखाच्या माध्यमातून सीमांतीकरण स्वरूप प्रक्रिया आणि पुर्नउत्थानाची योजना निर्माण करण्यात येत आहे.

सीमांतीकरण ही एक प्रक्रिया आहे जी व्यक्तिगत आणि सामुहिक स्तरावरती विविध अधिकार, संधी आणि साधने याचा पूर्ण वापरण्याचा अधिकारापासून नाकारले जातात. विशिष्ट समुद याचे मानवी अधिकाराचे मुलभूत सामाजिक एकात्मिकरण आणि निरीक्षणातून स्पष्ट दिसते. या व्यक्ति आणि समुदायाचे नोकरी, व्यवसाय, निवारा, आरोग्य, काळजी, नागरी सहभाग, लोकशाही सहभाग, प्रतिनिधीत्व, निर्णय प्रक्रियेतील सहभाग इत्यादीपासून अधिकार हीन अपमानजनक वर्तन, भेदभाव, कलंक, अलगीकृत ठेवण्यात येते त्यामुळे मुलभूत मानवी अधिकारापासून वंचित ठेवण्यात येते.

सीमांतीकरण ही सामाजिक बहिष्काराची प्रक्रिया आहे. ही सामाजिक बहिष्काराची प्रक्रिया वंश, लिंग, धर्म, जात, रंग, शैक्षणिक दर्जा, सामाजिक संबंधाच्या आधारे स्पष्ट होतो. याचबरोबर जीवन जगण्याचा दर्जा राजकीय मते आणि आत्मसभ्रमाशी संबंधीत आहे. जसे की वंशिकवाद, सांप्रदायिकता, लिंगभाव, जातीयवाद भांडवली शोषण, अल्पसंख्याक, लैंगिक अल्पसंख्याक अंपगत्व इत्यादी स्तरावरती सामाजिक बहिष्करण करण्यात येते. यासाठी पूर्व रुढी, प्रथा, परंपरा नियमन आणि मुल्ये याच्या आधारे सामाजिक बहिष्करण माध्यमातून सीमांतीकरण करण्यात आल्याचे स्पष्ट होते. सीमांतीकरणाचा परिणाम सर्वांगीण जीवनावरती होत असला तरी या विरोध, वंचित समुदाय आपल्या मुलभूत हक्क आणि अधिकारासाठी संघर्ष आंदोलने चळवळी उभारत पाहण्यास मिळतात.

## ६.१३ सीमांतीकरणाची व्याख्या (DEFINITION OF MARGINALIZATION)

१) ऑक्सफर्ड डिक्शनरी मते, "सीमांतीकरण ही संकल्पना व्यक्ती आणि समुदायाला सामाजिक आणि आर्थिक स्तरावरती केलेल्या श्रमाच्या मुल्यापासून वंचित ठेवण्यासाठी वागणूक म्हणून सीमांतीकरण ओळखले जाते."

२) कॅमरिज डिक्शनरी मते, "सीमांतीकरणाचा अर्थ हा एखाद्याला क्रियेला महत्त्व न देणे आहे. सामाजिक स्तरावरती समुदायातील विशिष्ठ समुदायाला सीमांतीकरण म्हणून समजले जाते."

३) वेबस्टर डिक्शनरी मते, "सीमांतीकरण ही समाज किंवा समुहा मधील सत्तविहीन किंवा अदाम दर्जा असणारा घटक होय."

४) इंसायकलोपिडा मते, "सीमांतीकरण ही प्रक्रिया आहे. ज्यामध्ये व्यक्तिगत आणि सामुदायिक स्तरावरती राजकीय चर्चेत सामाजिक नकारलेपण आणि आर्थिक मागासलेपणा इत्यादी मधून होणाऱ्या प्रक्रियेला सीमांतीकरण म्हटले आहे."

वरील सर्व व्याख्ये मधून सीमांतीकरणाची संकल्पना समजून घेण्यास उपयोग होईल. सीमांतीकरण ही विकासाच्या प्रक्रियेमधून निर्माण झालेली संकल्पना आहे. विशिष्ट व्यक्ती आणि समुदायाला आपल्या मुलभूत मानवी अधिकारापासून वंचित ठेवण्यात येते. त्यांना समान संधी, स्वातंत्र्य, संसाधन अधिकार, निर्णय प्रक्रियेतील सहभाग, ह्या विकासाच्या मुळ प्रवाहापासून वंचित भेदभाव कलंक आणि शोषणाच्या स्वरूपात व्यवहार नोंदवला जातो. हे सीमांतीकरण अस्मिता, संघटन, अनुभव आणि पर्यावरण या संबधीत बाब म्हणून नोंदवली आहे. त्यामुळे प्रभावी सहभाग, समानता ही सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्तरावर आढळून येते. या सीमांतीकरण समुहात वंश, वय, लिंग, धर्म, जात व्यवसाय तृतीयपंथी, अल्पसंख्याक समुहाचा इत्यादी समावेश करण्यात येतो. या समुहाचा विकासाचा मार्ग निर्माण करणे आवश्यक आहे. तेव्हा त्याच्या आपल्या प्रगतीचा मार्ग विकसित करता येईल. या दृष्टीने सीमांतीकरण ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

## ६.१४ सीमांतीकरणाची वैशिष्ट्ये (CHARACTERISTICS OF MARGINALIZATION)

सीमांतीकरणाची संकल्पना ही व्यापक अर्थाने समजून घेत असताना त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय स्तरावरती होणारे सामाजिक वंचितपणा अधिक पाहण्यास मिळतो. त्यामुळे त्याची व्याप्ती अधिक प्रमाणात पाहण्यास येते. त्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे समजून घेता येईल.

### १) भेदभाव आणि दुय्यमत्व (Discrimination and Subordination) :

सीमांतीकरणाचा संकल्पना तिच्या स्वरूपावरुन स्पष्ट होते ती भेदभाव आणि दुय्यमत्वाच्या आधारे अधिक स्पष्ट होते. समाजात विशिष्ट व्यक्ति आणि समुदायाना भेदभाव आणि दुय्यमत्वाची वागणूक दिली जाते. समाजात सामाजिक संबंधाची रचना ही भेदभाव आणि

दुय्यमत्वातून स्पष्ट दिसते. ही असमानतेवरती आधारित आहे. ही वंश, लिंग, धर्म, जात, प्रादेशिकता अल्पसंख्यता इत्यादीच्या आधारे सामाजिक वर्तन व्यवहाराचे मुल्य आणि नियमने अधोरेखित केली जातात. त्यामुळे सीमांतीकरण अधिक स्पष्ट होते.

### २) भौतिक आणि सांस्कृतिक नकार वागणूक (Physical and Cultural disapproved traits) :

प्रस्थापित प्रभुत्वकारी समाज व्यवस्थेमध्ये सीमांत व्यक्ति आणि समुदायाना भौतिक आणि सांस्कृतिक नकाराची वागणूक दिली जाते. या व्यक्ति आणि समुदायाच्या भौतिक जीवन पद्धती या दुय्यामाच्या स्वरुपात असतात असे प्रभुत्वकारी समुह निश्चित करतो. तसेच सांस्कृतिक जीवन व्यवहारात नाकारले गेलेले आहे. त्यामुळे समाजात भेदभाव आधारित व्यवहार स्पष्ट वर्तनव्यवहार दिसतो. सीमांत समुहाच्या सांस्कृतिक प्रथा, परंपरा, रुढी, मुल्य नियम यांचे दुय्यमत्व निश्चित करण्यात येते. त्यामुळे असमानता विषमता आणि शोषण दर्शवले जाते.

### ३) सामुदायिक अस्मिता आणि सार्वजनिक मर्यादा (Collective Identity and Common Burdens) :

सीमांत समुदायाच्या जीवन पद्धती ही सामुदायिक अस्मितेच्या आणि सार्वजनिक मर्यादेतून स्पष्ट दिसतात. स्वतःची अस्मिता टिकवण्यासाठी त्याच्या प्रतिकात्मक सांस्कृतिक व्यवहारातून स्पष्ट होते. हे समुदाय जीवन व्यवहाराचे वेगळेपण नोंदवण्याचा प्रयत्न करतात. सीमांतकरणाच्या प्रक्रियेत सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक स्तरावरती अस्मितेचे राजकारण स्पष्ट होते. त्याचे राजकारण प्रभुत्व आधारित व्यवहाराचे राजकारण केले जाते.

### ४) असमानता (Unequality) :

सीमांतीकरणाचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणून असमानता आधारित सामाजिक संबंध निर्माण करतात. ही असमानता व्यक्ति आणि समुदायामध्ये सामाजिक आर्थिक आणि राजकीय स्तरावरती स्पष्ट होते. ही संधी असमानता संसाधन असमानता आणि निर्णय असमानता अधिक स्पष्ट होते. ही असमानता श्रेष्ठ-कनिष्ठ, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, वंशिक, सांप्रदायिक, अल्पसंख्यांक या आधारे असमानतेचे सामाजिक संबंधाचा वर्तन व्यवहार स्पष्ट होतो.

### ५) शोषण (Eploitation):

सीमांतीकरणाच्या प्रक्रियेचा आधार शोषण करण्यातून स्पष्ट होतो. सीमांत व्यक्ती आणि समुह हे प्रभुत्वकारी समुहाकडून शोषण केले जाते. कारण सीमांतीकरण हे परावलंबन मधून शोषण करण्यात येते. विशिष्ट व्यक्ती व समुदायावरती नियंत्रण ठेवून त्याच्या हक्क आणि अधिकारापासून वंचित ठेवले जाते. त्याच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, आणि सार्वजनिक पातळीवर शोषण प्रभूत्वकारी समुहाकडून केले जाते. त्याच्या परिवर्तन आणि गतीशीलतेच्या मध्ये शोषणाच्या आधारे अडथळा निर्माण केला जातो.

### ६) अपमानजनक वागणूक (Humilation) :

सीमांतीकरणामध्ये विशिष्ट व्यक्ती आणि समुहाला अपमानजनक वागणूक दिली जाते. प्रस्थापित प्रभावकारी वर्ग हा वंचित घटकाना अपमानजनक वागणूक दिली जाते. या सीमांत समुहाना आत्मसन्मानाची वागणूक दिली जात नाही. त्यांना समाजात प्रतिष्ठेची व सन्मानाची

वागणूक दिली जात नाही. त्यांना त्याच्या कार्याची नोंद घेतली जात नाही. त्याचा गौरव केला जात नाही. त्याचे कार्य प्रतिष्ठेचे मानले जात नाही. सततचा अपमान हा धर्म, वंश, लिंगभाव, जातकेंद्री अल्पसंख्याक असा स्वरूपात आणि आधारे नोंदवला जातो. त्यामुळे सीमांतीकरण स्पष्ट दिसते.

### ७) निर्णयप्रक्रियेत असहभाग (Non Participation in Policy) :

सीमांतीकरणाच्या स्वरूपामध्ये निर्णायक प्रक्रियेतील असहभाग हे स्पष्ट होते. विशिष्ट व्यक्ति आणि समुहाला निर्णायक प्रक्रियेत मत मांडण्याचा अधिकार दिला जात नाही. प्रस्थापित वर्ग हा सामाजिक विषमतेचा व्यवहार करत असताना वंचित घटकांना निर्णय प्रक्रियेत योजना निर्मितीकरण करण्यात येत नाही. त्यांना अपेक्षित असणारी योजना निर्माण करु शकत नाही. कारण त्यांचे जनमत आणि अपेक्षा जाणून घेण्यात येत नाही. यासाठी प्रस्थापित प्रयत्न करत असते.

### ८) संसाधन वंचित (Dipravation from Resources):

सीमांतीकरणाचे स्वरूप हे संसाधनाच्या वापरा पासून वंचित ठेवण्यातून स्पष्ट होते. प्रस्थापित व्यवस्था ही वंचित वर्गाला संसाधनाच्या वापरापासून वंचित ठेवतो. ही संसाधने भूमी, पाणी आणि सार्वजनिक ठिकाण यांचा वापर करण्यास नकार देण्यात येतो. त्यामुळे सीमांतीकरणाची प्रक्रिया अधिक प्रबळ बनत जाते. प्रस्थापित वर्ग आपले नियंत्रण संसाधनावर ठेवत असतो. त्याचा वापर करता येऊ नये त्यांनी अधिकार, वापर आणि नियमणे करण्यात येते. त्यामुळे वंचित समुहाला संसाधन वंचित ठेवण्यात येते हे सीमांतीकरण अधिक स्पष्ट दिसते.

वरील सर्व घटकांपासून सीमांतीकरणाचे स्वरूप स्पष्ट होते, प्रस्थापित वर्ग हा वंचित करणाची प्रक्रिया निर्माण करण्यात येते. यामध्ये शोषण, भेदभाव, संधीमधील असमानता, संसाधन अधिकार हीन, अस्मिता आणि अस्तित्वाचे राजकारण इत्यादी मधून सीमांतीकरण स्पष्ट करते. ही व्यवस्था सार्वत्रिक स्वरुपामध्ये अधिक प्रबळ बनत आहे. याला वंशिक लिंगभाव धर्मांधता जातीयवाद प्रादेशिकता आणि अल्पसंख्याकता यातून सीमांतीकरण प्रक्रिया स्पष्ट दर्शवते.

**आपली प्रगती तपासा :**

१) सीमांतीकरणाची व्याख्या सांगुन त्यांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

## ६.१५ सीमांतीकरणाचे घटक (FACTORS OF MARGINALIZATION)

सीमांतीकरणाची प्रक्रिया ही विकासाच्या माध्यमातून समजून येते. ही प्रक्रिया विकासातील असमतोलातून निर्माण होते. तिला सामाजिक, धार्मिक, आर्थिक घटक जबाबदार असतात. या घटकाचा परिणाम असमतोल विकास आणि शोषण आधारित व्यवस्था प्रस्थापित करण्यास उपयोग केला जातो. या संबंधी सीमांतीकरणाचे घटक समजून घेणे आवश्यक आहे.

### १) दारिद्र (Poverty) :

सीमांतीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणजे दारिद्र होय. हे दारिद्र व्यक्ती आणि समुदायाच्या जीवनाचा दर्जाच्या आधारे निश्चित करण्यात येते. या दारिद्र्याची निर्मिती विकासातील असमतोलामुळे दिसून येतो. त्यामुळे वर्गीय विषमता सामाजिक आणि आर्थिक स्तरावरती स्पष्ट होताना दिसते. हे दारिद्र व्यक्तीच्या नोकरी, व्यवसाय, आर्थिक संसाधनाची कमतरता इत्यादीमुळे निर्माण होते. त्यांच्या उत्पादनाचे साधन, मालकी आणि उपभोग यापासून वंचित ठेवले जाते तेव्हा दारिद्र्याची परिस्थिती सीमांतीकरणास कारणीभूत ठरत असते.

### २) लिंगभाव असमानता (Gender Inequality) :

सीमांतीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणजे लिंगभाव असमानता होय. लिंगभाव असमानता म्हणजे सामाजिक स्तरावरील स्त्री-पुरुष असमानता असा अर्थ समजून घेता येतो. स्त्रीयांना पुरुषांच्या इतकेच मुलभूत अधिकार प्राप्त झाले पाहिजे तर त्या विकासाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकतात. याचे महत्त्व ओळखून स्त्री-पुरुष समानता या मुल्यांची निर्मिती करण्यात येणे आवश्यक आहे. पण वास्तवात मात्र स्त्री-पुरुष असमानता सर्व क्षेत्रात स्पष्ट दिसून येते.

### ३) वंशिक असमानता (Ethinia Inquality) :

जागतिक स्तरावरती वंशिक असमानतेचे सार्वत्रिकरण झाल्याचे दिसते. यामध्ये काळा आणि गोरा असा दोन्ही वंशामध्ये असमानता पाहण्यास मिळते. त्यांना मुलभूत अधिकारापासून वंचित ठेवले जाते. केवळ ते कृष्णवर्णीय आहेत म्हणून त्यांना वंचिततेला समोरे जावे लागते. त्यामुळे सीमांतीकरणाची प्रक्रिया अधिक स्पष्ट होते.

### ४) धार्मिक अल्पसंख्यांक (Religious Minorities) :

सीमांतीकरणाच्या प्रक्रियेमध्ये धार्मिक अल्पसंख्यांक समुहाना वंचितपणाच्या समस्याना सामोरे जावे लागते. जागतिक स्तरावरती धर्माच्या आधारे बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक असे वर्गीकरण करण्यात येते. यामध्ये बहुसंख्यांक असणारा धार्मिक समुह अल्पसंख्यांक समुहावरती वर्चस्व श्रेष्ठता लादण्याचा प्रयत्न करत असते. त्यामुळे धार्मिक अल्पसंख्यांक समुह हे वंचित परिस्थितीला सामोरे जाताना आढळून येते. त्यांना विकासाच्या प्रक्रियेतील लाभापासूबन वंचित ठेवले जाते. त्यांना अत्याचार दंगली द्वेष पूर्ण मानसिकता या सारख्या समस्यांना सामोरे जावे लागते.

### ५) जातीयवाद (Castism):

सीमांतीकरणाच्या प्रक्रियेत जातीयवादी घटकाचा समावेश करण्यात आला आहे. भारतासारख्या देशामध्ये सामाजिक असमानता आणि शोषणाचा केंद्रबिंदू म्हणून जातीयवादाच्या संकल्पनेकडे पाहिले जाते. प्रत्येक जात आणि उपजात ही श्रेष्ठ-कनिष्ठ उच्च-निच्य आणि पवित्र आणि अपवित्रतेच्या आधारे असमान स्तरावरती विभागणी वरचढ उतरडीच्या श्रेणीरचनेत आणि स्तररचनेत अस्तित्वात आहे. परिणामी जातीवादाच्या आधारे मागासलेपणा अधिक निर्माण होते. त्यामुळे सीमांतीकरणाची प्रक्रिया निर्माण होते.

### ६) सामाजिक आणि आर्थिक घटक (Socio-Economic Factor) :

सीमांतीकरणाच्या प्रक्रियेमधील महत्त्वाचा घटक म्हणून सामाजिक आणि आर्थिक घटक मानले जातात. समाजामध्ये सामाजिकतेच्या आधारे व्यक्ती आणि समुदायाने स्थान निश्चित होतात. कोणी कोणते काम करावे किंवा करु नये हे सर्व प्रयत्नकारी समाजव्यवस्था निश्चित ठरवते. त्यामुळे व्यक्तीचा स्थान आणि दर्जा याला अनुसरुन भूमिका वर्तन निश्चित होते. तर आर्थिक घटकाच्या आधारे त्याची गरीबी श्रीमंत वर्गीय श्रेणीरचना निर्माण होते. परिणामी आर्थिक सबळ असणारा वर्ग, दुर्बल वर्गावरती प्रभूत्व निर्माण करतो. त्यामुळे असमानता आणि शोषण निर्माण होते. ह्यामधून सीमांतीकरणाची प्रक्रिया स्पष्ट होते.

### ७) राजकीय घटक (Political Factor) :

सीमांतीकरणाच्या प्रक्रियेत जसे सामाजिक आर्थिक घटक कारणीभूत आहे तसा राजकीय घटक सुद्धा तितकाच जबाबदार आहे. त्यामुळे व्यक्ती आणि समुदायाला राजकीय अधिकार आणि हक्कांची आवश्यकता आहे. लोकशाही देशामध्ये मानवी अधिकार म्हणून राजकीय अधिकाराकडे पाहिले जाते. पण ज्या ठिकाणी साम्राज्यशाही हुकुमशाही राजकीय परिस्थिती असेल त्या ठिकाणी राजकीय वर्चस्व अधिक स्पष्ट दिसते. त्यामुळे देशातील सामान्य नागरीकांना लोकशाही पद्धतीचे राजकीय अधिकार नाकारले जातात. त्यामुळे वंचितपणा निर्माण होतो. परिणामी सीमांतीकरणाची प्रक्रिया स्पष्ट होते.

वरील सर्व घटकामधून सीमांतीकरणाचे प्रक्रिया अधिक स्पष्ट दिसून येते. ही प्रक्रिया सामाजिक, धार्मिक, वंशिक, लिंगभाव, जातीयवाद आणि राजकीय स्वरूपातील घटकातून स्पष्ट दिसून येतो. त्यामुळे सीमांतीकरणाची प्रक्रिया अधिक स्पष्ट होते. यामधून सीमांत व्यक्ती समुदायाला आपल्या मुलभूत मानवी अधिकारापासून वंचित ठेवण्यात येते.

### आपली प्रगती तपासा :

१) सीमांतीकरणाच्या प्रक्रियेतील घटकांचे विश्लेषण करा ?

## ६.१६ सीमांतीकरणाची कारणे (CAUSE OF MARGINALIZATION)

सीमांतीकरणाची प्रक्रिया समजून घेत असताना त्यांची कारणे समजून घेणे आवश्यक आहेत. विशिष्ट व्यक्ति आणि समुदाय हे प्रस्थापित समाज व्यवस्थेमधून सीमांतीकरणाच्या स्वरुपात ठेवले जाते. परिणामी त्याच्या मुलभूत मानवी हक्का पासून वंचित राहण्यातून स्पष्ट होतात. या मागील नेमकी कारणे काय आहेत हे समजून घेणे आवश्यक आहे ते पुढील मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येतील.

### १) वंचित समुहाबद्दलची समज कमी (Lack of Understanding these groups) :

सीमांतीकरणाच्या प्रक्रियेमध्ये प्रस्थापित समुदाय हे सीमांत समुदायाला समजून घेत नाही. हा समुदाय स्वतःच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आर्थिक आणि राजकीय मुल्य नियमने या सीमांत समुहावरती वर्चस्वाच्या स्वरूपात लादण्यात येते. या सीमांत समुहाच्या प्रथा, रुढी, परंपरा, मुल्य विश्वास नियमने समजून घेतले जात नाही. ते हिंस्त्र अदिम व मागासलेले अश्या स्वरुपाची ओळख केली जाते ते अपवित्र, निव्य, निम्न, गरिब मागासलेले संस्कृतीचे आहेत असा स्वरुपात करतात त्यामुळे प्रस्थापित समुह वंचित समुहांबद्दल चुकीची समज निर्माण करतात.

### २) स्वीकाराची कमतरता (Lack of Acceptance) :

सीमांत समूहाची स्वतंत्र अस्तित्व आणि अस्मितेच्या स्वरूपातील ओळख करण्यात येते. या समुदायाचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन पद्धती वेगळपेण दर्शवले जाते. या जीवन पद्धतीचे मान्यताकरण आणि स्वीकारण करण्यामध्ये प्रस्थापित समाजव्यवस्था स्वीकारत नाही. त्यांना कनिष्ट, दुय्यम, तिचा अपवित्र समजून नाकारण्यात येते. भौतिक आणि सांस्कृतिक जीवनपद्धती परंपराचा स्वीकार केले जात नाही. तर प्रस्थापित समाजाची सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्व सीमांत समुहावरती लादले जाते. त्यातून त्याच्यावरती वर्चस्व आधारित व्यवहार केला जातो.

### ३) असहिष्णुता (Intolerence) :

सीमांतीकरण प्रक्रिया निर्मिती मध्ये असहिष्णुता घटक कारणीभूत ठरतो. समुहामधील असणारी परस्पर स्वकेंद्रियता अस्मिता आणि वास्तवाशी संबंधीत बाब आहे. यांच्या आधारे सामाजिक संबंधाची व्यवस्था निर्माण केली जाते. हे संबंध परस्पर विरोधाभास निर्माण करणारे वर्तन स्पष्ट होते. तेव्हा विशिष्ट व्यक्ती आणि समुहाना सद्‌भावनेचे आपलेपणाची आणि सहकार्याचे संबंध होत नाही. तेव्हा असहिष्णुतेने वातावरण निर्माण केले जाते. तेव्हा सीमांतीकरणाची परिस्थिती निर्माण होते.

### ४) कंलक लावणे (Stigmatization) :

सीमांतीकरणाच्या प्रक्रियेला कारणीभूत ठरणारा घटक म्हणून कलंक लावण्याचे काम करते. विशिष्ट व्यक्ती आणि समुदायाला कलंक लावण्याचे काम केले जाते. विशेषतः लैंगिक अल्पसंख्यांक समुदायातील व्यक्तीना विशिष्ट कलंकीत नजरेतून पाहिले जाते. त्यांचे अधिकार

आणि हक्क या पासून वंचित ठेवण्यासाठी हेतू परस्पर पद्धतीने कलंकीत करण्यात येते. ती नकारात्मक वर्तन पद्धती म्हणून नोंदवली जाते. त्यामुळे सामाजिक नियामक वर्तनरितीचा भंग केला जातो तेव्हा त्यांना कलंकीत म्हणून घोषित केले जाते.

### ५) पूर्वाग्रह दूषित (Prejudice):

सीमांतीकरण निर्मिती करणाच्या प्रक्रियेला पूर्वाग्रह दूषित अधिक कारणीभूत आहे. पूर्वाग्रह दूषित ही एखाद्या व्यक्ती समुह आणि घटनेसंबंधी दूराग्रहाची भावना निर्माण करणे होय. त्या संबंधी कोणत्याही संबंधीत सायासत्यत पडताळणी न पाहता त्या संबंधी स्वतःच्या मनाचा कयास लावण्याचा प्रयत्न केला जातो. असा प्रकारामुळे वास्तव सत्य समो न येता वेगळे नामाविधान केला जाते, स्त्री-पुरुषातील सबंधाचे विश्लेषण करत असताना पूर्वाग्रहदूषित निर्माण केली जाते. तसेच वंशिक, धार्मिक, जातीय भावना दुखावण्याच्यामुळे पूर्वाग्रह दूषिततेचे प्रमाण अधिक स्पष्ट होते. त्यामुळे सर्वासंमोर वास्तव सत्य स्पष्ट होत नाही. परिणामी एखाद्या व्यक्ती आणि समुदायाबद्दल पूर्वाग्रह दूषित अधिक स्पष्ट होते.

वरील सर्व मुद्या मधून सीमांतीकरणाची कारणे समजून घेण्यास उपयोग होतो, समाजात प्रस्थापित वर्गाचे वर्चस्व अधिक प्रमाणात असेल तेव्हा सीमांतीकरण अधिक प्रमाणात स्पष्ट होते. त्यामुळे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित ठेवण्याचा अधिक प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यामुळे शोषित भेदभाव आणि कलंकीत स्वरूपात सीमांत समुहाच्या समस्या स्पष्ट होतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) सीमांतीकरणाच्या प्रक्रियेस कारणीभूत असणारे घटक स्पष्ट करा.

## ६.१७ सीमांतीकरणाची समस्या (PROBLEMS OF MARGINALIZATION)

सीमांतीकरणाची प्रक्रिया व्यापक अर्थाने सामाजिक वंचितेच्या स्वरुपात समजून घेता येतात. ही प्रक्रिया विषमता शोषण भेदभाव आणि कलंकाच्या स्वरुपात स्पष्ट होते. याआधारे सीमांत घटकांना समस्यांना सामोरे जावे लागे लागते. समाजातील प्रस्थापित वर्ग हा सीमांत समाजावरती सामाजिक सांस्कृतिक धार्मिक आर्थिक आणि राजकीय स्तरावरती वर्चस्व

लादण्याचे काम करत असतो. तसेच त्याचे वर्चस्व कायम स्वरूपामध्ये राहावे यासाठी व्यवस्था प्रस्थापित करण्याचे कार्य करत असतात. या व्यवस्थेत उच्च-निच, श्रेष्ठ-कनिष्ठ, पवित्र-अपवित्र आणि गरीब-श्रीमंत अशी श्रेणीरचना विषम स्तरीकरणाच्या आधारे व्यवस्था निर्माण करतात. ही व्यवस्था निर्माण करण्यामध्ये सीमांत समुहाला परावलंबी, अपमानस्पद, भेदभाव आणि शोषण आधारित वागणूक देण्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे सीमांत समुहाच्या समस्या वाढत असतात. त्यांच्या समस्येचे विश्लेषण पुढील मुद्याच्या आधारे करता येईल.

### १) वंशिकवाद (Raceism) :

जागतिक स्तरावरती वंशिकवादाच्या आधारे सीमांतीकरणाची निर्मिती केली जाते. हा गोरवर्णीय आणि कृष्णवर्णीय वंशिक समुहातील वाद हा श्रेष्ठ कनिष्ठ आणि पवित्र-अपवित्राच्या आधारे निर्माण केला जातो. अमेरिकेसारख्या प्रगत देशामध्ये वंशवादाचे प्रमाण अधिक पाहण्यास मिळते. आफ्रिकेतील कृष्णवर्णीय लोकांना अमेरिकेन जनता कनिष्ठ भेदभाव आणि शोषणाच्या आधारे वागणूक दिली जाते. भारतात आर्य आणि द्रविडीयन वंशामध्ये भेदभाव वर्तन व्यवहार केला जातो. हे पवित्र-अपवित्र आणि श्रेष्ठ-कनिष्ठ आधारे भेदभाव आणि शोषण केले जाते. त्यामुळे सीमांत समुहाला या वंशिकवादाच्या संघर्षातून जीवन जगावे लागते.

### २) लिंगभाव (Gender) :

समाजात लिंगभावाच्या आधारे स्त्री-पुरुष भेदभाव व शोषण व्यवस्था निर्माण केली जाते. जैविक शारीरिक आधारे स्त्री-पुरुषाचे वेगळेपण असले तरी त्याला सामाजिक, धार्मिक सांस्कृतीच्या आधारे लिंगभावाचे स्वरूप पाहण्यास मिळते. स्त्रीयांना शिक्षण व्यवसाय नोकरी मालमत्ता अधिकारापासून वंचित ठेवले जाते. त्यांना स्वातंत्र्य, समता, न्याय आणि अधिकार यापासून वंचित ठेवले जाते. त्यांना सहकार्य, आत्मविश्वास आणि आत्मसन्मानाची वर्तन व्यवहार केला जात नाही. त्यांना अधिक मागास वंशित आणि शोषित करण्याचे काम ही व्यवस्था करताना दिसून येते. त्यामुळे लिंगभावाच्या आधारे वंचित ठेवण्याची समस्या स्पष्ट दिसते.

### ३) धार्मिक भेदभाव (Religious Discrimination) :

समाजामध्ये धार्मिक विविधता अधिक प्रमाणात दिसून येते ही विविधता आपले श्रेष्ठत्व व इतरत धार्मिक समुहावरती वर्चस्व निर्माण करण्यास प्रयत्न केले जातात. ज्या ठिकाणी मुलतत्ववादाचे प्रमाण अधिक असते. त्या ठिकाणी धार्मिक भेदभावाचे अधिक प्रमाणात दिसून येते. त्यामधून अल्पसंख्यांक धार्मिकतेतून स्पष्ट होते. बहुसंख्यांक धर्मातील समूहाचे अल्पसंख्यांक धार्मिक समुहावरती वर्चस्व निर्माण करतात. आपल्या रुढी, परंपरा, प्रथा, नियमने, मुल्य यांचे वर्चस्व वंचित धार्मिक जीवन पद्धतीच्या स्वरूपात लादण्यात येते. त्यामुळे अल्पसंख्यांक धार्मिक समुह वंचित घटकामध्ये निर्माण होते. त्याच्या मध्ये भेदभाव व शोषण स्वरूप अधिक स्पष्ट होते.

### ४) सांस्कृतिक वर्चस्व (Cultural Domination) :

प्रस्थापित समजाव्यवस्था आपले सांस्कृतिक वर्चस्व इतर समुहावरती लादण्याचा प्रयत्न करतात. ही समाजव्यवस्था आपली संस्कृती श्रेष्ठ मानून इतर समुहाचे संस्कृती कनिष्ठ मानत असतात. संस्कृती म्हणजे जीवन पद्धती होय. ही संस्कृती प्रथा, परंपरा, रुढी, मुल्य, नियमने या आधारे सांस्कृतिक जीवनपद्धती व वर्तन व्यवहार निश्चित केला जातो. त्यानुसार

त्याचा स्वीकार केला जातो. त्यासाठी इतर समुहाने तसेच वर्तन करावे असा वर्चस्वात्मक नियम निर्धारीत केला जातो. परिणामी अल्पसंख्या सांस्कृतिक समुहावरती आपली सांस्कृतिक जीवन मुक्तपणे जीवन जगता येत नाही. त्यामुळे सांस्कृतिक वर्चस्वातून सीमांतीकरण निर्माण केले जाते.

### ५) आर्थिक विषमता (Economic Inequality):

समाजामध्ये आर्थिकतेच्या आधारे सीमांतीकरणाची समस्या समोर येताना पाहण्यास मिळते. समाजामध्ये आर्थिकतेच्या आधारे वर्गीय हितसंबंधाची रचना निर्माण केली जाते. हे संबंध गरीब, श्रीमंत, कामगार-भांडवलदार, मजूर-मालक या दृश्य स्वरूपात पाहण्यास मिळतात. त्या स्वरूपात व्यवहार निर्माण होतो. हा व्यवहार भेदभाव विषमता आणि शोषणाच्या आधारावरती निर्माण केला जातो. संधी आणि संसाधन वरील अधिकारापासून वंचित ठेवले जाते. त्यामुळे वंचित समुह आपला आर्थिक विकास साध्य करु शकत नाही. ते विकासाच्या मुळ प्रवाहामध्ये येऊ शकत नाही. त्यामुळे आर्थिक समुद्ध विकास होऊ शकत नाही. त्यामुळे वंचित समूह आर्थिकतेच्या समस्येच्या आधारे सीमांतीकरणाचे प्रमाण वाढ होताना दिसते.

### ६) सामाजिक विषमता (Sociol inequality) :

सीमांतीकरणाचे मुख्य केंद्र म्हणून सामाजिक विषमतेच्या आधारे समजून घेता येते. ही सामाजिक विषमता विशिष्ट व्यक्ती आणि समुहाना सामाजिक हक्क आणि अधिकारापासून वंचित ठेवते. त्यामुळे सामाजिक विषमता ही सीमांतीक समुहाची समस्या म्हणून पाहण्यात येते. ही विषमता, दर्जा व भूमिका आधारित निर्माण करण्याऱ्या समाजव्यवस्थेतून स्पष्ट होते. या सामाजिक विषमतेचा आधार वंश, लिंग, वय, धर्म, जात, वर्ग इत्यादी स्वरूपात दिसून येतो. या आधारे विषमता भेदभाव आणि शोषण केले जाते. परिणामी समाजातील प्रस्थापित वर्ग हा दुर्बल घटकांवर आपले वर्चस्व शाोषणाच्या स्वरूपात करत असतात. त्यामुळे सीमांत समुहाना सामाजिक विषमतेच्या समस्येला सामोरे जावे लागते.

### ७) राजकीय विषमता (Political Inequality) :

समाजामध्ये प्रस्थापित गटाकडे विशेष राजकीय सत्ता संपादीत केली जाते. या राजकीय सत्तेच्या विभाजनामध्ये असमान वितरण केले जाते कारण समाजात जे प्रबळ असतात तेच राजकीय सत्तेचा स्वतःच्या स्वार्थासाठी वापर करतात. ही राजकीय सत्ता दुर्बल घटकांवरती वर्चस्व लादत असतात. आपल्या राजकीय सत्तेच्या अधिन राहण्यास भाग पाडतात. त्यामुळे समाजात सत्ता असणारा आणि नसणारा असा राजकीय वर्ग निर्माण केला जातो. ही राजकीय सत्ता वंश, लिंग, वय, धर्म, जात आणि वर्गाच्या आधारे स्थापित केली जाते. या सर्वांमध्ये जो सबळ सत्ताधारी गट असेल त्याचे वर्चस्व समाजावरती राहते. राजकीय सत्तेच्या आधारे वंचित समाजाची निर्मिती होते. या समुहाला व व्यक्तीला राजकीय अधिकार, हक्क, प्रतिनिधित्व संधी आणि राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग इत्यादी पासून वंचित ठेवले जाते. त्यामुळे सीमांत समुहात व्यक्तीला राजकीय सत्तेच्या आधारे दुर्बल, अक्षम, सत्ताविहीन ठेवले जाते. त्यामुळे वंचित समुहाची राजकीय विषमता ही समस्या म्हणून सीमांतीकरणास कारणीभूत ठरते. त्यामुळे राजकीय विषमता वास्तविक स्तरावरती स्पष्ट दिसून येते.

वरील सर्व मुद्यांपासून सीमांतीक समुहाच्या समस्या ह्या सीमांतीकरणाच्या प्रक्रियेस स्पष्ट ठेवताना दिसतात. ह्या विषमता भेदभाव, कलंक आणि शोषणावरती आधारित व्यवस्था असल्याचे स्पष्ट होते. या सर्व समस्यांना सीमांत व्यक्ती आणि समुहाला सामोरे जाताना स्पष्ट होते. याची व्यापकतेचे स्वरूप गंभीर होताना पाहण्यास मिळते.

**आपली प्रगती तपासा :**

१) सीमांतीकरणाच्या समस्येचे सविस्तर विश्लेषण स्पष्ट करा.

## ६.१८ सीमांतीकरणाच्या पुर्नउत्थानाचा योजनात्मक कार्यक्रम (RESURGENCE FOR MARGINALIZED POLICIES PROGRAM)

### प्रस्तावना (Introduction)

सीमांतीकरणाची संकल्पना बहुआयामी स्वरुपातून समजून घेता येते. ही सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय स्तरावरती विशिष्ट व्यक्ती आणि समुहांना वंचित ठेवण्यात येते. ही सीमांतीकरणाच्या संकल्पनात्मक आधाराने वसाहत पूर्व आणि उत्तर आधुनिकीकरण औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये परिवर्तनीय होत आल्या आहेत. ही संकल्पना भारताच्या संदर्भात वंचित घटकामध्ये मागासवर्गीय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटके विमुक्त, स्त्रीया, कामगार, शेतमजूर, दारिद्रग्रस्त, विकास प्रकल्प ग्रस्त यांचा समावेश सीमांत वर्गामध्ये करण्यात येतो. याच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षमीकरणासाठी आणि संरक्षण सन्मान मिळण्यासाठी भारतीय संविधानाने मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वामधून तरतुदी करण्यात आल्या. तसेच पंचवार्षिक योजना, विशेष योजना अंतर्गत शिक्षण, आरोग्य, कायदेशीर संरक्षण, सामाजिक आर्थिक, राजकीय विकास योजनांची निर्मिती करण्यात आली आहे. या योजनाची अंमलबजावणी त्या त्या विशिष्ट घटकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले जाते. त्यामुळे लाभार्थींना या योजनाचा लाभ मिळत आहे. त्याचा विकास साधण्यात यश प्राप्त होत आहे. या संबंधीच्या योजनाचा आढावा या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे.

**१) शिक्षण (Education) :**

शिक्षण हे सामाजिक परिवर्तन आणि विकासाचे साधन आहे. याचा लाभ वंचित घटकांना मिळाल्याने त्यांचा विकास साध्य करता येतो. या संबंधी भारतीय संविधानामध्ये शिक्षण मुलभूत अधिकार सर्व स्त्री-पुरुषांना देण्याची तरतुद करण्यात आली आहे. संविधानाच्या कलम १४ कायद्यापुढे सर्व समान यानुसार शिक्षणाचा अधिकार सर्वांना देण्यात आला. कलम १५ नुसार धर्म जात स्त्री-पुरुष यामध्ये भेदभाव न करता समानता तरतुद केली आहे. कलम २१ (अ) नुसार शिक्षण अधिकार (Right to Education) देण्यात आला आहे. सर्व मुलांना सक्तीचे

आणि मोफत शिक्षणाचा हक्क देण्यात आला. कलम ४५ नुसार Right for Early Childhood care and Education ची हक्क देण्यात आला आहे. तसेच पंचवार्षिक योजनामध्ये शिक्षण विकास सर्व घटकापर्यंत व्हावा यासाठी तरतूद करण्यात आले आहे. सन १९७५ साली केंद्र शासनाने एकात्मिक बालविकास योजनेची सुरुवात केली. त्यामुळे शिक्षण आरोग्य आणि पोषण आहार याविषयीची तरतुद करण्यात आली. शाळेमध्ये दुपारचे जेवण करण्यातून पोषण आहार योजना करण्यात आली. सन १९८९ पासून स्त्री समानतेचे शिक्षण योजना करण्यात आली. सन १९८७ पासून Operation Black Board Policy या योजना करण्यात आल्या. सन १९९४ साली District Primary Education Programme अंतर्गत शालेय व्यवस्थापन विकेंद्रीकरण समुदाय गतिशीलता या योजनाचे कार्य केले. यातून सर्व शिक्षा अभियान योजनेचे सुरुवात करण्यात आली. माध्यमिक शिक्षण योजना अंतर्गत सन २००९ साली राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान सुरुवात करण्यात आली. मुलींचे वस्तीगृह, शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, स्कॉलरशीप अल्पसंख्याक विद्यार्थी स्कॉलरशीप आणि भारतीय शिष्यवृत्ती इत्यादींचा समावेश करण्यात आला. दुर्गम डोंगरी भागातील आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळा ची तरतुद करण्यात आली. NCERT या योजनेतून गुणात्मक आणि संख्यात्मक पातळीवरती विद्यार्थ्यांना समान शिक्षण देण्यात येते. उच्च शिक्षणाच्या सुविधा सर्वांना मिळण्यासाठी समान शिक्षण देण्यात येते. उच्च शिक्षणाच्या सुविधा सर्वांना मिळण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगा मार्फत विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावरती विशेष तरतुदी करण्यात येत आहेत. संशोधनाासाठी आर्थिक सुविधा स्कॉलरशीप मधून करण्यात येते. त्यामुळे सीमांत समुदायातील विद्यार्थ्यांना विशेष लाभ मिळत आहे.

### २) आरोग्य (Health) :

प्रत्येक नागरिकाला आरोग्याचा अधिकार आणि सेवासुविधा मिळणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने नियोजन योजनामध्ये तरतूद करणे आवश्यक आहे. त्या संबधीचे प्रयत्न करण्यात आले आहेत. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर संविधानाच्या माध्यमातून नागरीकांच्या आरोग्य अधिकाराची तरतूद करण्यात आली आहे. सन १९५२ साली एकात्मिक विकास योजनाच्या अंतर्गत आरोग्य सुविधा विषयक उपक्रम निर्माण करण्यात आले. या अंतर्गत डॉक्टर्स, औषध उपचार दवाखाने सुविधा देण्यात आल्या. यामधून महिला व बाल मृत्यूचे प्रमाण कमी हेतू ठेवण्यात आला. राष्ट्रीय कुटुंब कल्याण योजने अंतर्गत MCH आणि CSSM योजनेविषयी आठव्या योजने अंतर्गत आर्थिक तरतुदी करण्यात आल्या. RCH कार्यक्रम नव्या योजनेअंतर्गत करण्यात आली. सन १९९७ साली कुटुंब कल्याण कार्यक्रमामध्ये परिवर्तन करण्यात आले. त्यांचे Reproductive and Child Health Programme तयार करण्यात आला. समान आरोग्य सुविधा देण्यात आली. यामध्ये RMNCHTA ही योजना करण्यात आली. या समुदय अंतर्गत योजना करण्यात आली. सन २००५ साली राष्ट्रीय आरोग्य मिशन मार्फत आरोग्य सुविधा पुरवठा करण्यात आली. ही योजना केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण अंतर्गत करण्यात आली. सन २००५ साली राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन माध्यमातून देशातील १८ राज्यामध्ये ही योजना अमलात आली. तर २०१३ साली राष्ट्रीय शहरी आरोग्य मिशन योजना करण्यात या दोन्ही योजना करण्यात आल्या. या अंतर्गत शुद्ध पाणी, आहार, दवाखाने, डॉक्टर, आरोग्य सेवक, औषध पुरवठा वाहन सुविधा इत्यादींचा पुरवठा करण्यात आला. या आरोग्य सुविधा आदिवासी ग्रामीण आणि शहरी भागामध्ये अंमलात आणण्यात आली. त्यामुळे बाल मृत्यूचे

माता गर्भवती महिला आसाध्य रोग शस्त्रक्रिया करण्यासाठी सुविधा उपलब्ध करण्यात आली. याचा लाभ आरोग्य सुधारणा आणि सुरक्षितता वाढ होत आहे.

### ३) दारिद्र (Poverty) :

सीमांत समूहांच्या दारिद्र्याचे निर्मूलन उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. कारण दारिद्र्य हा सीमांतीकरणाचा मुख्य आधार आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वात मोठी समस्या म्हणून दारिद्र्याकडे पाहण्यात येऊ लागली. देशात अन्नधान्य, रोजगार निर्मिती, जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठीचे नियोजन आयोगामार्फत कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना तयार करण्यात आल्या. या अंतर्गत वेतन, रोजगार, स्वयं रोजगार, अन्न सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, शहरी दारिद्र्य निर्मुलनाच्या योजना तयार करण्यात आल्या. या अंतर्गत वेतन रोजगार, स्वयं रोजगार, अन्न सुरक्षा सामाजिक सुरक्षा शहरी दारिद्र्य निर्मुलन इत्यादींचा पंचवार्षिक योजनामध्ये समावेश करण्यात आली. एकात्मिक विकास योजना मधून रोजगार हमी योजना माध्यमातून रोजगार वेतन अन्नधान्य पुरवठा करण्यात आला. सन १९९९ साली जवाहर ग्राम सम्रघी योजना स्थापन करण्यात आला. ग्रामीण भागाचा विकास करणे हा या योजनेचा हेतू होता. यातून दारिद्र्य रेषेखालील वक्ता रोजगार अन्नधान्य आरोग्य सुविधा देण्यात आल्या. अनुसूचित जाती-जमाती घटकांना ३% विशेष सुविधा देण्यात आल्या. या योजनेसाठी रू. १,८४८.८० करोड रूपये खर्च करण्यात आला. सन १९९५ साली राष्ट्रीय वृद्धापकाळ पेन्शन योजना करण्यात आली. यामध्ये ६०-६५ वर्षावरील वृद्धांना पेन्शन योजनेचा लाभ देण्यात आला.

सन १९९५ साली राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना स्थापन करण्यात आला. या योजनेत रू. २०,००० रक्कम कुटुंबातील व्यक्तिस देण्यात येते. सन २००५-०६ साली जननी सुरक्षा योजना करण्यात आली. यामध्ये ३,४०० रूपयाची मदत देण्यात आली. सन १९८५ साली प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेतून ग्रामीण भागात गृह सुविधा देण्यात आली. इंदिरा गांधी आवास योजना, रमाई घरकुल योजना इत्यादी योजनेचा समावेश केला आहे. सन २०००-०१ मध्ये या योजनेत १७१०.०० करोड रुपये देण्यात आले. ग्रामीण विकास मंत्रालयातून NREGA योजनेतून रोजगार योजना देण्यात आली. अशा अनेक योजना दारिद्र्य निर्मूलनासाठी करण्यात आल्या.

### ४) आर्थिक विकास (Economic Development) :

सीमांतीकरण समुहाच्या विकासासाठी आर्थिक योजनांच्या आधारे करण्यात आला आहे. विशेषतः आर्थिक मागास प्रवर्गातील आर्थिक विकासाच्या योजना करण्यात आल्या. त्यांना रोजगार स्व-विकास उद्योगजकता यांचा विकास करण्यासाठी योजना करण्यात आली. इतर मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचीत जमाती, भटके विमुक्त, स्त्रीया यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आर्थिक कर्ज पुरवठा, उद्योगाचे प्रशिक्षण वितरण विपन्नसाठी सोई आणि मदत देण्यात येते. राष्ट्रीय अनूसूचित जाती आर्थिक सहाय्य आणि विकास महांमडळ मार्फत अनुसूचित जाती कर्ज पुरवठा उद्योजक विकास राज्या मार्फत योजनाचा वापर करणे. राष्ट्रीय सफाई कर्मचारी आर्थिक आणि विकास महामंडळ या मार्फत सफाई कामगार आर्थिक सहाय्य मिळवून देणे. सेड्यूल्ड कास्ट सब पेल्यानव मार्फत योजना आर्थिक लाभ देण्यात येते. या केंद्रीय आर्थिक विकास योजना करण्यात आल्या. अनुसूचित जमाती आर्थिक विकासासाठी Tribal

Sub Plan ची निर्मिती करण्यात आली. पाचव्या पंचवार्षिक योजनामध्ये आर्थिक सुविधा पुरवठा करण्यात आल्या. अल्पसंख्यांक मंत्रालयामार्फत अल्पसंख्यांक समाजाच्या आर्थिक विकास महामंडळ मार्फत कर्ज पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे सीमांत समुहाला आर्थिक विकास करण्यात येत आहे.

### ५) सामाजिक सुरक्षा (Social Security):

सीमांत समुहाला सामाजिक सुरक्षा देण्यासाठी भारतीय संविधान मध्ये विविध कलमे करण्यात आली आहेत. संविधान कलम १५ नुसार कायद्यापुढे सर्व समान असे नमूद करण्यात आले आहे. असे असले तरी अनूसुचित जाती, अनुसूचित जमाती इतर मागासवर्गीय अल्पसंख्यांक यांना सामाजिक सुरक्षा देण्यासाठी आवश्यकता आहे. त्यावरती अन्याय अत्याचार प्रमाण वाढत आहे. सन १९५५ साली Protection of Civil Right Act करण्यात आला. यानुसार अस्पृश्य पाळणे हा गुन्हा आहे. त्याचे सन १९७७ साली विस्तार करण्यात आला. सन १९८९ साली अनूसूचित जाती, अनुसूचित जमाती Prevention of Atrocities Act 1989 हा कायदा करण्यात आला. या कायद्यात अत्याचार अंर्तजातीय विवाह मान्यता, जाणीव जागृती, विशेष न्यायालयाची तरतुद करण्यात आली आहे. सन २०१६ मध्ये या कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यात आली. सन १९९५ साली पिडीत व्यक्तीला ७५ हजार ते ७५ लाख रूपये पर्यंत मदत घोषीत करण्यात आली. सन २०१३ साली The Prohibition of Employment as manual seavengers and their Rehabilitation Act 2013 तरतुद करण्यात आली. आहे. मैला सफाई कामगाराना या कामापासून दूर ठेवण्याच्या उद्देशाने केले आहे. या बरोबर घराच्या सोई, नळ पाणी सुविधा, आरोग्य सेवा रोजगार, अन्नधान्य पुरवठा अशा अनेक सुविधा सीमांत समुदायाला देण्यात येतात.

### ६) आरक्षण धोरण (Reservation Policy) :

